# वऱ्हाडसमाचार

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख ३ माह आगष्ट सन १९०८ इसवी [अंक २९


## नोटीस

वि० सुभेदार साहेब सबजज्ज कोर्ट आकोला यांचे कोर्टांतून

स० स० मु० नंबर ७ सन १९०८ ई. या नोटिशीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येत आहे कीं अर्जदार सुलतानखां बल्द कालेखां रा. सुकोंड ता. आकोला यानें आपला चुलता हाजी सुलेमानखां वल्द नुरखां मुसल्मान हा तारीख १२-७-०७ रोजीं मरण पावल्यामुळें मयताचे मोतीलाल गुलाबचंद रा. सुकोंड ता अकोला यांजकडे कर्ज रोख्यावरून येणें असलेली रक्कम रुपये ९०८ वसूल करण्याकरितां सक्सेशन सरटिफिकिट आक्ट कलम ६ प्रमाणें आपण वारस असल्यावरून सरटिफीकीट मिळण्याकरितां ता. १६-७-०८ रोजीं दिलेला अर्ज चौकशीकरितां ता. २३ आगष्ट सन १९०८ रोजीं नेमला आहे. तरी सदरहू बद्दल कोणास कांहीं तक्रार वगैरे करणें असल्यास त्यानें आमचे कोर्टांत वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर व्हावे. हजर न झाल्यास पुढें कोणतीही सबब ऐकली जाणार नाहीं. आमच्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस दिली असें आज तारीख २८ माहे जुलई सन १९०८ ईसवी

N, G. Subhedar
Sub-- Judge
Akola.

नं. ग. ९४

## नोटीस

शंकरसींग व किसनसींग व राजबलीसींग वल्द सरदारसींग त्रिवर्ग बंधू राहणार पातूर सेखबाबू तालुके बाळापूर यांसः—

खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्मास ता. १८-२-०८ रोजीं आमची मिळकत पातूर सेखबाबू येथील शेत सर्वे नंबर ४४ एकर १२ गुंठे १७ आकार रुपये २६ खातेदार शामराव भोनाजी यांतील एक चतुर्थांस हिस्सा किंमत रुपये १४०० यांस विकत दिलेला या खरीदी खतांत अशी शर्त आहे कीं सदहू हिस्सा सखाराम भगवंत सिरसोडकिर याजपाशीं गहाण आहे. तें गहाण तुह्मी साडवून त्याची पावती आह्मास दाखवावी. व नगदी रुपये ७०० आह्मास द्यावे. आजवर तुह्मी गहाणदार याची अगर त्याचे वारसाची गहाण सोडविण्याबद्दलची पावती आह्मास दाखविली नसून त्यास रुपयेही दिले नाहींत. त्याचप्रमाणें आह्मास नगदी रुपये ७०० द्यावयाचे ते रजिष्टर पुढें आह्मास भरणा पावल्याचे कबूल व्हावे ह्मणून तुह्मी वे सबरजिष्ट्रारापुढें मोजून ठेविल्यानें त्याचे समक्ष आह्मी रुपये पावल्याचें कबूल केलें परंतु त्याचवेळीं बाहेर निघाल्यावर ते रुपये तुह्मी आपली घरीं नेऊन आह्मास न देतां गहाण घेणार याची पावती आल्यावर रुपये देण्याचें कबूल केलें होतें त्यावेळेपासून आजवर अनेक वेळ तुह्मास रुपये द्यावे व पावती दाखवावी. असें ह्मटलें असतां तसें केलें नाहीं यासाठीं या द्वारें कळविलें जातें कीं हीं नोटीस पावल्यापासून चार दिवसांत रुपये ७०० सातशे आह्मास द्यावे आणि गहाणदाराची पावती दाखवावी तसें न केल्यास तें खरेदीखत पोकळ बिन मोबदल्याचें वगैरे समजून रद्द असें त्याविरुद्ध तुह्मी तजवीज केल्यास मी तुमचे कोणतेच करण्यास जबाबदार होणार नाहीं. कळावें. तारीख २४-७-१९०८ इसवी

सही

देवीदास आनंदसा रंगारी रा० पातूरशेखबाबू दस्तूर खुद्द.
नारायण आनंदसा रंगारी रा० पातूरसेखबाबू दस्तूर खुद्द

नं. ग. ९५

## नोटीस

नोटीस वेशमी तुकाराम वल्लद झांगो राहणार चतारी ता. बाळापूर जि॰ आकोला यांसः—

खालीं सही करणार ईजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्नास आज सुमारें १४ वर्षे झालीं मला तुह्मी ने आण केली नाहीं. ह्मणून माझ्या मामानें मला तुमचें घरीं दोन तीन वेळां आणले तेव्हां तुह्मी ठेविले नाही. मग तुह्मांस पंचासमक्ष विचारले तेव्हां न्यावयास येतो असें ह्मणून आला नाहीं. करितां नोटिशीनें सूचविण्यांत येतें कीं माझी खावटीचा खर्च ७०० रुपये मला कर्ज झालें आहे ती १४ वर्षाची खावटी व माझी फारकती ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत न दिल्यास ही नोटीस फारकती समजून दुसरा घरठाव करीन कळावे. ता.२४- ७- ०८

सही

कावताई मर्द तुकाराम जात कुणबी राहणार विगांव नि-
नं. ग. ९६ शानी हातची बांगडी

## जाहिर नोटीस

चि. रामु तुकाराम व बळीराम तुकाराम सईतवाड रा० वाडेगांव तालुका बाळापूर जि. आकोले.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी उभयता बंधु माझे साक्षांत पुतणे आहांत असें असून तुह्मी माझ्याशीं बेमानकी करूं पहात आहां तीं अशी कीं आमची वडीलोपार्जीत जागा वाडेगांव येथील २४ खांबाचें धाबें आहेत. त्यांत माझी स्वतःची एक तिजोरी आहे. त्यांत कांहीं कामाचे कागद आहेत ते तुह्मास विचारले असतां तुह्मी साफ नाहीं ह्मणून सांगितले. व त्या धाब्यांत आमचा तिसरा हिस्सा असून ते आह्मी तिघे बंधु मिळून बांधलेलीं आहे. व मी बटवाडीस राहात असल्यामुळें वाडेगांवास राहण्याचे बनत नाहीं तेव्हां माझे दोघे बंधु वाडेगांवास आह्मी बांधलेल्या २४ चोवीस खांबी धाब्यांत रहात होते. त्यांचा आमचा कोणतेही प्रकारचा तंटा नव्हतां व तुह्मी आतां माझा तिसरा हिस्सा बळकांवू पाहतां हें बरोबर नाहीं. आणखी माझें दुकान १२ खांबाचें व कांहीं पडीत जागा असून समोर पडवी टिनाची आहे. ती सबंध दुकान माझ्या नांवाची आहे. त्यांत तुमचा कांहीं हक्क नसून तुह्मी ती दुकान तुह्मी विकुं पाहात आहों- तेव्हां तुमच्या मनांत माझ्याविषयीं कांहीं पाप आलें आहे. तरी असें करूं नये आणि तुह्मास सांगणें इतकेंच ती माझी तिसऱ्या हिश्याची जागा व दुकान हें माझे स्वाधीन १५ दिवसांचे आंत करावे. तसें न केल्यास मला रीतीप्रमाणें व्यवस्था करावी लागेल जर तें दुकान कोणास गाहाण, खरेदी अगर विकाल तर ते माझे सहीशिवाय कोणी घेऊं नये. कळावे. ता. २३-७-१९०८ इ.

सही

गणपती नेमाजी सईतवाड
रा. वाडेगांव हल्लीं वस्ती
नं. ग. ९७ बटवाडी द. खु.

## जाहिरात

सर्वत्र सावकार लोकास व वाडेगांव येथील लोकांस या जाहिरातीनें कळवितों कीं आमचे पुतणें रामु वा तुकाराम बळीराम तुकाराम हें आमची जागा व दुकान विकणार आहे असें समजल्यावरून ती जागा व दुकान माझ्या सहीशिवाय कोणी घेऊं नये. घेतल्यास तें सर्व रद्द समजलें जाईल. कळावे ता. २३-७-०८

सही

गणपती नेमाजी सईतवाड
रा. वाडेगांव हल्लीं वस्ती
नं. ग. ८९ बटवाडी द. खु.

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः-- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा ज्यास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०५ } G. A Phillips एजंट
नं ७३

## ✻ इकडे लक्ष द्या ! ✻

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, रंगीत पिठोरी १। रु० यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी शंभर घेतल्यास शेंकडा ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

वऱ्हाडसमाचार

श्रावण शुद्ध ६ शके १८३०

## ग्रंथपरीक्षण.

### काव्यदोषदीपिका

( ले०– रा० लक्ष्मणशास्त्री लेले. )

प्रस्तुत पुस्तकाचे कर्ते रा० गोरे हे मराठी काव्य वाचकांस अगदींच अपरिचित नाहींत. सुमारें तीन वर्षांपूर्वी त्यांनीं अलंकारचंद्रिका या नांवाचा एक काव्यालंकारविषयक ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यावरून त्यांचें मराठी काव्यावरील प्रेम व व्यासंग हीं व्यक्त होऊन साहित्यशास्त्राशीं त्यांचा असलेला परिचयही चांगला निदर्शनाला आला.

काव्यदोषदीपिका हा ग्रंथ रा० गोरे यांनीं मोठ्या परिश्रमानें तयार केला आहे हें सहज दिसून येतें. मराठीमध्यें शास्त्रीय ग्रंथ फारसे नाहींत. त्यांतही अशा प्रकारच्या पुस्तकांचा वाचकवर्गही फार संकुचित आहे. त्यामुळें ग्रंथकारास असल्या पुस्तकांपासून द्रव्यलाभ होण्याची आशा नाहीं. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्यें केवळ साहित्यशास्त्रावरील आपल्या दृढ प्रेमानेंच प्रेरित होऊन प्रस्तुत ग्रंथ रा० गोरे यांनीं प्रकाशित केला, ही गोष्ट महाराष्ट्र वाङ्मया संबंधानें जितकी अभिनंदनीय आहे, तितकीच रा० गोरे यांसही प्रतिष्ठावह आहे, यांत संशय नाहीं.

या ग्रंथांत काव्यदोषांचे निरूपण केलें आहे. संस्कृत काव्यप्रकाश ग्रंथांत ‘दोषदर्शन’ या नांवाचा सातवा उल्लास आहे. त्याच्या आधारानें प्रस्तुत ग्रंथ रा० गोरे यांनीं रचिला आहे. पुस्तकाच्या आरंभीं विषयप्रवेशांत काव्यगुण; वृत्ति व रीति; उद्देश्य विधेयभाव; अभिधा, लक्षणा व व्यंजना हे शब्दव्यापार व ध्वनिभेद यांचें सोदाहरण मार्मिक विवेचन केलें आहे; व शेवटीं कविसंप्रदाय दिले आहेत. हे विषयप्रवेशांतील भाग पुढील ग्रंथ नीट समजण्यास आवश्यक आहेत. पुढें काव्यदोषज्ञानाचें महत्व व काव्यदोषांचें • लक्षण हीं सांगितलीं आहेत. नंतर दोषांचे नित्य व अनित्य असे दोन प्रकार कथन करून त्यांचेही प्रत्येकीं शब्ददोष, अर्थदोष व रसदोष असे भाग कल्पिले आहेत. असे स्थूलमानानें दोषविभाग करून शब्ददोषापासून तों रसदोषांपर्यंतचा विषय लक्ष्य लक्षणांसह सविस्तर निरूपिला आहे. रसदोषानंतर कित्येक अलंकारदोषही दर्शविले आहेत. याच्या पुढें दोषभेददर्शक टिपा दिल्या आहेत; व शेवटीं दोष ओळखण्या करितां दोषयुक्त पद्यें दिलीं आहेत व त्यांचीं उत्तरें देऊन ग्रंथसमाप्ति केली आहे. असें या ग्रंथाचें एकंदर स्वरूप आहे.

रा. गोरे यांनीं ग्रंथांतील विषयाचें विवेचन व्यवस्थितपणानें व सहृदयतेनें केलें आहे. विषय जितका सुबोध करतां येईल तितका करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. पुष्कळ दोषांचीं नांवें केवळ मराठी वाचकांस बरीच दुर्बोध वाटण्याचा संभव आहे. तथापि रा. गोरे यांनीं मूळ संस्कृत ग्रंथांतीलच परिभाषा कायम ठेविल्यामुळें ही गोष्ट अपरिहार्य झाली आहे. उदाहरणांची निवड चांगली झाली असल्यामुळें ग्रंथ विशेष मनोरंजक व उपयुक्त झाला आहे. मराठी काव्यें वाचणारांनीं या ग्रंथाला अवश्य आश्रय दिला पाहिजे व ग्रंथकर्त्याच्या श्रमाची अंशतः तरी भरपाई करून दिली पाहिजे रा. गोरे यांची ही कृति अभिनंदनीय असून महाराष्ट्रवाङ्मयांतील शास्त्रीय ग्रंथांमध्यें तिच्यायोगानें चांगलीच भर पडली आहे असें आम्हांस वाटतें.

या ग्रंथाला दुसरी बाजू नाहीं असें नाहीं. प्रस्तुत ग्रंथ एकवार वाचून जे दोष दृष्टीस पडले त्यांच्या पैकीं कित्येकांचें दिग्दर्शन येथें केल्यास तें काव्यदोषादीपिकाकारांस रुचणार नाहीं असें वाटत नाहीं.

प्रस्तावनेंतील पहिलेंच वाक्य रसिकांच्या मनांत उद्वेग उत्पन्न करण्यासारखें आहे. यांत साहित्यशास्त्राला व्याकरणाचें पुच्छ म्हटलें आहे. पुच्छ ही वस्तु शरीराचा अत्यंत क्षुद्र भाग आहे. या शब्दानें प्रस्तुत विषयाची अधमता व्यंजित झाली! प्रस्तुत विषय काव्यदोषनिर्णय हा असून तो साहित्यशास्त्राचा एक भाग आहे. शब्दांची खटपट करणाऱ्या एखाद्या गृहस्थानें साहित्यशास्त्राच्या अज्ञानामुळें व व्याकरण विषयांच्या फाजील अभिमानानें असे उद्गार काढले असते तर ते क्षम्य झाले असते. परंतु साहित्यशास्त्राच्या प्रणेत्यानें असे उद्गार व तेहि प्रस्तावनेंतील पहिल्या वाक्यांत काढावे या पेक्षां अधिक अनौचित्य दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत असेल असें वाटत नाहीं. या विधानांत वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला आहे ही गोष्टहि तितकीच महत्वाची आहे. ज्यांत व्याकरणाचे खून झाले असून रसाविर्भाव पूर्णपणें झाला आहे, अशीं हृदयंगम स्थलें मुक्तेश्वर, वामन यांच्या सारख्यांच्या रमणीय कृतींतून फारसे श्रम न करितां सांपडण्यासारखीं आहेत. फार काय प्रस्तुत पुस्तकांत देखील अशीं कांहीं उदाहरणें सांपडतील शब्दसंस्कारापुरतें व्याकरणाचें विशेष महत्व आहे व अर्थालाहि त्याची क्वचित् मदत होते हेंही कबूल आहे. परंतु रसिकहृदयसिंधूला प्रक्षुब्ध करून त्यांत प्रचंड कल्लोळ उत्पन्न करण्याचें सामर्थ्य काव्येन्दूतच आहे. व्याकरणात नाहीं हें तत्व आतिशय व्याकरणशुद्ध काव्य करणारे महाराष्ट्र महाकवि मोरोपंत यांस सुद्धां संमत आहे. यापुढें रा. ‘गोरे’ काव्य दोष’ अलंकारांपेक्षां कमी योग्यतेचे आहेत असें प्रतिपादन करतात. हें विधानहि अयोग्य आहे. मम्मटांच्या काव्यव्याख्येंत दोषावर मोठा कटाक्ष आहे. दंडी व इतर प्राचीन साहित्यशास्त्रकोविदांचाही दोषांविषयीं असाच अभिप्राय आहे. रा. गोरे यांनीं प्रस्तुत पुस्तकाच्या विसाव्या पृष्टांमध्यें काव्यदोष लक्षणाचा ऊहापोह केला आहे, त्यावरून त्यांना पूर्वोक्त मत ग्राह्य आहे असें दिसतें. मग वस्तुस्थितीशीं विसंगत व प्रस्तुताला हीनता आणणारे असें विधान त्यांनीं कां केलें हें समजत नाहीं! काव्यांतील दोष काढण्याची प्रवृत्ति आपल्याकडे प्राचीन काळापासूनच नाहीं’ असें रा. गोरे म्हणतात त्यांतहि सत्यांश फारसा नाहीं. कारण क्षेमेन्द्र, जगन्नाथ, राघवभट्ट इत्यादि पंडितांनीं अतिशय निर्भिडपणें काव्यदोषचर्चा केली आहे प्रस्तावनेच्या दुसऱ्या पानांत ‘प्राचीन मराठी कवींची कविता बहुतेक आध्यात्मिक असल्यामुळें तिच्या गुणदोषांविषयीं चर्चा करण्यास जागाच नव्हती, असें एक विधान आहे. वेदान्त हा काव्याचा विषय होऊं शकत नाहीं असें दीपिकाकारांचें मत आहे असें यावरून अनुमान होतें. मला तसें वाटत नाहीं. कविप्रतिभा वाटेल तो विषय रंगवून सोडते असा अनुभव आहे. ज्ञानेश्वरी हा वेदान्तग्रंथ आहे. पण मराठी काव्यांत याच्या तोडीचा दुसरा ग्रंथ नाहीं असें म्हटलें असतां अत्युक्ति होणार नाहीं. जेथें काव्याची व्याप्ति आली तेथें गुणदोषांना अवकाश आहेच. तेव्हां आध्यात्मिक काव्याला गुणदोषाची कसोटी लागत नाहीं हा सिद्धांत निर्मूल आहे. प्रस्तावनेच्या पांचव्या पृष्टांत मराठी काव्यांत गुण फार व दोष विरळ आहेत, अशा अर्थाचें विधान आहे. जुन्या मराठी काव्यांसंबंधानें हें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे पण आधुनिक मराठी काव्यांसंबंधानें हें विधान साफ चुकीचें आहे असें आमचें मत आहे. काव्यदोषांविषयीं मी थोडासा विचार केला आहे व त्यासंबंधानें टिप्पणें लिहीत आहे. आधुनिक मराठी काव्यांत दोषस्थलें फार दृष्टीस पडतात, असा माझा अनुभव आहे. प्रस्तावनेंत शेवटीं एका गीतीच्या रूपानें रा. गोरे यांनीं मराठी वाचकांना ‘नम्र विनंति’ केली आहे. सदर गीति दोषाकुल आहे एवढेंच नव्हे तर ‘लुटा गुण’ या शब्दानीं ग्रंथांतील गुण प्रकर्षाची ग्रंथकारांना खात्री असल्याचें ध्वनित होऊन ‘नम्र विनंती’–शीं अत्यंत विसंवादी असा उद्दाम दर्पहि अभिव्यक्त होत आहे, ही गोष्ट ग्रंथकारांना न कळत झालेली आहे असेंच माझें मत आहे; म्हणून या विषयीं जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

प्रस्तावने नंतर पृष्ठक्रमाप्रमाणें विषयानुक्रमणिका अपेक्षित असते तशी अनुक्रमणिका या ग्रंथाला जोडली नाहीं. वर्णानुक्रमानें विषयांची सूचि दिली आहे व ती उपयोगी आहे हें खरें. तथापि पृष्ठक्रमानें विषयानुक्रम दिल्यानें वाचकांची अधिक सोय झाली असती. अकराव्या पानांत तिसऱ्या पॅरिग्राफांत पहिल्या ओळींत ‘अर्थ’ या शब्दाच्या पूर्वी ‘मूळचा’ हें पद अवश्य पाहिजे. त्याच्या पुढच्या पॅरिग्राफांत तैलाच्या व्याख्येंत ‘तेल’ हा शब्द न योजतां ‘स्नेह’ हा शब्द पाहिजे १९ व्या पानांत ७ व्या ओळींत ‘निराव्याच’ हा शब्द फाजील पडला आहे १६ व्या पानांत ‘गोष्टीं वसें’ इत्यादि श्लोकांत उत्तरार्धानें युवतीचें इंगित स्पष्ट केल्यामुळें उद्दिष्ट अर्थाचें ज्ञान करून देण्याला वाच्यार्थ अगदींच असमर्थ नाहीं. काव्य प्रकाशांत ‘श्वश्रूरत्र निमज्जति’ इत्यादि गाथेंत अभिनयादि सामग्रीनें व्यंग्य बिलकुल सुचविलेलें नाहीं. तेथें वाच्यार्थावर सर्व भिस्त आहे; व तें उद्दिष्ट अर्थ सुचविण्यास सर्वथा असमर्थ आहे. २२ व्या पृष्टांत उपांत्य पंक्तीमध्यें ‘यथानुक्रमानें’ असा प्रयोग आहे. त्या बदल ‘अनुक्रमानें’ किंवा ‘यथाक्रम’ असा शब्द पाहिजे. ‘श्रुतिकटुत्वां’च्या व्याख्येंत ‘उच्चारावयास कठीण’ असें शब्दाचें विशेषण आहे. तें अनावश्यक आहे. कारण कित्येक शब्द सुखोच्चार्य असूनहि कर्णकटू असतात. जसें स्वार्थ, स्वच्छ, निष्ठुर, सत्य, क्रौर्य इ० अप्रयुक्तत्व दोषासंबंधानें ३० व्या पानांच्या अखेर व ३१ व्याच्या आरंभीं असलेल्या टीकेच्या प्रकाराला फांटा मिळाला तर विषय समजण्याला बिलकुल पंचाईत पडणार नाहीं. ३९ व्या पृष्टांत ‘दारिद्र्य मित्रा’ इत्यादि श्लोकांत ‘मेल्यास’ हें अमंगल वाचक पद आहे, असा गोरे यांनीं अभिप्राय दिला आहे. दारिद्र्यानें गांजलेल्या माणसानें दारिद्र्याला उद्देशून केलेल्या विधानांत तर असा शब्द रसपोषाच्या अधिक उपयोगीं आहे. अश्लीलत्व दोषाचा सविस्तर विचार केला नसता, तर हरकत नव्हती. त्यानें ग्रंथाला हीनता आली नसती. ४९ व्या पानांत ‘जळो ही संपत्ति’ इत्यादि श्लोकांत ‘रतमंदिर’ याचा उत्तान अर्थ जो क्रीडामंदिर तोच मनांत येतो. तदितर अर्थाची प्रतीति मुळींच होत नाहीं; व त्यामुळें विरुद्धमतिकृत्वाचें तो योग्य उदाहरण नव्हे. ५० व्या पानांत तिसऱ्या उदाहरणांत अंगुष्टसाहचर्यानें पादशब्दाची ध्वनित होणारी अश्लीलता नष्टप्राय झाली आहे. याच पानांत पदांशगत व्रीडाश्लीलत्व उदाहृत करण्याकारितां दिलेला गीत्यर्ध दिला नसता तरी हरकत नव्हती. ५१ व्या पानांत तिसऱ्या उदाहरणांत निज व शेज हे शब्द ग्राम्य मानले आहेत. या विषयीं मतभेद आहे. ५४ व्या पानांत अश्लीलसंधि दिला आहे. हा संधि ज्या पद्यांत आहे तें पूर्वीं येऊन गेलें आहे. म्हणून नुसत्या हवाल्यानें काम भागलें असतें. ५६ व्या पानांत छंदोभंगाच्या पहिल्या उदाहणांत तिसऱ्या चरणाच्या आरंभीं जगण पाहिजे, एवढेंच नाहीं, तर त्याच्या पुढें तगण पाहिजे तोहि तेथें नाहीं. ६१ व्या पानांत पंतकृत ‘खकेंर स्वभक्त’ इत्यादि पद्यांत मल या शब्दाचा अर्थ दोष असा आहे. पुनरुक्तवदाभास मात्र या ठिकाणीं आहे. कार्यतपदत्व दोष नाहीं. ७३ व्या पानांत दुसऱ्या उदाहरणपद्यांत शेवटल्या चरणांत ‘जयरमा’ असें पद आहे. यांत उपमानोपमेयांचें लिंगैक्य नाहीं हें खरें आहे. तथापि तो दोष टाळण्या करितां ‘जयगजा’ असा जो पाठ रा. गोरे यांनीं कल्पिला आहे तो अधिक दोषार्ह आहे. आहे. कारण प्रस्तुत श्लोकाच्या उत्तरार्धांत समासोक्तिनामक अलंकार आहे. चतुर्दश रत्नांपैकी रमा हें एक रत्न आहे ही गोष्ट प्रसिद्ध आहे. या प्रसिद्धीस अनुलक्षून ‘विजयलक्ष्मी संपादन केली’ असा अर्थ कवीनें वर्णिला आहे- समुद्रमंथन व रमोपलब्धि या दोन गोष्टी कवीच्या मनांत घोळत असल्याचें स्पष्ट दिसत आहे तेव्हां पाठ बदलावयाचाच तर रमाशब्दाच्या मागें कीर्तिवाचक स्त्रीलिंगी शब्द ठेवावा हें चां-

गलें. या पाठानें दोष नाहींसा होऊन कवीचा इष्ट अर्थ सरसपणें व्यक्त होणें. याच पानांत चवथ्या उदाहरणांत 'विज्ञापिनेली' हें विशेषण मानलें तर भग्नप्रक्रमत्व दोष होत नाहीं. ७४ व्या पृष्ठांत सहाव्या उदाहरणांत दुसऱ्या चरणांत यमक न योजण्याचा क्रम विवक्षित असल्यास प्रक्रमभंग होत नाही. याच पानांत पहिल्या श्लोकांत 'उमावल्लभपति' या पदानें शिव इष्ट असल्यास अपदस्थपदत्व हा दोष नाहीं. ८२ व्या पानांतील ग्राम्यत्व दोष प्रकार टाळतां आला असता असें वाटतें. ८६ व्या पानांत गंगा व गोदा यांची भेट भूगोल शास्त्राविरुद्ध मानली आहे येथें व्यावहारिक गंगा-गोदा- भेट विवक्षित दिसते. गंगेची कावड गोदेला आणून भेटविण्याचा संप्रदाय अद्यापहि क्वचित् दिसून येतो. ८९ व्या पानांत दुसऱ्या उदाहरणांत 'चंदनतरुच्याच' ह्मटलें आहे तें योग्य आहे. कारण मलयपर्वतावर चंदनाचींच झाडे बहुतेक आहेत. इतर झाडें त्यावर असतात असा कविसंकेत तरी निदान नाहीं. मलयज हा शद्बही केवळ चंदनवाची आहे. बहुलत्वामुळें अतिपरिचय व अतिपरिचयामुळें मानहानि या अर्थाला 'चंदनतरुच्याच' हा पाठ अधिक अनुकूल आहे. ९४ व्या पानांत चवथ्या उदाहरणांत 'आडनावाची' या पदांत नावेला आडाचें साहचर्य आल्यामुळें नावा आडांत चालतात असा अर्थ निष्पन्न होतो असें रा. गोरे ह्मणतात! बुडविणें व तारणें हे परस्पर विरुद्ध व्यापार करणारे पदार्थ एकाच दृष्टीनें आडनावाचें साहचर्य या ठिकाणीं पंतांनीं कल्पिलें आहे. व त्यांत यमकहि अनायासें साधला आहे. गीत्यर्थ अगदीं सरळ असून समर्पक आहे. सहचरभिन्नत्वाचा दोष या ठिकाणीं प्रतीत होत नाहीं. ९५ व्या पृष्ठांत 'न पाही' इत्यादि पद्य आहे. याच्या तिसऱ्या चरणांतून 'गुणवान परपुरुषास पाहणें पाप नाहीं' असा अनिष्ट व्यंग्यार्थ वाचकाच्या मनांत येतो असें विधान आहे. परंतु परपुरुष पाहणें निंद्य त्यांतही तो निर्गुण पाहणें अतिशयच निंद्य अशी कवीची विवक्षा आहे. परपुरुष पाहणें हा पहिला दोष व निर्गुण परपुरुष हा दुसरा दोष आहे, असा अर्थ मनांत येतो. दुसऱ्या चुकीच्या दुरुस्तीनें पहिला दोष उडतो असें नव्हे. तथापि या संबंधानें रा. गोरे यांच्या मताचे कांहीं बाचक आहेत हें मी प्रांजलपणें कबूल करतो. ९६ व्या पानांत दुसऱ्या उदाहरणांत कमलरूप अचेतन वस्तूची कोणी एकानें प्रार्थना केल्याचें वर्णन आहे. या ठिकाणीं अचेतनावरील सचेतनत्वाचा आरोप दीपिकाकारांना इष्ट दिसतो. परंतु १३१ व्या पानांत त्यांनीं असला आरोप दोषास्पद आहे असें विधान करून 'प्राणेश्वरासि' इत्यादि श्लोकावर आक्षेप घेतला आहे. या विरोधाची संगति कशी लावावयाची! कविकुलगुरूनें अचेतन मेघाला विरही यक्षाचा संदेशहर बनविलें आहे! आद्य कवीचें विरही रामचंद्राला सीता प्रवृत्त्यर्थ वृक्षपाषाणादिकांशीं बोलविलें आहे! व्यासमहर्षींनीं भारतामध्यें वनपर्वांत विरहिणी दमयंतीला अचेतनवस्तूंशीं संवाद करायला लावलें आहे. विरहव्यथितांचा अचेतनाशीं संवाद कल्पिण्यामध्यें एक प्रकारचें माधुर्य आहे व तें सहृदयैक — संवेद्य आहे. कवितेचें तार्किक दृष्टीनें विवेचन करणें ह्मणजे कवितेचा खून करणें आहे असें रा० गोरे प्रस्तावनेंत ह्मणतात; मग या संबंधानें त्यांचा असा चमत्कारिक ग्रह कां झाला कोण जाणे! ९७ व्या पानांत पहिल्या व दुसऱ्या उदाहरणांत वाक्यार्थ पुरा झाल्यावर नवीन अर्थाची पुरवणी केलेली दिसत नाहीं. 'तापस' व 'नृवीर' यांचीं विशेषणें मुख्य वाक्यार्थाचीं पोषक आहेत. ८८-८९ व्या पृष्ठांतील अश्लीलत्व विवेचन सहृदयोद्वेगकर आहे. १०२ पानांत दुसऱ्या पारिग्राफांत स्थायिभावाचा कांहीं वेळ लोप होतो असें ह्मटलें आहे. स्थायिभाव या बीजरूप मनोवृत्तीचा कधींही लोप होत नाहीं. ती विभावादिकांनीं उत्तेजित मात्र होते. स्थायिभावाच्या उत्पत्तीच्या कारणांस विभाव ह्मणतात असें विभाव लक्षण दिलें आहे. यांत 'उत्पत्तीच्या' असें न ह्मणतां 'विकासाच्या' असें पाहिजे. व्यभिचारि भावाच्या व्याख्येंत हाच दोष आहे. १०९ व्या पानांत 'पदर सांवरणें' हा उद्दीपनविभाव सांगितला आहे. हा अनुभाव नव्हे का! १२७ व्या पानांत अलंकार दोषांत चवथ्या ओळींत 'गेले नसेल' याबद्दल 'जाणार नाहीं' असें पाहिजे. १३३ व्या पानांत वामनाच्या श्लोकांत सचेतनत्वाचा आरोप स्वीकारला आहे पण पुढच्या श्लोकांत त्याच्या दोषदर्शनार्थ त्याग केला आहे. 'रक्षी हिमाद्री' इत्यादि श्लोकांत पूर्वार्धांत उत्प्रेक्षा कल्पिली ह्मणजे संभावित अर्थ मिथ्या असल्यामुळें त्याचें समर्थन उत्तरार्धगत अर्थान्तरानें होऊं शकत नाहीं. दोषहेतु अशा प्रकारें व्यक्त झाला पाहिजे.

यापमाणें काव्यदोषदीपिका हें पुस्तक एकवार वाचून जे विचार सुचले ते प्रांजल बुद्धीनें दिले आहेत. या पुस्तकांत दोष फार थोडे व गुण विशेष आहेत हें पाहून संतोष वाटतो. या पुस्तकास योग्य तो लोकाश्रय मिळाला तर ग्रंथकारांप्रमाणें मलाही आनंदच वाटेल.

## अंदाज पत्रकावरील वादविवाद.

गेल्या आठवड्यांतील अत्यंत उद्वेगजनक बातमीमुळें इतर विषयांकडे लक्ष देण्याइतकें मनस्वास्थ न उरणें सहाजिक होतें रा. टिळक यांच्या वरील खटल्याच्या समाप्तीचे दिवशींच हिंदुस्थान सरकारचे गतवर्षींचे जमाखर्च व चालूं सालचा खर्डा पार्लमेंट पुढें सादर झाला. मि. मोर्ले हे स्टेट सेक्रेटरी झाल्यापासून दोन वर्षें या प्रसंगाला जरासें महत्व आलें होतें. पण मि. मोर्ले लार्ड मोर्ले बनून हाऊस ऑफ लार्डसमध्यें दडी देऊन बसल्यामुळें हाउस ऑफ कॉमन्समधील हिंदुस्थानविषयक वादविवाद फिके पडत गेले. यंदाचे खेपेस मि. मोर्ले हाउस ऑफ कॉमन्समध्यें असते तर मि. बुकनन यांच्या आळणी भाषणापेक्षां कांहीं तरी चटकदार असें भाषण करणें त्यांना भाग पडलें असतें व मि. ओडोनेल यांच्या सारख्या खंद्या लढवय्याला आतांच्या प्रमाणें आपखुषाच पाठीला माती लाऊन घेण्याची बुद्धि झाली नसती. हाऊस ऑफ कामन्समधील हें 'आळणी आळण' कोणालाही रुचकर वाटलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं. मि. बुकॅनन यांस आपले मालिक लार्ड मोर्ले यांच्याच तोंडचे शद्ब फोनोग्राफाप्रमाणें पुनः प्रकट करण्यावाचून गत्यंतर नव्हतें. सध्यांच्याच लिबरल प्रधान मंडाळांतील वसाहतीचे पूर्वीचे प्रधान लार्ड एल्जिन व त्यांचे दुय्यम दि राईट आनरेबल मि. विन्स्टन चार्चिल यांची आठवण या प्रसंगीं विसरण्याकरितां होते. मि. चर्चिल यांचीं हाऊस ऑफ कामन्समधील व इतर ठिकाणचीं रोख ठोक भाषणें व मि. बुकॉनन यांची मोर्लेकृत हिंदुस्थानच्या राजनीतीची ' उजळणी यांत केवढें तरी अंतर आहे! पण ती राजनीति तरी स्थिर कोठें आहे? तिच्या तत्वांत घटकोघटकीं फरक पडत असल्यामुळें कोणत्याही काळचें तिचें स्वरूप हिंदुस्थानांत ग्राह्य होऊं शकत नाहीं, मि. बुकानेन हे काय करणार? 'आह्माला हिंदुस्थानांतील नूतनोद्भव चैतन्याचा आदर ठेवला पाहिजे, बऱ्याचशा सुशिक्षित लोकांच्या राजकीय कल्पनांनाहि मान दिला पाहिजे, आणि या लोकांना आमच्या बाजूस वळवून घेण्यांत ज्या मानानें आह्माला यश येईल त्यावर आमच्या सत्तेचें धैर्य कायम राहील ' असे निर्वाणीचे उद्गार मि. बुकानन यांनीं काढले असल्याचें समजतें. हिंदुस्थानांतील सर्व अडचण शिक्षणामुळें उत्पन्न झाल्याची ओरड गेल्या कांहीं महिन्यांत किती जोरानें होत आली आहे हें ज्यांच्या ध्यानीं आलेलें असेल त्यांना या मोर्ले साहेबांच्या नव्या डुलकावणींत कांहीं हितकर तथ्य दिसणार नाहींच; उलट हिंदुस्थानांतील शिक्षणाची दिशा बदलण्याच्या उपक्रमाचा हा चूत्कार आहे कीं काय अशी शंका आल्यावांचून रहात नाहीं. गेल्या महिन्यांत हाउस ऑफ लार्डसमध्यें झालेल्या वादांत हा शिक्षणाचा प्रश्न खुद्द मोर्ले साहेबांच्या मुखांतूनच प्रथम उजेडांत आला. शिक्षणपद्धति सुधारली पाहिजे अशी कागाळी त्यांच्यानंतर भाषणें करणाऱ्या इतर वक्त्यांनींहि केली. नुकती चार वर्षांपूर्वी कायद्याअन्वयें नवी शिक्षणपद्धति हिंदुस्थानांतील लोकांच्या बोकांडी बसविणारे लार्ड कर्झनहि, शिक्षणाच्या नाड्या आंखडून धरण्यास आपली युक्ति पुरेशी नाहीं असें पाहून, याच चुत्कारांत आपला स्वर मिळविण्यास तयार झाले होते. एक दोन विघ्नसंतोषी अँग्लोइंडीयन पत्रांच्या अतिशहाण्या लंडनच्या बातमीदारांनीं दारूच्या गुत्याप्रमाणें शाळांनाहि लायसेन्स घ्यावें लागणार असें कळविलें होतें. भ्रष्ट बुद्धींचा विनिपात होण्याची वेळ आल्यावर मग तो एकाच बाजूनें होत नाहीं. हिंदुस्थानांतील प्रत्येक वर्गाचे लोक आपआपल्या परीनें दैतागलेले आहेत. त्यांत आणखी शिक्षणाच्या मुळांशी घाव बसण्यासारखी कृति झाल्यास सरकारला आपला निगरगट्टपणा व लोकांना आपला चिवटपणा अजमावून पहाण्यास आणखी एक कारण उत्पन्न होईल. हा प्रसंग कधीं येईल त्याची आतां वाटच पहावयाची आहे. तूर्त, 'सरकारशीं इमानानें वागणाऱ्या लोकांचा आपल्या देशाच्या राज्यकारभारांत खराखुराच हात असूं देण्याची' इच्छा मि. बुकानन यांचे मुखानें जाहिर झाली आहे. कल्पनातीत काळापर्यंत हिंदुस्थानचा राज्यकारभार एकेकाच व्यक्तिच्या हातांत अनियंत्रित असला पाहिजे, हें मोर्लेप्रणीत आदितत्व इतक्यांतच ब्रिटिश चॅनलमध्यें अंतर्धान पावलें! या तत्वाचे द्रष्टे मि. मोर्ले यांनीं हाउस ऑफ कॉमन्समधील आपल्या श्रोत्यांना तें पढविल्याला बरोबर एक वर्ष झाले. त्याच पूर्वींच्या जागीं, तशाच प्रसंगीं, त्याच श्रोत्यांना पूर्वींच्या मुख्यांच्याच नायबांकडून असें विपरीत ऐकावें लागल्यामुळें कार्य वाटलें असेल याची कल्पना केली पाहिजे. स्वातंत्र्य या शद्बांतील धात्वर्थ घेतला तरी सुद्धां जर त्याचा एक अंश लोकांना मिळावयाचा आहे तर उद्यां दोन, परवां चार, या प्रमाणें वाढत्या संख्येंत स्वातंत्र्यांशांची प्राप्ति करून घेतल्यावांचून हिंदुस्थानचे लोक रहावयाचे नाहींत. देशाचा, कांहीं थोडा कां होईना, कारभार आपल्या तंत्रानें चालवितां येणें शक्य झाल्यावर लोक झोंपी जाणार अशी कल्पना असल्यास ती चूक आहे. क्रमाक्रमानें शक्य तितक्या अवधीपर्यंत हें स्वातंत्र्यप्राप्तीचें झगडणें चालू रहाणारच. मग मोर्ले साहेबांची कल्पनातीत काळापर्यंत लागूं होणारी राजनीति कोठें रहाणार आणि हिंदुस्थानाचें राज्य प्रजेच्या शिरावर शस्त्र धरून करूं इच्छिणाऱ्यांची प्रतिज्ञा तरी कशी शेवटास जाणार? मि० बुकानन असले निर्वाणीचें भाषण करीत असतांना मोर्ले, अनुमोर्ले आणि पर्सी, अनुपर्सी सारखेच स्तब्ध राहिले, यावरून या भाषणाचा अर्थ त्यांना एकतर कळला नाहीं. किंवा पक्का कळला अशीं दोन अनुमानें निघूं शकतात. जबरदस्त कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाच्या प्रमुखांचीं चर्या ज्या भाषणानें किंवा आश्वासनानें थोडीशी सुद्धां फिरली नाहीं, त्यांत आपण सत्यार्थ आणी तत्वार्थ ओतप्रोत सांठविला आहे; हें कोणी खरें न मानील तर मात्र आपलें दुर्दैव असें काकूळतीस येऊन सांगण्याची मि. बुकानन यांस जरूर वाटली हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या नायबांच्या मुखानें ज्या नव्या राजनीतीचा उपक्रम करविला आहे त्याला इंग्लंडांत कांहींही नांव मिळो; ज्यामुळें आमच्या देशाचा कारभार आपल्या तंत्रानें करण्याचा अधिकार मिळेल, अशा प्रकाराला स्वातंत्र्याच स्वराज्याचा उगम असेंच नांव हिंदुस्थानांत मिळणार. या स्वातंत्र्याचें उदक आमच्या हातावर सोडण्यास लिबरल प्रधान मंडळ उद्युक्त झालें असतां स्वस्थ बसण्याइतके कॉन्सर्व्हेटिव्ह मंडळ खुळें खास नाहीं. त्यांचा जळफळाट हीच आमच्या हिताची खरी निशाणी आहे. पार्लमेंटरी पद्धतीचें अवलोकन जर कांहीं उपयोगाचे असेल, इंग्लंडातील राजकारणी धडामोडीच्या इतिहासाचें ज्ञान जर कोठें मार्गदर्शक होणें शक्य असेल, तर तें येथें आहे, असा आमचा पक्का भरंवसा आहे आणि ह्मणूनच लिबरल प्रधान मंडळाच्या आतांच्या

उपक्रमाचें वास्तविक स्वरूप मापण्याला कॉन्सव्हेटिव्ह पक्षाची मनःस्थिति हेंच प्रमाण आहे. या प्रमाणाच्या आधारानें निरीक्षण करतां जी अर्थप्राप्ति होते तीवरून सध्यांचा उपक्रम कांहीं तथ्यरूप आहे असें मानण्याला कांहींच जागा उरत नाहीं असें स्पष्टपणें ह्मणावें लागतें, याला आमचा नाइलाज आहे. अनुभवानें आमचें हें ज्ञान खोटें ठरल्यास आह्मी तें आनंदानें वस्त करूं. पण आजच्या स्थितींत वरील कारणांमुळें मि० बुकानन यांची आकांक्षा तृप्त होण्याचा बिलकूल संभव नाहीं, येवढें बजावून ठेवणें आवश्यक आहे. 'राज्यकारभारांतील सुधारणा' या शब्दद्वयांत आतां कांहीं राम उरला नाहीं. त्यांतील मोहकत्व निष्ठूर अनुभवानें नष्ट झालेलें आहे, ह्मणून पुनः पुनः त्याच आमिषाला भुलण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांतील लोकांमध्यें आतां शिल्लक नाहीं व यापुढें होण्याची शक्यताही नाहीं. अडचण व्यवहारांतील नसून तत्वांतच आहे हें कबूल झाल्याखेरीज कोणाही पंडित मुत्सद्याला हिंदुस्थानचा प्रश्न सोडवितां येणार नाहीं.

---

तुर्कस्थानांत सनदशीर राज्यपद्धतीची स्थापना झाल्याचें अत्यंत आनंदाचें वर्तमान आलें आहे. जपानच्या दैदीप्यमान बालरवीच्या आल्हाददायक किरणांनीं दृष्टीत्रची झांपड उडाल्या नंतर त्याच्या मागोमाग चीन व इराण या राष्ट्रांतून अवतीर्ण झालेल्या तेजाची प्रभा चांगलीच गोचर होऊं लागली होती. मृत्युमुखीं पडलेल्या तुर्की राष्ट्रानें पूर्वेकडील आपल्या बांधवांच्या यशाच्या जोडीस आपलेंही धवल यश बसविण्याला इतक्या अनपेक्षित आतुरतेनें पुढें यावें यापेक्षां आशियाटिक राष्ट्रांचें मुख उज्वल करणारी दुसरी कोणती गोष्ट असेल? तुर्कस्थानच्या या नवीन उपक्रमाला अनपेक्षित असें विशेषण लावण्यांत त्या राष्ट्राविषयीं अनुदारता प्रकट करण्याचा हेतु नाहीं हें सांगावयास नकोच. तुर्कस्थान इतक्या लवकर पुढें सरसावेल अशी वर्ष सहामहिन्यांपूर्वीं कोणाची कल्पना होत नव्हती हें अगदीं सत्य आहे. पण गेल्या कांहीं महिन्यांत तुर्कस्थानांत जी सामसूम दिसून येत होती तीवरून कांहीं तरी अनपेक्षित असें होणार असें खात्रीनें वाटत होतें आणि झालेल्या प्रकारामुळें मध्यंतरीच्या शंकेचें आनंददायक रीतीनें निरसन झालें ही सर्वांत जास्त समाधानाची गोष्ट आहे. तुर्कस्थानांतील सर्व धर्माच्या लोकांनीं नवी राज्यव्यवस्था संतोषानें स्वीकारली आहे. या नव्या राज्यव्यवस्थेच्या अंमलाच्या सुरवातीलाच एक विशेष स्मरणीय अशी गोष्ट घडून आलेली आहे. सरकारी गुप्त हेरांच्या खात्याची हकालपट्टी ही ती गोष्ट होय. ही गुप्त हेरांची नेमणूक ह्मणजे कोणत्याही सुधारलेल्या राज्यपद्धतीवरील अत्यंत लज्जास्पद असा कलंक आहे. आणि तुर्कस्थानचे सुलतानांनीं आपल्या प्रजेच्या तंत्रानें राज्यकारभार चालविण्याच्या सत्कार्याला प्रारंभ करतांना प्रथम या कलंकाचें निर्मूलन केलें हें फारच योग्य झालें. तुर्कस्थानची सर्व लोकसंख्या कोणत्याहि एकाच धर्माची नाहीं. हें सुप्रसिद्धच आहे. पण नव्या राज्यपद्धतीचा पहिला शुभ परिणाम या पंथांच्या लोकांचें एकीभवन हा होय. भिन्नभिन्न पंथांच्या व धर्मांच्या लोकांमधील बाह्यतः दिसणारा द्वेष दुष्परिणामाला कारण होण्याचें टाळण्याला इतक्या कालानंतर तुर्कस्थानच्या सुलतान साहेबांस एकच मार्ग दिसला आणि तो सनदशीर, लोकप्रातिनिधिसत्ताक राज्यपद्धति हा होय. या खेरीज सर्व उपाय कोणाच्याना कोणाच्या बुद्धीनें किंवा सल्यावरून अंमलांत आणले गेले होते पण ते सर्व निष्फळ ठरून योग्य तोच एक उपाय योजण्याचें सुलतान साहेबांनीं मोठ्या खुषीनें पतकरलें याबद्दल सर्व राष्ट्रांकडून त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ईश्वर या सत्य उपक्रमाला शाश्वति देवो!

---

## सहानुभूती

राजश्री टिळक हें नामदार असोत किंवा काळेपाण्यावर असोत, सर्व लोक त्यांस लोकोत्तर देशाभिमानी सत्पुरुष समजतात हें निर्विवाद आहे. असा परमपूज्य पुरुष काळेपाण्यावर जातो तेव्हां लोकांचीं अंतःकरणें दुःखित झालीं, उद्विग्न झालीं व कायद्यामुळें निराश झालीं! जहाल, नेमस्त इत्यादि सर्व मतांचीं माणसें सारखींच दुःखीकष्टी झालीं. राजश्री टिळकासंबंधानें जो तो आपापल्या परीनें दुःखाचा वेग बहिःस्फूट करूं लागला. शहरोशहरीं दुकानें बंद झालीं, गिरणीवाले काम सोडून घरीं बसले व विद्यार्थीहि शाळेस न जातां घरीं राहिले. अंतःकरणाचा झटका तो कांहीं विचारसृष्टींतला नसतो, दुःखाची तळमळ तत्वज्ञान विसरते आणि कांहीं तरी रीतीनें मन निष्कामपणांतच थंड व शांत होत जातें. तद्वत् प्रकार आकोल्यासहि घडला. राजश्री टिळक नुकतेच वऱ्हाडांत येऊन गेले होते. त्यांची सन्मूर्ती लोकांच्या डोळ्या पुढें खेळत होतीच. काळेपाण्याची शिक्षा ऐकतांच लोकांचे कर्ण बधिर झाले, सर्पदंशाचा निचेष्टितपणा लोकांच्या व्यवहारांमध्यें पसरला आणि गेल्या सोमवारीं दुःखप्रदर्शनाची व्यावहारिक तऱ्हा ह्मणून येथील व्यापाऱ्यांनीं दुकानें बंद ठेविलीं व शाळांतील विद्यार्थ्यांनीं दुकानें बंद पाहिलीं तसा ते शाळेचा रस्ता सोडून घरोघर परत आले.

ही सहानुभूती कृत्रिम नव्हे. ही खरी आहे. तिच्या मुळाशीं लोकांच्या हृदयग्रंथी एकत्र झाल्या आहेत. सहानुभूतीचा प्रकार इतर उदाहरणांनीं निश्चित झाला असेल तथापि ही दुःखाची मनोवृत्ती नैसर्गिक आहे. तिचीं प्रवर्तक कारणें लोकांच्या अंतःकरणांत भेदून गेलीं आहेत. सरकारला असें वाटतें कीं लोकांच्या सांगासांगीनें हा प्रकार घडला असला पाहिजे. कांहीं चळवळे लोक या गोष्टीच्या बुडाशीं आहेत असा तर्क येथील सरकारी मंडळींत चालू आहे. कोण कांहींहि ह्मणोत आह्मी ह्मणतो कीं सत्याचा अपलाप होऊं देऊं नका. खरी गोष्ट ओळखून नंतर लोकांच्या सहानुभूतीच्या प्रदर्शनावर टीका करण्याचा प्रयत्न करावा. येथें पाताळयंत्र कांहीं नाहीं. लोकांचीं मनें उथळ असतात आणि तीं सहज उकलून पडतील!

---

## अमर्यादा

पुष्कळसे विद्यार्थी गेल्या सोमवारीं आपापल्या शाळांस गेले नाहींत. ही गोष्ट त्यांनीं शिस्तीच्या विरुद्ध केली. त्यांनीं नियमांची अमर्यादा केली. त्यांचीं मनें ही चुक ओळखून आहेत व ते प्रांजलपणें हें कबुलहि करितील. राजश्री टिळक हे लोकोत्तर आहेत ह्मणून ते वृद्धांप्रमाणें बालवृत्ती विद्यार्थ्यांसहि अत्यंत पूज्य व वंद्य आहेत. त्यांच्याच निमित्त त्यांनीं शाळा बंद पाडली. असामान्य प्रसंगीं जे असामान्य प्रकार घडतात त्यापैकींच विद्यार्थ्यांचें वर्तन होय. विद्यार्थी माणसेंच असून मेंढारासारखीं किंवा वानरासारखीं असतात. त्यांच्या चुकीबद्दल कांहीं सुश्राव्य काव्य प्रपठण करण्याची किंवा घरून लिहून आणण्याची त्यांस शिक्षा करावी असें आह्मी शाळांच्या अध्यापकांस मुद्दाम सूचवितों. अशा शिक्षेनें शीस्त कायम राहून सर्व विद्यार्थी संतुष्ट राहतील.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामानः पावसानें अगदीं भंडावून सोडलें असून आतां उघाडी अवश्य पाहिजे आहे. एकंदर पाऊस २१ इंचावर झाला असून किरकोळ ऋतुमानाच्या दुखण्याशिवाय इतर रोगराई कांहीं नाहीं.

रा. रा. जे. के. ब्याटन आय सी. एस. १ ले ऑडिशिनल जुडिशियल कमिशनर हे येत्या १२ वे तारखेपासून एकंदर १९ महिन्यांच्या रजेवर विलायतेस जाणार आहेत.

त्यांच्या रजेंत रा. रा. जे. ए. सी. स्क्रिनर आय. सी. एस. डिव्हीजनल जज्ज छत्तिसगड यांस २रे ऑडि. जुडिशिअल कमिशनर नेमण्यांत आलें.

मेजर डी. ओ. मॉरिस, डिस्ट्रीक्ट आणि सेशन जज्ज, आकोला यांची रजा २४ आक्टोबरला संपते पण त्या रजेला जोडून त्यांनीं आणखी २० जून १९०९ पर्यंत रजा वाढवून घेतली आहे.

जबलपूरच्या मुसलमानी हायस्कूला प्रमाणें उमरावतीस एक मुसलमानी हायस्कूल स्थापण्याचा स्थानिक सरकारचा विचार ठरला आहे ही आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. अमृत वामन दलाल, बुलडाणा या सुखवस्तु गृहस्थांस ३ रे वर्ग माजिस्ट्रेटीचा अधिकार देण्यांत आला. ही नेमणूक करण्याचें कारण असें कीं आनररी माजिस्ट्रेटांपैकीं रा. रा. विष्णूसा बाळकृष्णसा सावजी मलकापूर हे सन्मान्य बाणीदार गृहस्थ आपला प्रतिष्ठितपणा व स्वतंत्रपणा कायम ठेवण्यासाठीं कमी झाले तेव्हां ती कमी पडलेली जागा राजश्री कोलम्ब यांच्या सूचने वरून वर प्रमाणें भरण्यांत आली.

रा. रा. गणेश बापूजी गाडगीळ बी. ए. एल एल बी आफि. मुनफ, दारव्हा यांस शाळाखात्याकडे त्यांच्या मूळच्या जागीं परत करण्यांत आलें.

रा. रा. विहारीलाल बागडे, रिसोड या आनररी माजिस्ट्रेटच्या जागीं रा. रा. बालिभद्र लक्ष्मीचंद यांस माजिस्ट्रेट नेमण्यांत आले.

फौजदारी— आपला मुलगा शाळेंत जात असतांना त्यास राजश्री गुंडाप्पा यांनीं अडवून व त्याची छत्री फाडून घरीं परत धाडिलें ह्मणून रा० रा० नारायण वामन हरकोरे सरकारी स्टांप—व्हेंडर यांनीं फिर्याद केली असून ती येत्या १३ वे तारखेपर्यंत तहकूब आहे.

---

## नोटीस

आबदुला वल्लद चांदखा आपकारी चपरासी मु॥ बुलडाणा फीरोणे धाड यांसी खालील सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज आठ वर्षे झालीं तुह्मी मजला नेत नाहीं. व मी आपले पायानें तुमचे घरीं आले असतां तुह्मी जबरदस्तीनें काढून दिले तर आतां या नोटिशीनें तुह्मांस कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत तुह्मी मजला नांदावयास घेऊन जावे तसें न केल्यास मी हीच फारकती समजून दुसरा घरठाव करीन मग मात्र तुमचा नवरेपणाचा दावा चालणार नाहीं कळावे.
ता. १७-७१९०८

सही
बीबी मर्ई आबदुल्ला मुसलमान
नि. बांगडी मु॥ मेहकर.

नं. ग. ९९

---

## नोटीस

नोटीस बनाम सय्यद नुरुद्दीन साहेब वल्लद मौलवी महमद मासूम साहेब जहागिरदार मुक्काम बावरुळ इलाखा मोगलाई डागखाना— देऊळगांवराजा तालुका चिखली यांच्या मार्फत मांसः—

नोटीस देणार काजी सय्यद इमामुद्दीन उर्फ मौलवी महमद मुनंतजुबद्दीन मी खाली लिहिलेली जमीन विकतो, मौजे आकोली, कसबे, आकोला, सूकापूर, अकलकोट मौजे उंबरी मौजे कळमेश्वर, व सोमठाणा येथील जमीनींतील तुमचा हिस्सा वेगळा सोडून बाकाची सर्व जमीन मी मिरजा-आबासबेग साहेब ईनामदार आकोला यांस साडे सतरा हजार १७५०० रुपये नगदी घेऊन मी फरोक्त करितो. जर तुमची तुमची घेण्याची इच्छा असेल तर तुह्मी साडेसतरा हजार रुपये नगदी रोख घेऊन आज तारखे पासून पंधरा दिवसांत बाळापूर किंवा आकोला येथें यावें आणि सदर्हु रक्कम आह्मास देऊन खरेदीखत लिहून नोंदून घ्यावें. सदर्हु १५ दिवसांच्या मुदतींत तुह्मी रुपये घेऊन न याल तर आह्मी सदर्हु नामेनावर लिहिले प्रमाणें मिरजा साहेबांस खरेदी करून देऊं मग तुमची कांहीं तक्रार ऐकिली जाणार नाहीं. या करितां तुह्मास अगाऊ जाहिरनोटीस दिली आहे.

सही (उर्दूत)
शरीफ मुनतजुबद्दीन महमदमदी
नं. ग. १०० अफान हो दस्तुरखुःद

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गर्व्हनर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन मजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमचीं औषधें वरक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकाट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित झाला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरिरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेववें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधूमेह जुनाट परमा, मुष्ठमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १६५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ ।। चार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक पुडः-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे.

५ विंचूचें विषः-औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ७ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहांत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनी संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुरा खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल लेखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाचो निदान चिकित्सा कळवूं.

## अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असुन प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरू ला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीचें कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्लें वगैरे गावांतून तो पर्यवस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास ले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरातं न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकुण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पडेस वद्यै

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

## OR!ENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMBAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount t a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies maturee

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* to tmploying a portion of their annual income or profits in effecting life pol at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

. 2

## नोटीस

वऱ्हाड म्यु० कायद्याचे कलम १९० (१) अन्वयें

वऱ्हाड म्यु० कायद्याचें कलम ११६ पोट कलम १ (अ) (ई) चे अन्वयें केलेल्या नियमांचा ममूदा सर्वांचे माहिती करितां प्रसिद्ध केला जात आहे. ह्या ममूद्याचा विचार कमेटी ता० २९ माहे आगष्ट सन १९०८ ईसवींचे नंतर करील.

ज्या कोणास ह्या नियमासंबंधी हरकती अगर सूचना करावयाच्या असतील त्या त्यांनीं वरील तारखेचे आंत खालील सही करणाराकडेस लेखी कराव्या कळावें ता० २०।७।०८

रा. वि. महाजनी
व्हाइस चेअरमन
मुनसिपाल कमिटी
आकोला.

पुढें लिहिलेले नियम आकोले म्यु० कमेटीनें सन १८८६ चे वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ११६ (१) (इ) व ४१ (१) (बी) अन्वयें म्यु. हद्दींत भरणारे आठवडे व आठवड्यांतून दोन वेळां भरणारे बाजारावर कर बसविण्याकरितां केले आहेत.

१ आकोला म्यु० कमेटीचे हद्दींतील भरणाऱ्या बाजारांतील माल विकणाऱ्या सर्व लोकांवर प्रत्येक बाजारचे दिवशीं प्रत्येक दुकानाबद्दल तीन पै पासून तीं तीन आण्यापर्यंत असणारा जो बाजारचा कर तो म्यु० हद्दींत भरणाऱ्या बाजारावर बसवावा.

२ मेहेरबान डे० क० साहेब यांचे मंजुरातीनें म्यु. कमेटी एकादे बाजारची हद्द कोणती आहे हे वेळोवेळीं ठरवील व एखादे बाजारची हद्द वाढवील.

३ जे लोक बाजारांत माल विकण्यास आणणार त्यांना बसण्याकरितां प्रत्येक छावणी केलेल्या चबुत्र्याचे व म्यु. कमेटीस योग्य वाटल्यास प्रत्येक खुले चबुत्र्याचे सोईवार भाग केले जातील, व या प्रकारच्या केलेल्या भागास नंबर दिले जातील.

४ या नियमांचे उद्देशाकरितां दुकान या शब्दाचा अर्थ खालीं लिहिल्याप्रमाणें आहे ह्मणजेः--(अ) नियम तीन यांत सांगितले प्रमाणें एखादे चबुत्र्याचा केलेला भाग (ब) ज्या चबुत्र्याचे भाग केले नाहींत असे एखादे चबुत्र्यावरील ज्या जागेवर एकदा व्यापारी माल ठेवील ती जागा किंवा चबुत्र्यावर नसून बाजारचे हद्दींत ज्या जागेवर माल ठेविल ती जागा [क] बाजारांत विकण्याकरितां आणलेले प्रत्येक जनावरांनीं गुंतविलेली जागा [ड] ज्या वेळेस गाडींत किंवा गाडीतून माल विकला जाईल त्या वेळेस प्रत्येक गाडीनें गुंतविलेली जागा.

५ जीं दुकानें चबुत्र्यावर रेखून दिलीं असतील तीं म्यु कमेटीचे विचारास आल्यास त्यांनीं एक एक लिलावानें विकावी व ह्या प्रकारचे विकलेले दुकानचे खरेदीदार यांनीं दुकानची पूर्ण रकम लिलावाचे वेळीं दिली पाहिजे. या नियमा अन्वयें जीं दुकानें विकत दिलीं जातील तीं पोट मक्त्यानें देतां येतील.

६ नियम ५ प्रमाणें विकत दिलेलीं दुकानें खेरीज करून ज्या प्रत्येक दुकानानें जागा गुंतविली जाईल त्या प्रत्येक दुकानाकरितां या लगत जोडलेल्या परिशिष्टांत कोणत्या जातीचे व्यापाऱ्यांनीं किती कर द्यावयाचा आहे हें दर्शविलें आहे त्या प्रमाणें व्यापारी लोकांस कर द्यावा लागेल.

[अ] पहिली जुलई रोजीं जी तीनमाही सुरू होईल त्या तीनमाही करितां किंवा सदरील तीनमाहीचे कोणतेही आठवड्याकरितां जर एखादे छावणी केलेले चबुत्र्यावरील दुकान घेतले जाईल तर लगत जोडलेल्या परिशिष्टांत जे दर सांगितले आहेत त्याचे दुपट दर मागितले जातील. आणि जर सदरील दुकान तीन महिन्यांतून जाहिर मुदतीकरितां किंवा १ जुलई रोजीं सुरू होणाऱ्या तीनमाहींत नसणारे कोणत्याही एखाद्या आठवड्याकरितां दिलेले असेल तर त्या दुकानाबाबी परिशिष्टांत जे दर सांगितले असतील त्याचे दीडपट कर मागितला जाईल.

[ब] या नियमा अन्वयें जो कर द्यावयाचा असेल तो कर जर पैशाचा कांहीं अंश असेल तर त्या अंशाचा पुरा पैसा होईपर्यंत तो कर वाढवितां येतो.

[क] ज्या माल विकणारांचीं नांवें परिशिष्टांत लिहिलेलीं नाहींत त्या सर्वांस बाजारचा कर देण्याची माफी दिली आहे असें समजावें.

७ तंटा उत्पन्न झाल्यास कोणता व्यापारी कोणत्या जातीचा आहे त्याचा निर्णय करण्याचा अधिकार म्यु. चे अधिकारी यांस किंवा ज्या मनुष्याचे ताब्यांत बाजार असेल त्या मनुष्यास आहे. परंतु या निर्णयाचे हुकूमावर म्यु० कमेटीस अपिल चालेल.

८ नियम ६ प्रमाणें जो कर मागावयाचा आहे तो देण्यास जीं मनुष्यें इनकार करतील त्यांना लागलीच बाजारांतून काढून दिलें जाईल आणि हा नियम अमलांत आणण्याचे कामांत मक्तेदार याजला किंवा ज्या इतर मनुष्याकडेस बाजारचा वसूल करण्याचें काम सोंपविलें असेल त्याजला मदत करण्याचें काम म्यु० कमेटीचो अधिकारी किंवा ज्या दुसऱ्या मनुष्याचे ताब्यांत बाजार असेल त्याचें काम आहे.

९ प्रत्येक मनुष्य जो बाजारचा कर देईल त्याला रशिदीचे अन्वयें एक टिकीट पास मिळण्याचा हक्क आहे. असा हा कर जो मनुष्य वसूल करील त्याला हें तिकीट पास देणें भाग आहे. म्यु० कामिटीचे मंजुरातीनें वेळोवेळीं जसें ठरविलें जाईल त्याप्रमाणें या तिकिटाचा रंग व पासाचा नमुना असून त्यांत तपशील लिहिला जाईल.

१० नियम ५ यांत सांगतल्या खेरीज दुकानें पोट मक्त्यानें दिलीं जाऊं नयेत.

११ म्यु० कमेटीनें दुसरे प्रकारचा हुकूम केला नसल्यास बाजारचा कर वसूल करण्याचा हक्क दरसाल लिलावानें विकला जाईल. लिलावाचे साल १ एप्रील पासून सुरू होईल.

१२ बाजारचे कराचे बाकी करितां बाजारचा कर वसूल करणारे मक्तेदार यांजला दिवाणी कोर्टांत फिर्याद करितां येणार नाहीं.

१३ बाजारचा कर कोणत्या रीतीनें वसूल करावा या संबंधानें वेळोवेळीं म्यु० कमेटी जे हुकूम देतील ते बाजारचा कर वसूल करणारे मक्तेदार यांजला मान्य केले पाहिजेत.

१४ कोणी मनुष्य मक्तेदार याचा नोकर असून तो या नियमा विरूद्ध अपराध करील व उलट पुरावा नसल्यास सदर्हु प्रत्येक अपराध मक्तेदार यांनीं काना डोळा केल्या मुळें झाला आहे असें समजलें जाईल. आणि त्या अपराधास जी शिक्षा सांगितली असेल त्या शिक्षेस तो मक्तेदार पात्र होईल.

१५ देशी दारूचे चिल्हरविक्रिचे संबंधानें खालीं लिहिलेल्या गोष्टींस जे नियम लागूं होतील तसे नियम बाजारचे मक्तेदार यांस लागूं होतील.

अ मक्त्याचे विक्रीबद्दल.

ब मक्तेदार याजपासून जामीन मागण्या बद्दल.

क मक्त्याची रक्कम किती हप्तेबंदीनें द्यावयाची त्या बद्दल.

ड मक्ता रद्द झाल्यावर किंवा हप्तेबंदी अथवा पेषगी न दिल्यामुळें जे परिणाम होतील त्या बद्दल.

इ मक्ता पोटमक्त्यानें देण्याबद्दल.

परंतु मक्तेदार याजकडून जी रक्कम येणें असेल ती मात्र दंडाएवजी असो, किंवा इतर दुसरी असो, ती रक्कम सदर्हु मक्तेदार यांजकडून जसे कांहीं मालकाळीची बाकी येणें आहे असें समजून वसुल केली जाईल.

१६ जो मक्तेदार खालीं लिहिलेल्या गोष्टी करील तो प्रत्येक अपराधाबद्दल १० रुपयाहून जास्त नाहीं अशा रकमेचे दंडास पात्र होईल किंवा म्यु० कमेटीचे मंजुरातीनें त्याचा मक्ता रद्द केला जाईल व त्याचे अपराधाचें स्वरुप बघून त्याजवर फौजदारींत काम चालवावें असें वाटल्यास तो फौजदारी मुकदमा होण्यास पात्र होईल.

अ ज्या मनुष्यांस बाजारचा कर देण्याची माफी केली आहे त्या मनुष्या पासून बाजारचा कर वसूल करील तर.

ब ज्या मनुष्यांस कर देण्याची माफी केली नाहीं त्या मनुष्यांपासून जितका कर वसुल करावयाचा आहे त्या पेक्षां जास्त घेईल तर.

क नियम ९ यांत सांगितलेलें तिकीट [पास] देणार नाहीं किंवा तिकीटांत (पासांत) वाजवी नाहीं अशी नोंदणी करील तर.

ड कोणी मनुष्यांस किंवा कोणत्याही मालास अन्यायानें अकाटाऊन ठेवील तर.

ह्या नियमांपैकी सदरील नियमांत ज्या बाबी सांगितल्या आहेत त्या बाबी अशा प्रकारचे जे मक्ते दिले जातात त्यांत स्पष्ट पणें शेरीक केल्या जाव्यात

## बाजारचा कर वसुल करण्याची यादी.

### क्लास १

छावणीचे चबुत्र्यावरील जाग्याकरितां कलम ६ (ब) प्रमाणें व इतर जाग्याकरितां हरएक दुकानचा दर.

| दर बाजारास | | | तीनमाही | | | सहामाही | | | दरसाल. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| ० | १ | ६ | १ | ० | ० | २ | ० | ० | ३ | ० | ० |

| अ. नंबर | दुकानाचें वर्णन. |
|---|---|
| १ | बजाज [देशी व परदेशी कापड विकणारे.] |
| २ | कासार (तांबे पितळेचीं भांडीं विकणारे.) |
| ३ | मोठे सराफ (सोनें, चांदी, व नाणें विकणारे.) |
| ४ | मोठे भुसारी ग्रेन मार्केटच्या नियमांत न येणारे. |
| ५ | किराणा विकणारे (ठोक विक्रीदार.) |
| ६ | तुप विकणारे (ठोक विक्रीदार.) |
| ७ | बास विकणारे. |
| ८ | गुळ विकणारे. (ठोक विक्रीदार.) |
| ९ | हरास करणारे. |

### क्लास नं. २

छावणीचे चबुत्र्याचे वरील जाग्याकरितां कलम ६ (ब) प्रमाणें व इतर जाग्याकरितां हरएक दुकानचा दर.

| दर बाजारास | | | ३ माही | | | साहामाही | | | दरसाल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| ० | १ | ० | ० | १० | ० | १ | ४ | ० | २ | ० | ० |

| अ. नं. | दुकानचें वर्णन. |
|---|---|
| १ | तेल टेप विकणारे. |
| २ | हलवाई. |

| | |
|---|---|
| ३ | कसाई लहान मोठे. |
| ४ | आल, जंबुरा वगैरे रंगाचा व्यापार करणारे. |
| ५ | सण आणि तानपट्टी विकणारे. |
| ६ | चामडे विकणारे. |
| ७ | लहान सराफ [खुर्दा विकणारे.] |
| ८ | कापुस आणि सरकी विकणारे (कॉटन मारकेट खेरीज करून.) |
| ९ | सूत आणि दोर विकणारे. |
| १० | ठोक मिरची विकणारे. |

## क्लास ३

छावणीच्या चबुत्र्यावरील जाग्याकरितां कलम ६ (ब) प्रमाणें व इतर जाग्याकरितां दुकानचें वर्णन.

| दर बाजारास | | | तीनमाही | | | साहामाही | | | दरसाल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | रु | आ. | पै. |
| ० | ० | ३ | ० | ३ | ० | ० | ६ | ० | ० | १२ | ० |

| अ. नं. | दुकानचें वर्णन. |
|---|---|
| १ | रोटी विकणारे. |
| २ | मनारी [बांगड्या विकणारे.] |
| ३ | वतारी [जस्त आणि कथलाचे चिल्हर व्यापारी.] |
| ४ | लहान भुसारी व मीठ विकणारे. |
| ५ | चांभार. |
| ६ | शिंपी. |
| ७ | गेरू किंवा हुरमंजी विकणारे. |
| ८ | बारी. |
| ९ | नस विकणारे. |
| १० | लोहार आणि पंचाळ. |
| ११ | तंबाखू विकणारे. |
| १२ | भडमुंजे. |
| १३ | कुंभार. |
| १४ | पटवी. |
| १५ | गंधी. |
| १६ | टेप विकणारे. |
| १७ | चिल्हर तुप विकणारे. |
| १८ | चिल्हर गुळ विकणारे. |
| १९ | चिल्हर कपडा व पागोटी विकणारे जसे महार व मोमीन. |
| २० | चिल्हर किराणा व औषधी विकणारे. |
| २१ | बारुदवाले. |
| २२ | जिनगर. |
| २३ | धनगर [कांबळी व खादी विकणारे. |
| २४ | बुरुड. |
| २५ | फुलें आणि फळें विकणारे. |
| २६ | बागांतील भाजी व इतर होणारे उत्पन्न विकणारे. |
| २७ | गवत कडबी विकणारे व जळाऊ लांकडे विकणारे. |

| क्लास नं० ४ जनावरें | | दर जनावरास दर बाजारास दर. | | |
|---|---|---|---|---|
| अ. नं. | जनावराचें वर्णन. | रु. | आ. | पै. |
| १ | घोडे तट्टे वगैरे विकणारे. | ० | १ | ० |
| २ | म्हशी वगैरे विकणारे. | ० | १ | ० |
| ३ | गाई आणि बैल विकणारे. | ० | १ | ० |
| ४ | गाढव विकणारे. | ० | ० | ३ |
| ५ | शेळया मेंढ्या विकणारे. | ० | ० | ३ |

रा. वि महाजनी
व्हाइस चेअरमन
म्युनिसीपाल कमेटी
आकोला.

# NOTICE

Under section 150 (1) of the Berar Municipal Law.

The following draft of rules framed under Subsection (1) A (e) of the section 116 of the Berar Municipal Law 1886 is hereby published for general information.

The draft will be taken into consideratien after the 25th of August 1908

Persons interested are requested to send in their objection or suggestion if any to these rules in writing to the undersigned before that date

R. V. Mahajani
Vice Chairman Municipal
Committee Akola

Draft of rules for regulation and inspection of the levy of weekly market within the limits of the Akola Municipality under sub—section [1] A [e] of the section 116 of the Berar Municipal Law 1886.

I. A Bazar cess ranging from 3 Annas to 3 pies per stall for each bazar--day on all vendors of goods at periodical markets in the municipal limits of Akola town may be levied in bazars situated within Municipal limits.

2. With the sanction of the Deputy Commissioner, the Municipal Committee may from time to time determine what the limits of a bazar are and may extend the limits of any Bazar.

3. Every covered chabutra and if the Municipal Committee shall think fit, every uncovered chabutra in a Bazar shall be marked off into parts of size convenient for the occupation of persons offering goods for sale. Parts so marked off shall be numbered.

4 For the purposes of these rules a stall in a Bazar means:—

(a) Every part of a chabutra which has been marked off as provided in rule 3.

(b) The space ocupied by a trader who exposes goods on a Chabutra which has not been marked off, or in the bazar area, but not on a chabutra.

(c) The space occupied by every animal brought into the bazar for sale.

(d) When goods are sold in or from carts, the space occupied by each cart.

5. The Municipal Committee may in their discretion, sell by auction stalls marked off on chabutras singly Purchasers of stalls so sold must pay for them in full at the time of auction. Stalls purchased under this rule may be sub--let.

6. For every stall occupied in a bazar other than a stall purchased under rule 5, traders shall pay the cess specified in the annexed schedules as payable by persons of their class. provided.—

(a) That when a stall in a covered chabutra is taken for the quarter beginning on 1 st April, or for any week in such quarter, double the rates meationed in the annexed schedules shall be demanded, and when such a stall is taken for more than three months, or for a week, not in the quarter beginning on lst July, one and half times the cess mentioned in the schedules shall be taken.

(b) That if the cess payable according to this rule involves a fraction of a pice, such cess shall be) increased by the amount required to convert such fraction into full pice.

(c) That all vendors of goods who are not mentioned in the schedules shall be deemed to be exempt from the payment of bazar cess.

7 In case of dispute, the Municipal officer or other person in charge of a bazar shall, subject to an appeal to Municipal Committee, have power to decide to what class any trader belongs.

8. Persons refusing to pay the cess demandable under rule 6 may be forth-with removed from the bazar and it shall be the duty of the Municipal officer or other person in charge of the bazar, to aid the contractor or other person charged with the collection of the cess, in enforcing this rule.

9. Every person paying bazar cess shall be entitled to receive, and every person realizing such cess shall be bound to give, by way of receipt, a ticket, which shall be of such form and colour and contain such particulars as may from to time be prescribed by the Municipal Committee.

10. Save as provided by rule 5, the sub--letting of stalls is prohibited.

11. The right to realize cess shall, unless the Municipal Committee otherwise direct, be sold annually by auction The sale shall be for the year beginning on the lst April.

12. Contractors for the collection of bazar cess shall not be allowed to bring a suit in any Civil court for arrears of such cess.

13. Contractors for the collection of bazar cess shall be bound to comply with any orders which the Municipal Committee may from time to time issue regarding the manner in which the cess is to be collected.

14. Every offence against these rules committed by a person in the employ of a contractor shall, unless the contrary be shown, be deemed to have been committed with the connivance of such contractor, and he shall be liable to the penalty prescribed for such offence.

15 The rules by which the following matters may from time to time be regulated in connection with contracts for the retail vend of country spirits viz:—

(a) The sale of such contracts;

(b) The demand of securities from contractors;

(c) The instalments by which the amounts of such contract are to be paid.

(d) The penalties and consequences attaching to the non--payment of an advance, or an instalment or to cancellation of a contract;

(e) The sub--letting of contracts shall, so far as they are applicable, apply to bazar contractors provided that all sums due from such contractors, whether as instalments or by way of fine or otherwise, shall be realized as if they were arrears of land revenue due from such contractors.

16. Contractors who

(a) Realize bazar cess from persons who are not liable to pay such cess;

(b) Realize any thing in excess of what is due from persons who are liable;

(c) Fail to tender tickets prescribed by rule 1x or make incorrect entries on tickets;

(d) Wrongly detain any person or goods;

shall be liable to a fine not exceeding

Rs 10/ for each offence, or, with the sanction of the Municipal Committee, to have their contrcts cancelled. They will also be liable to criminal prosecution, should their offence render a prosecution desirable.

The provision of this section of the rules shall be clearly recorded in all such contracts as are here referred to.

## SCHEDULES.

| Class. 1 | | Rate per stall | | | |
|---|---|---|---|---|---|
| No. | Description of shops. | per week | per quarter | per H. year | per year |
| 1 | Cloth merchants ( Foreign or country ) | - 1 6 | 1 - - | 2 - - | 3 - - |
| 2 | Copper or brss pots sellers ( Kasars ) | | | | |
| 3 | Big shroffs ( shroffs who sell gold aud silver ) | | | | |
| 4 | Grain merchants, wholesale and retail ( except petty retail shops ) | | | | |
| 5 | Grocers wholesale and retail ( except petty retail shops ) | | | | |
| 6 | Ghee sellers wholesale and retail--do-- | | | | |
| 7 | Jaggery sellers wholesale and retail-do- | | | | |
| 8 | Auctioners | | | | |

| Class II. | | Rate per stall | | | |
|---|---|---|---|---|---|
| No. | Description of shops. | per week | per quarter | per H. year. | per year |
| 1 | Sellers of oil and oil cake | 1 | 10 | 1 4 | 2 |
| 2 | Confectioners. | | | | |
| 3 | Butchers beefs and mutton. | | | | |
| 4 | Traders in colour. | | | | |
| 5 | Sellers of hemp and tatpatti | | | | |
| 6 | Hide sellers | | | | |
| 7 | Petty shroffs ( Those who only sell change ) | | | | |
| 8 | Cotton and cotton seed sellers. | | | | |
| 9 | Thread and rope sellers. | | | | |
| 10 | Vegetable and garden produce sellers. | | | | |
| 11 | Building wood sellers. [ Timber rafters etc. ] | | | | |
| 12 | Grass and karbee and fire wood sellers ( except headloads | | | | |
| 13 | Mirchi sellers. | | | | |

| Class. 111. | | Rate per stall | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| No. | Description of shops. | per week. | per quarter | per H. year | per year | Blank column |
| 1 | Bread sellers. | 3 | 3 | 6 | 12 | |
| 2 | Bangle sellers ( Maniars ) | | | | | |
| 3 | Petty dealers in lead and pewter | | | | | |
| 4 | Petty salt and grain sellers. | | | | | |
| 5 | Shoe makers. | | | | | |
| 6 | Tailors. | | | | | |
| 7 | Red ochre sellers. | | | | | |
| 8 | Baris ( leaf sellers. ) | | | | | |
| 9 | Snuff sellers. | | | | | |
| 10 | Lohar panchale and sonars | | | | | |
| 11 | Tobacco sellers. | | | | | |
| 12 | Parched grain sellers. | | | | | |
| 13 | Potters. | | | | | |
| 41 | Workman in silk. | | | | | |
| 15 | Perfume sellers. | | | | | |
| 61 | Oil cake sellers. | | | | | |
| 17 | Petty cloth sellers. ( Turban and others ) | | | | | |
| 18 | Petty sellers of groceries and medicines. | | | | | |
| 19 | Fire wood sellers. | | | | | |
| 20 | Saddle makers, | | | | | |
| 21 | Kambal sellers. | | | | | |
| 22 | Basket sellers. | | | | | |
| 23 | Fruits and flowers sellers. | | | | | |
| 24 | Grinding store sellers. | | | | | |
| 25 | Yarn sellers. | | | | | |

| Class IV. | | | | |
|---|---|---|---|---|
| No. | Description of animals | Rate per animal per week. | | |
| 1 | Sellrs of horses and ponies. | | 1 | |
| 2 | Do- buffaloses. | | 1 | |
| 3 | " bullocks and cows | | 1 | |
| 4 | " donkeys | | | 3 |
| 5 | " sheep and goats | | | 3 |

R. V. Mahajani
Vice chairman Municipal
Committee
Akola


आमचें पेटंट यंत्र [illegible]कांना पसंत आहे.




मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस– सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पंसत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वाल्हेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

दोन घडयाळें एकदम बोलाविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस साखळी सुधां शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कीलीचें खिशातील घडयाळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.
नं. ४७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून बक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभडे व जे वग खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ताः----
अहमद अली कासमजी बोहरा
[illegible]नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.
स्थापना सन १९०७
भांडवल एक लक्ष रुपये.
प्रत्येक भाग २५ रुपयाचा
याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदहू कंपनीचें मेमोरॅंडम् व आर्टिकल्स [illegible] आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचे आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदहू आफिसांत [illegible] केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून
पी. सी. जोगळेकर
आणि कंपनी
म्या. एजंटस्
नं. १३


[illegible]त्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार [illegible] नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १० माहे आगष्ट सन १९०८ इसवी [अंक ३०


## NOTICE

Notice is hereby given that the Municipal Committee of Karanja have in their special meeting held on the 15th. July 1908, passed a resolution & proposed the imposition of a tax on vehicles & animals used for riding, driving, draught or burden, entering the Karanja Municipality under section 41 (1) A (d) of the Berar Municipal Law as set forth in the following rules.

RULES.

I. The tax as specified in the subjoined schedule shall, subject to the exemptions & explanations there mentioned, be levied on wheeled conveyances & animals entering the Municipal limits.

2. The Committee may appoint such establishment as may seem necessary for the collection of the tax or may with Commissioner's sanction, farm out the collection.

3. Every one who pays the single rate specified in the schedule shall be entitled to a printed receipt, & such receipt shall exempt the animal or conveyance in respect of which it was granted from further demand up to midnight of the day on which it was given.

4. Persons desirous of paying commuted rates may, on application obtain licenses in the form attached, but licenses shall only be issued for periods ending 31st. March, 30 th June, 30th September & 31 st December. Licenses for broken periods shall not be given. When the Committee collect the tax the licenses shall be issued at the Municipal office & when the tax is farmed, the licenses shall be issued by the Contractor. The licenses shall be personal & not transferable but shall include the holder's family, servants & guests. Each license shall pass one animal or cart belonging to the holder during each day.

5. Persons holding licenses at commuted rates shall produce them when entering the Municipality whenever called upon to do so by an officer authorized in this behalf by the Municipality or the farmer or his agent. Failures to comply with this rule will render the license—holder liable to pay single rate in addition in respect of the vehicle or animal.

6. Persons duly appointed for the collection of the tax are authorized to detain carts, other wheeled conveyances & animals until the tax is paid.

7. A copy of these rules shall be affixed in conspicuous place at the Municipal office & at such other places as may be deemed necessary.

Schedule

| | Single rate | | Alterna tive Commuted rate per | | |
|---|---|---|---|---|---|
| | Loaden | unloaden | year | Half year | quarter |
| Cart or other wheeled conveyance intended for carrying goods or the like | 9 | 6 | | | |
| Light or other wheeled carriage intended for driving purposes...... | 6 | 6 | 4 | 2 8 | 1 8 - |
| Horse, Pony & mule | 3 | | 1 8 | 14 | 8 - |
| Buffaloes, elephants, bullocks or Camels | 3 | | | | |
| Donkey....... | I | | | | |

EXPLANATIONS.

1. Horses, ponies, mules when ridden shall be deemed to be loaden.

2. A goods cart shall be considered unoaden if it merely carries the cooking pots, bedding, & clothing of the drivers and the day's fodder for the animals in the cart; in all other cases it shull be considered loaded if it carries any goods at all.

EXEMPTIONS.

The following animals and conveyances are exempted from the tax.

1. Municipal carts or animals or carts or animals carrying material belonging to the Municipality.

2. Bhishti bullocks or buffaloes.

3. Also the class of persons exempted under orders of Government of India Home department No. 163 dated 18th November 1881

4 The animals or vehicles carrying agricultural produce & implements or articles to be used for agriculture.

Form referred to in rule Iv

Application.

KARANJA ROAD TAX.

I ———————— residing at NO ————

Circle apply for a ———— license

for the period ending ———————— 190

Received Rupees ————————

———————————— 190

———————————— Signature

Counter foil Karanja Road tax

License is hereby

given to ————————————

residing at No. ————————

circle, to drive or ride

———————————————— passing

into the Municipal limits during the

period ending ————————————

———————————— 190

Received Rupees ————————

———————————— 190

———————————— Signature

The lisense will be personal & not transferable but will include the holder,s family, servants, and guests. It will only pass into the Municipal limits one animal or cart belonging to the holder during each day.

License.

KARANJA ROAD TAX.

License is hereby

given to ————————————

residing at No. ————————

circle, to drive or ride

passing ————————————

into the Municipal limits during

the period ending ————————

———————————— 190

Received Rupees ————————

———————————— 190

———————————— Signature

The lisense will be personal & not transferable, but will include the holder's family, servants, & guests. It will only pass into the Municipal limits one animal or cart belnging to the holder during each day.

Objections or suggestions if any to the above be submitted in writing within 30 days from the publication of this notice to the Secrtary of the Comittee.

Dated Karanja
the 22 july 1908 }

R. M. DONGAOKAR.
Secretary
Municipal Committee Karanja


## जाहिरात

मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक }
आकोला ९।९।०९ } G. A Phillips
एजंट

नं ७३


## नोटीस

बेशमी— पुती मर्द सुपडाजी ताठे रहाणार जीगांव ता. मल्कापूर यांसः——

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी पांच पिकें वाहित करण्यासाठीं आह्मांस दिलेलें सर्व्हे नंबर ६९ पैकीचे शेत आह्मी वाहण्यास गेलो तर त्याचा ताबा तुमच्याच आप्तांनीं होऊं दिला नाहीं. दांडगाई होईल असें दिसलें ह्मणून आह्मी घरीं परतलो. दुसरा भागीमदार शंभू वल्लद सोनाजी यानें आपल्या हिश्याबद्दल माझ्या कडून आपल्या भागणीचे ५० रुपये घेऊन मलाच ९-६-०८ रोजीं तुह्मी करून दिलेल्या पट्याचा सर्व हक्क देऊन टाकला आहे. ही नोटीस पोचतांच तुह्मी शेताचा ताबा मज नीटपणें मिळून द्यावा; नाहींतर माझ्या पांच वर्षांच्या भोगवट्याबद्दल नुकसानी बदल २०० रुपये तुह्मी भरून द्यावेत. असें आठ दिवसांत न केल्यास दिवाणींत दावा करून कोर्ट खर्चासुद्धां सर्व नुकसानी भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ३१ माहे आगष्ट सन १९०८ इ०

सही

अबदुल अजीज वल्लद शेख काद्रू

नं. ७२ द. खु. रहाणार नांदुरा.

बहिष्काराचा यंत्राचा वर्धोत्सव कशा रीतीनें पार पाडावयाचा याचा विचार करण्यासाठीं (ता. ३१ जुलई) रोजीं बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. त्या सभेंत बोलतांना ते ह्मणाले:—"रा. टिळक व मी यांचें एकच उपास्य दैवत नाहीं. माझीं राजकीय मतें व त्यांचीं राजकीय मतें एकाच प्रकारचीं नाहींत. राजकीय मतें कोणत्याही प्रकारचीं असलीं, तरी न्याय मिळणें प्रत्येक व्यक्तीचा अपरिच्छिन्न हक्क आहे, न्याय हा सिंहासनें व राज्यें यांचें संरक्षण करणारा एक तटच आहे. हिंदुस्थानांतील ब्रिटिश अमलाचाही तो मुख्य आधारस्तंभ आहे. लॉर्ड लिटन हे येथें व्हाइसराय असतां कायदे कौन्सिलमध्यें एकदां ह्मणाले होते कीं, अन्यायाची एकच कृति एशियाटिक लढाईंत झालेल्या मोठ्या थोरल्या पराजयापेक्षांही येथील ब्रिटिश अमलास अधिक अनर्थकारक आहे.

हिंदुस्थानांत न्यायाचा अंमल तंतोतंत व्हावा याबद्दल कोर्ट ऑफ डायरेक्टर्सलाही अत्यंत कळकळ होती. "लोकांना तंतोतंत न्याय मिळाला पाहिजे इतकेंच नव्हे, तर तो तसा आपल्याला मिळाला अशी त्यांची खात्रीही झाली पाहिजे" असें त्यांनीं आपल्या एका खलित्यांत ह्मटलें होतें.

रा. टिळक यांच्या खटल्यांत लोकांची अशा प्रकारची खात्री झाली असें ह्मणतां येईल काय? रा. टिळक यांना मिळालेली शिक्षा, चिदंबरं पिले यांना मिळालेली जन्मठेप व इतर वर्तमानपत्रकर्त्यांना व वक्त्यांना झालेल्या शिक्षा हल्लींच्या स्थितीचे वस्तुपाठच होत. हल्लींची स्थिति किती भयंकर आहे याचें या गोष्टी उत्कृष्ट आविष्करण करितात. आजच्या सारखा आणीबाणीचा प्रसंग आपल्यावर यापूर्वीं कधींही आला नव्हता. आजच्या स्थितींत आपण काय करावयाचें, हा आपल्यापुढें मोठा महत्वाचा प्रश्न आहे. आपल्या देशाभिमानी कार्याचें गाडें येथेंच थांबवून धरावयाचें, आलेलें तुफान आपोआपच शमेतोंपर्यंत समुद्रांत नांगर टाकून खलाशांनीं स्वस्थ बसावयाचें किंवा ईश्वराच्या कृपेनें हे ढग वितळून जातील व आपलें जहाज बंदरावर उतरेल असा पूर्ण भरंवसा धरून आपण आपला मार्ग आक्रमावयाचा या प्रश्नाचाच आपल्यास निर्णय करावयाचा आहे.

ज्या कार्यास आपल्या कित्येक देशबंधूंनीं आपलें जीवित अर्पण केलें आहे, तें देशाभिमानी कार्य आपण येथेंच थांबवून धरावें असें ह्मणणारांपैकीं मी नाहीं. कॉन्स्टिटयूशनल मार्गाच्या चळवळीवर आपला पूर्ण भरंवसा आहे. त्याच मार्गानें आपलें येथपर्यंत आलेलें कार्य पुढें चालविलें पाहिजे असें माझें मत आहे. कायदेशीरपणा हें आपलें व्रत आहे. वसाहतीचें स्वराज्य हें आपलें उद्दिष्ट आहे, व्यवस्थितपणा राखणें ही आपली पद्धत आहे व स्वदेशी आणि बहिष्कार हीं आपल्या औद्योगिक व राजकीय उन्नतीचीं हत्यारें आहेत.

क्रांतीवर माझा बिल्कुल विश्वास नाहीं. मी उत्क्रांतीचा चहाता आहे. कोणीही गोष्ट एकदम किंवा अकस्मात घडून येईल यावर माझा बिलकूल भरवसा नाहीं. क्रमाक्रमानें आपली अभिवृद्धि होत जाऊन आपला जीवनक्रम नवीन प्रकारचा होईल यावरच माझी सारी भिस्त आहे. या नवीन आयुष्यक्रमांत जुने व नवे लोक या दोघांचीही थोडेसें देवाण घेवाण करून सहज नांदणूक होईल अशी मला उमेद आहे."

अलीपूर कोर्टांतील बॉम्बप्रकरणाच्या चौकशींत नरेंद्रनाथ गोस्वामी यांनी आपल्या साक्षींत उल्लेख केलेले पी. एम्. बापट नांवाचे इसम अद्याप पकडण्यांत आले नमून त्यांच्यासंबंधानें जाहिरनामा (प्रोक्लेमेशन) काढण्यांत आला आहे.

दुय्यम शिक्षणाच्या सुधारणेसंबंधानें सर जॉन ह्युएट यांनीं हिंदुस्थानसरकारास एक महत्वाचें पत्र लिहिलें असून त्यांत विद्यार्थीवसतिगृहें, दुय्यम शिक्षणाच्या शाळांच्या नव्या इमारती वगैरे बांधण्याकरितां ९ लाख रुपये व दुय्यम शिक्षणावर दरसाल सुमारें साडेपांच लाख रुपये जादा खर्च करण्याबद्दल हिंदुस्थानसरकारची मंजुरी मागितली आहे.

इंग्लंडांतील वकीलवर्गाकडून होत असलेल्या उपयुक्त कामगिरीबद्दल मि. आस्क्विथसारखे थोर गृहस्थही त्यास धन्यवाद देत आहेत, परंतु हिंदुस्थानांतल्या वकिलांचें कायदे कौन्सिलांतलें प्रस्थ कमी कसें करावें याचा विचार इकडील अधिकाऱ्यास पडला आहे. राजकीय चळवळींत वकील पुढारी ह्मणून इंग्लंडांत कांहीं समाजहितास अपाय होत नाहीं, तर हिंदुस्थानांत तरी तसा अपकार होण्याची धास्ती कां वाटावी हें समजणें कठिण आहे.

देशांतील तरुणांनीं शिस्तीनें व आत्मसंयमनानें वागण्याची सध्यांच्या प्रसंगी जितकी अवश्यकता आहे, तितकी आमच्या देशाच्या इतिहासांत कधींही उत्पन्न झाली नसेल. अध्ययनाची हयगय करून आंधळेपणानें व सारासार विचार न करितां, अत्यंत भानगडीच्या अशा राजकीय चळवळींत विद्यार्थ्यांनीं आपणांस गुरफटून घेणें ही फार भयंकर चूक आहे असें आह्मांस वाटतें. काळजीपूर्वक व तत्परतेनें अध्ययन करून समाजाची उपयुक्त कामगिरी बजाविण्यास विद्यार्थ्यांनीं समर्थ व्हावें व अशा रीतीनें त्यांनीं आपल्या मातृभूमीवरील प्रेम व्यक्त करावें अशी त्यांस आमची विनंति आहे. विद्यार्थी हेंच आमच्या भावि आशेचे आधारस्तंभ आहेत; त्यांच्या बऱ्या वाईट वर्तनावर साऱ्या राष्ट्राचें कल्याण अकल्याण अवलंबून आहे. सध्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगाला भलतेंच हानिकारक स्वरूप प्राप्त होऊं नये ह्मणून तरुण पिढीनें आह्मांस मदत करावी अशी मागणी करणें न्याय्य होणार नाहीं काय? विद्यार्थ्यांनीं मनोवृत्ति प्रक्षुब्ध करणाऱ्या अशा भयंकर कल्पनांना आपल्या मनांत थारा देऊं नये; जीवितयात्रा यशस्वी होण्यास गुरुजनांच्या आज्ञेचें परिपालन, विवेकशीलता व विमृश्यकारिता या गोष्टींची अत्यंत अवश्यकता आहे हें त्यांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. ज्ञा. प्र.

स्वयंपाकगृह हें खरें ह्मटलें असतां बायकांचें स्वराज्य आहे. आमचे पुरुष आजकाल स्वराज्य मिळविण्याची धडपड करित आहेत आणि इकडे आमच्या बायका आपल्या ताब्यांतील स्वराज्याचा कंटाळा करून तें परक्याच्या हवालीं करूं लागल्या आहेत! परक्यांच्या हातांत आपलें राज्य सोंपविणें आणि परक्यांच्या हातून पाणी पिणें, यांत आमच्या स्त्रियांनां काय थोरपणा वाटत असेल तो त्यांचा त्यांनांच ठाऊक! दोन पिढ्यां मागच्या स्वयंपाकघरांची आजच्या स्वयंपाकघरांशीं तुलना केली तर त्यावेळची स्वच्छता, त्यावेळचा शुचिर्भूतपणा त्या वेळचे सोंवळें आज कितीक घरांतून दिसून येईल? त्या वेळचें पाककौशल्य आज कितीक स्त्रियांत आढळून येईल! आजकालच्या स्त्रियांचें सारें लक्ष्य दिवाणखानें शृंगारण्यांत, बैठकीच्या जागा व्यवस्थित ठेवण्यांत-अर्थात् बाह्य शोभेंत गुंतलेलें असतें. स्वयंपाकघरांतील स्वच्छतेकडे, निर्मळपणाकडे, व्यवस्थेकडे त्या कधीं ढुंकूनहि पाहत नाहींत, असें ह्मणण्यास विशेषशी हरकत नाहीं.

✓ पुष्कळांनां आज कांहीं करावयाला नको असतें; पण उद्यां मोठमोठीं राज्यें सर करण्याचे त्यांचें बेत मात्र चाललेले असतात!

✓ सौजन्याला काय वाटेल ती किंमत पडो, त्याचा संग्रह करा. सौजन्य तुमच्या गांठीला असेल तर स्वाभिमान, सन्मान आणि उद्योगांत यश हे चक्रवाढ व्याज तुह्मांला मिळेल.

✓ जिव्हा ही बायकांची तरवार आहे आणि ती गंजू नये ह्मणून त्या तिला नेहमी पाजळीत असतात! मा. म.

प्लूटार्क नामक एका ग्रंथकारानें लिहिलें आहे:—"कमी महत्वाची एखादी अल्पशी कृति, अल्प भाषण किंवा विनोद ह्यांच्या योगानें मनुष्याचा खरा स्वभाव जसा व्यक्त होतो, तसा मोठमोठ्या लढायांच्या व वेढ्यांच्या वर्णनानेंही होणार नाहीं."+ हें जसें मनुष्याविषयीं आहे, तसें मोठमोठ्या राजकारणासही लागूं आहे; ह्मणून तीं संग्रह करण्याचा युरोपियन राष्ट्रांत फार प्रचात आहे. इ. सं.

"कोणतेही गोष्टीचा संशय येऊं नये. कोणी सांगितल्यास एकूं नये. कदाचित् मनांत आल्यास वेगळे वाटेनें बोलून निराकरण होत असावें. घरांतील गोष्ट बाहेर जाऊं नये. गेल्यानें दौलतीचें कामांत व दावांत कमी पडून उपहास होतो. खावंदाचे दाबावर, दौलतीचे काम करावें लागतें. यास्तव कोणतेंही कामास आंतुन फूस व गुढगा नसावा. येणेंकडून कारभारी यांचा दाब राहत नाहीं. सरकारकामास उणें पडतें. हरएक कामाची भवती न भवती माहितगारीसाठीं करावी. परंतु शेवटी कारभारी समजोन विनंती करितील ती मान्य होत असावी. आड पडूं नये, व खास दस्तुर कोणास लिहु नये. हे रस्म राखली असतां मोठे कामावर समयास उपयोगी पडावयाची त्यास जपणें असावें. शिक्का मोर्तब कारभारी यास कळल्याशिवाय होऊं नये. दौलतीची माहितगारी नाहीं. समक्ष येऊन हरएक कामाची माहितगारी होत असावी. येणेंप्रमाणें करार." नाना फडणविसांचा उपदेश

✓ ज्या वेळीं न्या. दावर ह्यांचें नांवसुद्धां कोणाच्या स्मरणांत राहणार नाहीं, ज्या वेळीं हल्लींच्या परिस्थितीचा अवशेषही भूप्रदेशावर उरणार नाहीं व ज्या वेळीं हल्लीं मी मी ह्मणणारे सर्व विद्वान् अनंत कालाच्या एका घाणेरड्या कोपऱ्यांत धूळ खात पडतील त्या वेळींही 'धन्य टिळक' 'धन्य टिळक' असे टिळकांचे स्तुतिपाठ लोक गात बसतील. एका न्यायाधिशानें येशू ख्रिस्ताला बदमाष ठरवून, बदफैली ठरवून, बेद्रली उत्पन्न करणारा असें ठरवून, शांततेचा भंग करणारा असें ठरवून फाशीची शिक्षा दिली. येशू ख्रिस्त फाशी गेला, परंतु त्याच बदमाषाचे आज एक चतुर्थांश जग भक्त बनून त्यास देवाप्रमाणें मानीत आहे व त्याला बदमाष ह्मणणाऱ्या धीटपोट न्यायाधिशाला जगांतील दरिद्री ह्मातारीसुद्धां मान देत नाहीं. आमच्या टिळकांचेंसुद्धां असेंच आहे. टिळक हे नीतिमान्‌पणाचे पुतळे आहेत, ते चांगुलपणाची मूर्ति आहेत, ते प्रत्यक्ष सत्वगुणाचे अवतार आहेत. अन्यायानें ते दहा वेळ तुरुगांत गेले तरी त्यांच्याविषयीं लोकांचे मनांत असलेली परमावधीची प्रीति एका अणुप्रमाणानेंही कमी होणार नाहीं. न्या. दावरनीं त्यांच्या देशभक्तीची टवाळी करून स्वतःचामात्र उपहास करून घेतला आहे. दे. से.

ता. २९ रोजीं लाला हरकिसनलाल हे विलायतेस जाण्यासाठीं येथुन निघणार आहेत. पेंटा नवेंबरांत ते पुन्हा परत येणार असें ह्मणतात- इ. प्र.

## वऱ्हाडसमाचार

श्रावण शुद्ध १३ शके १८३०

### तुर्कस्थानचें स्वराज्य.

तुर्कस्थानांत प्रातिनीधिसत्ताक राज्यपद्धति सुरुं झाल्याचें आनंददायक वर्तमान गेल्या आठवड्यांतच वाचकांस कळविलें आहे. तुर्कस्थानच्या, किंबहुना सर्व मुसलमानी समाजाच्या इतिहासांत अद्भूतपूर्व असा हा प्रकार असल्यामुळें त्याचेमुळें जितका आनंद तितकेंच आश्चर्यहि वाटणें सहाजिक आहे. गेल्या कांहीं वर्षांचा तुर्कस्थानांतील हकीगतींचा इतिहास ज्याचे ध्यानांत असेल त्याला तरी, सध्यांचा प्रकार ह्मणजे जुन्या मराठी सहाव्या पुस्तकांतील यक्षिणीची कांडी फिरल्यामुळें घडून आलेला अत्यंत इष्ट असा चमत्कार होय, असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. ज्या देशांतील भिन्न भिन्न तटांच्या व पक्षांच्या लोकांमधील अव्याहत यादवीखेरीज दुसरें कांहीं ऐकूं येत नव्हतें, त्याच देशांतील लोक क्षणमात्रांत संतुष्ट व शांत झालेले पाहून कोणाला अचंबा वाटणार नाहीं? युरोपियन ग्रंथकारांनीं तुर्कस्थानचा अलिकडच्या काळचा जो इतिहास लिहून ठेवलेला आहे त्यांत, ख्रिस्ती व महमदी या दोन वर्गांचे

परस्परांशीं झगडे आणि नवीन पद्धतीची राज्यव्यवस्था आपल्या देशांत असावी अशी इच्छा करणारें तरुण पिढीचे तुर्क व त्यांच्या विरुद्ध मतांचीं मागील पिढींतील जुनीं खोडें यांमधील द्वैत यांचा बुजबुजाट दिसून येतो. तुर्कस्थानांत नांवाला स्वराज्य होतें, पण तें सुराज्य नव्हतें, ह्मणून त्याच्या जागीं खरोखरीचें स्वराज्य स्थापावें अशाविषयीं नवीन पिढीची सारखी खटपट चालू होती. ज्यांच्या हातीं थोड्याबहुत प्रमाणानें सत्ता होती ते जुनीच पद्धती पुढें चालू ठेऊन आपल्या छत्राखालीं असमान्यांच्या डोक्यावर सारखा वरवंटा फिरविण्याविषयीं धडपड करीत होते. पण प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति स्थापण्याच्या मुलतानसाहेबांच्या निश्चयामुळें सर्वच मन्वंतर बदललें आहे. आपल्याला राष्ट्रद्रोही लोकांनीं आजपर्यंत फसविलें असें त्यांनीं जाहिर केलें असून नव्या पद्धतीविषयीं आपल्या मनांत किती आदर आहे हें त्यांनीं कुराणाची आण घेऊन प्रसिद्ध केलें आहे. सुलतान साहेबांनीं हा जो अत्यंत प्रशंसनीय असा मनोनिग्रह केला त्यामुळें तुर्कस्थानच्या प्रजेचीं मनेंही पाकटलीं आहेत. सुलतान साहेबांच्या ख्रिस्ती प्रजेनें महमदीयांशीं असलेलें आपलें वैर टाकून दिलें आहे आणि नव्या विचारांच्या लोकांना आपले हितकर्ते ह्मणून कवटाळण्यास जुने लोक पुढें सरसावले आहेत. 'राजयक्ष्मा' झालेल्या तुर्की राष्ट्रांत चैतन्य मूर्तिमंत संचरलेलें दिसत आहे आणि वैमनस्याची जागा प्रेमानें भरून काढली आहे. तुर्कस्थानांतील हा अनुभव जर इतर राष्ट्रांना मार्गदर्शक होणें शक्य नसेल तर मात्र तें अत्यंत आश्चर्य वाटावें लागेल. ज्या देशांतील यच्चयावत् प्रजा एकाच वर्गांतील आहे अशा देशांखेरीज इतर ठिकाणीं प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति उपयोगी नाहीं, या 'कायम ठराव्या' सवबीला तुर्कस्थानच्या उदाहरणानें बिनतोड उत्तर मिळत आहे. आमच्याच देशाचें उदाहरण घेतलें तर, आमच्यांतील भिन्न भिन्न धर्मांच्या वर्णांच्या अगर वर्गांच्या प्रजेमुळें आमच्या देशांत प्रतिनिधिसत्ताक पद्धति यशस्वी होणें शक्य नाहीं असें प्रतिपादण्यांत येत असतें. असलें अयथार्थ प्रतिपादन करणारे आमच्या राष्ट्राचे हितशत्रु आहेत याविषयीं मुळींच कोणास शंका नाहीं. पण जगाच्या इतिहासांत यापूर्वीं घडलेल्या प्रकारांवरून आणि आतांच्या तुर्कस्थानच्या ताज्या उदाहरणावरून हीच गोष्ट निश्चित होते कीं, जेथें भिन्न जातींच्या कारणांमुळें सुराज्य व्यवस्थितपणें चालण्यास अडचण पडत असेल अशा ठिकाणीं प्रतिनिधिसत्ताक पद्धति हाच निर्वाणीचा आणि सत् असा उपाय आहे. निरनिराळ्या जातींच्या किंवा वर्णांच्या लोकांची राज्यकारभारांत प्रवेश करून दिला ह्मणजे केवळ वर्णांच्या भिन्नत्वावरून उत्पन्न झालेलें द्वैत नाहींसें होतें असा पूर्वींचा अनुभव आहे. आणि सृष्टिनियमाप्रमाणें तो असाच असावयास पाहिजे. दररोज, हरघडी मांडीशीं मांडी लावून राज्यकारभार जबाबदारीनें चालविणारांमधील निष्कारण वैमनस्य लयास गेलेंच पाहिजे; युरोपांतील ऑस्ट्रिया व हंगेरी या देशाच्या प्रजेमधील अनेक प्रकारच्या भेदांमुळें कितीतरी निकराचे असे प्रसंग वारंवार घडून येत असत. पण त्या सर्वांचा निकाल आस्ट्रियाहंगेरीच्या संयुक्त राष्ट्राच्या प्रतिनिधिसत्ताक राज्यव्यवस्थेमुळें लागला. या सूज्ञतेच्या उपक्रमामुळें पूर्वींचे पक्षभेद नष्ट झाले आणि उभयराष्ट्रांनीं मान्य केलेल्या राज्यपद्धतीविषयीं व फार तर काय खुद्द राजघराण्याविषयीं सर्व बाजूंनीं अत्यंत आदर व निष्ठा हीं प्रकट झालीं. अल्पसंख्याक वर्गांच्या हितसंबंधाची जपणूक व्हावयास पाहिजे तर प्रतिनिधिसत्ताक पद्धति उपयोगी नाहीं, या सबबींत तर मुळींच कांहीं जीव नाहीं. कारण पार्लमेंटाची स्थापना करून ऑस्ट्रियाहंगेरींत अल्पसंख्याक वर्गाच्या हिताची योग्य तितकी जपणूक केली जात आहे आणि तुर्कस्थानच्या नव्या उपक्रमांत देखील असाच अनुभव येईल असा पक्का भरंवसा बाळगण्यास जागा आहे. तुर्कस्थानांतील आल्हादजनक प्रकारावरून आणखी एक बोध घेतां येण्यासारखा आहे. तुर्कस्थानांत थोड्याच दिवसांपूर्वीं प्रजेंत सर्वत्र असंतोष पसरलेला होता, त्याचेजागीं आतां सर्वत्र समाधान दिसून येत असून राजघराण्याविषयीं सर्व प्रजेच्या अंतःकरणांतील आदर स्थिर झाला आहे. तुर्कस्थानांत असा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो तर हिंदुस्थानांतील लोकांना स्वराज्याचे हक्क दिल्यास तसेंच होणार नाहीं असें कसें ह्मणतां येईल? एका ठिकाणीं यशस्वी झालेला उपाय दुसऱ्या ठिकाणीं सिद्धीस नेईलच असें नाहीं, किंवा एकाला हितकर होणारी गोष्ट दुसऱ्याला अपकारक नाहीं कशावरुन? अशा कोटिक्रमामुळें येथें कोणी फसणार नाहीं; ज्या ज्या ठिकाणीं स्वराज्याचे हक्कामुळें फायदा झालेला आहे तेथील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावरूनच हिंदुस्थानाचा हक्क पुढें करण्यांत येत आहे. हिंदुस्थानचें राज्य कंपनीच्या द्वारा कसें मिळविलें गेलें याचा आतां कोणी खल करीत नाहीं; ब्रिटिश राज्यापासून हिंदुस्थानचें हित झालें किंवा नाहीं हाही प्रश्न आतां वादाचा नाहीं. तुर्कस्थान इराण व चीन यांच्या जागृतीनंतर हा प्रश्न साहजिकपणें पुढें येतो कीं आतां यापुढें ब्रिटनला हिंदुस्थानचे बाबतींत पुण्य व पुरुषार्थ संपादण्याचा मार्ग कोणता? या प्रश्नाचा जबाब तुर्कस्थानापासून शिकणेंच ब्रिटनच्या इभ्रतीस जास्त श्रेयस्कर आहे. 'पुराणप्रिय आशिया' वगैरे पांचट जल्पना करण्यांचे दिवस निघून गेले. आशियांत एकदां उत्क्रांती जोरानें सुरू झाल्यानंतर ती इतक्या झपाट्यानें प्रसार पावत आहे कीं दर घटकेस आशियांतील प्रत्येक राष्ट्रांत घडून येणाऱ्या प्रकारानें पाश्चिमात्य राष्ट्रांना आ वासून स्तंभित व्हावें लागत आहे! इतक्यावरच भागे तर आशियानें खैर केली असें ह्मणण्याची पाळी युरोपास खास येणार.

---

## पुस्तक परीक्षण.

**संस्कृत शब्दरूपाकर.** हें पुस्तक पुणें येथील नूतन मराठी विद्यालयांतील शिक्षक रा० दत्तात्रय केशव जोशी यांनीं तयार केलें आहे. याचे पांच भाग आहेत. पहिल्या भागांत स्वरान्त शब्द अकार विल्हेनें चालवून दिले आहेत. प्रत्येक शब्दाचा अर्थ दिला असून अर्थानें फिरणारीं रूपें समग्र चालविलीं आहेत. उदाहरणार्थ स्व, कुमारी, प्रधी, सखी ई शब्द पहा. दुसऱ्या भागांत व्यंजनान्त शब्द ककार विल्हेनें समग्र चालविले आहेत. मरुत् इरित् तक्ष् शब्द पहा. तिसऱ्या भागांत सर्वनामांचें वर्गीकरण करून तीं सर्व चालवून दिलीं आहेत. चौथ्या भागांत संख्यावाचकें व पांचव्या भागांत धातुसाधितें चालविलीं आहेत. प्रत्येक गणाचा धातु व त्यांत विशेष असणारे धातु घेऊन ते चालविले आहेत. शेवटीं शब्दांची सूची जोडली आहे त्यामुळें कोणताही शब्द तेव्हांच पाहतां येतो. या प्रमाणें या पुस्तकाचें स्वरूप आहे.

या विषयावर आजवर जीं पुस्तकें आमचे पाहण्यांत आलीं त्यापेक्षां यांत व्यवस्थितपणा व विस्तृतपणा जास्त व्यक्त होत आहे. हें एक पुस्तक जवळ असल्यानें संस्कृत व्याकरण ग्रंथांत सांगितलेले सर्व नियमित व अनियमित शब्द उत्तम प्रकारें चालविता येतील. जुन्या पद्धतीनें व नव्या तऱ्हेनें संस्कृत शिक्षणास हें पुस्तक अतीशय उपयोगाचें झालें आहे. विद्यार्थ्यांस अडचण कोठें पडते व त्यांस काय पाहिजे आहे याचा विचार करून हें पुस्तक तयार केल्यामुळें विद्यार्थ्यांस मोठें सहाय झालें आहे. एकंदर सुमारे सातशे शब्द चालवून दिले आहेत. पुस्तकाचीं पानें सुमारें शंभर आहेत त्या मानानें किंमत नऊ आणे फार नाहीं. क्रियापदें चालविण्यास जसा धातुरूपकोश तसा नामें चालविण्यास हा **शब्दरूपाकर** विद्यार्थ्यांस उपयोगी पडेल अशी आमची पक्की खात्री आहे; ह्मणून प्रत्येक संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यानें व संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकानें हें पुस्तक जवळ ठेवावें अशी शिफारस करून आह्मी ग्रंथकारांची रजा घेतों.

---

## नोंदणीची वाढ ही संपन्नतेची खूण!

मध्यप्रांतांत नोंदणी खात्यानें गेल्या तीन वर्षांत नोंदलेल्या व्यवहारांची संख्या शें. ११ नी वाढली, यावरून रयतेची भरभराट सिद्ध होते, असा कयास विघ्नसंतोषी लोकांखेरीज कोणी काढणार नाहीं. फार झालें तर या वाढत्या नोंदणीवरून असा तर्क काढतां येईल कीं मध्यप्रांतांत मिळकतीचा कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपांत विनिमय वाढत्या प्रमाणांत आहे. हिंदुस्थानचा आयात व्यापार वाढीस लागला यावरून लोकांची सांपत्तिक स्थिति सुधारली असें बिनदिक्कत ह्मणण्यापैकींच आरंभीं सांगितलेला कयास आहे, हें सहज ध्यानांत येईल. देशांत परठिकाणाहून द्रव्य येण्याचें बहुतेक बंद पडल्यावर आणि नित्याच्या वाढलेल्या गरजा भागविण्यासाठीं देखील परकीयांच्या तोंडाकडे पहाण्याची स्थिति आल्यावर, लोकांची सांपत्तिकस्थिति सुधारली आहे, लोक पूर्वींपेक्षां जास्त संपन्न झाले आहेत, हें ह्मणणें जितकें चुकीचें, तितकेंच नोंदणीच्या वाढीवरून लोकांची भरभराट स्थापित करूं जाणें फसवणुकीचें आहे. जोंपर्यंत हातांत पैसा खेळतो आहे. किंवा नुसत्या पतीवर पैसा मिळतो आहे. तोंपर्यंत घरांतलें भांडें गहाण ठेवून पैसे आणणारा खुळा व्यापारी कोठेंही सांपडावयाचा नाहीं. व्यापारी काय किंवा शेतकरी काय आपल्या मुख्य तारणावर बोजा वाढवीत जाऊन ह्मणजे ऋण करून, सण करण्याइतके वेडगळ खास नसतात. पण हिंदुस्थानांत तेहतीस कोटि वेड्यांचें एक जंगी इस्पितळ आहे अशी ज्यांची समजूत असेल किंवा तसें ह्मणण्यांत ज्यांचा कांहीं फायदा असेल त्यांना मात्र वरील प्रमाणें कयास केल्यावांचून गत्यंतर नाहीं. मध्यप्रांतांत व आमचा वऱ्हाड प्रांत यामध्यें शेतीचा व व्यापाराचा सर्वांत जास्त किफायतीचा व ह्मणूनच महत्वाचा प्रकार कपाशी हा होय. ही कपाशी कित्येक वर्षेंपर्यंत शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना बरकत देत गेली ही गोष्ट खरी. पण गेल्या दहा वर्षांतील भयंकर दुष्काळानंतरही ती बरकत तशीच अव्याहत चालत असली पाहिजे असा हेका धरणें ह्मणजे जाणून बुजून दुराग्रह होय. पहिल्या अमदानींत संग्रहीं ठेवलेला पैसा दुष्काळाच्या पायीं सपून गेल्यानंतर आणि कपाशी खेरीज इतर धंद्यांना तेजी नाहींशी झाल्यावर कसेंही करून तोच मार्ग ज्यांना पतकरावा लागतो अशा शेतकऱ्यांनीं आपल्या जमिनी, घरेंदारें किंवा इतर मोठी मिळकत गहाण अगर अन्यमार्गानें सावकाराकडे लावून देऊन त्या आधारावर भांडवल पैदा केलें, तर तें काय तो जास्त श्रीमंत झाला ह्मणून? येवढ्याच मोठ्या व्यवहारांत पतपेढ्यांचा अभाव हीच गोष्ट या नोंदणीच्या वाढीच्या मुळाशीं आहे. शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना पतीवर भांडवल मिळण्याची सोय नसल्यामुळें ही इतकी मिळकतीची अदलाबदल वाढत चालली आहे. ती लोकांच्या भरभराटीची खूण नसून व्यापाऱ्यांच्या व शेतकऱ्यांच्या निकृष्टावस्थेचीच आहे यांत शंका नाहीं.

---

## वाचनमंदिर.

**माडर्न रिव्ह्यू** — या मासिकाचा ताजा अंक नेहमीप्रमाणेंच विविध विषयांनी खचलेला आहे. लेडी इझाबेल मार्गेसन या आंग्ल विदुषिनें 'शिक्षणांत स्वातंत्र्य प्रधान कीं अधिकार' या आशयाच्या मथळ्याखालीं लिहिलेल्या लेखाला संपादकांनी प्राधान्य दिलें आहे त्यांच्या विवेचनाचा इत्यर्थ असा आहे कीं शिक्षण या शब्दाचा सर्वबाजूंनीं सुसंस्कार असा विस्तृत अर्थ घेतल्यावर तें फलद्रुप होण्याचें शेवटीं मूल व मातापितर यांच्यामधील संबंधाच्या स्वरूपावर अवलंबून राहील उभयतांमध्यें मैत्री असेल आणि तेणेंकरून मुलाला कांहीं थोडीशी मोकळीक वाटत असेल तर त्या पासून मुलाच्या शीलाच्या घटनेवर चांगला परिणाम होईल प्राप्ते शोडषे वर्षे इ. सुभाषित सुप्रसिद्धच आहे. कंपनी सरकारच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला, हें आतां सप्रमाण सिद्ध झालें आहे. व्यापारासंबंधाचा सर्व मक्ता आपल्याकडे घेऊन इतरांनी तोच व्यापार करण्याविसयीं मनाई करविणें

हा ईस्ट इंडिया कंपनीचा आठराव्या शतकांत चालू असलेला उद्योग एका लेखकानें साधार उघडकीस आणला आहे. उदाहरणार्थ सन १७६९ मध्यें मीठ, तंबाखू व जायफळें या तीन पदार्थांच्या व्यापाराचा मक्ता कंपनीनें एका खाविक मंडळीकडे दिला. या मक्त्यामुळें कंपनीचें निदान १२–१९ लक्ष रुपये दरसालचें उत्पन्न होऊन बसलें. या उत्पन्नापैकीं थोडथोडा तुकडा कलकत्याच्या अंमलदारांच्या तोंडावर फेंकावा लागत असे. तेथील पाद्रीभट देखील या अन्यायाच्या धनाला शिवण्याला मागें पहात नसत! हा मक्ता नबाबाच्या व कंपनी सरकारच्या हुकुमानें दिला जात असे, पण नबाबाच्या नांवाचें निवळ ढोंग असे. विणकरीचा धंदा देखील अशाच पद्धतीनें मुद्दाम बुडविण्यांत आला. हिंदुस्थान विषयक बाबींची चर्चा या नांवाचा एक ग्रंथ सन १७७२ मध्यें लंडन येथें प्रसिद्ध झाला. त्याचे कर्ते मि० बोल्टस यांनीं ही सर्व अन्यायाची घाण उघडकीस आणलेली होती. आपल्या गेल्या दोन तीन वर्षांत राजद्रोहाच्या खटल्याचें सत्र आमच्या देशांत जरा उग्र स्वरूपांत सुरू झालें, त्यामुळें किती तरी लोक एकामागून एक असे तुरुंगांत जात आहेत. हें पाहून इकडच्या लोकांची छाती फाटून जाते. रशियांत अशीच उत्क्रांति गेलीं तीस वर्षें चालू आहे. तेथील लोकांची इच्छा पूर्ण होण्याचे दिवस अगदीं जवळ आलेले आहेत. पण इतक्या थरावर गोष्ट येण्यापूर्वी किती लोकांना अपेष्टा भोगाव्या लागल्या हें पाहिलें ह्मणजे रशियाचे मानानें हिंदुस्थानच्या इष्ट मनोरथाच्या सिद्धीचा काल अद्याप फारच लांब आहे असें ह्मणावें लागेल. रशियांतील चळवळ उत्क्रांतीची आहे असें एका लेखांत दाखविलें आहे. त्यांत दिलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं १९०७ हें वर्ष फार मोठ्या उलाढालीचें नव्हतें, तरी रशियांत या वर्षी अकरा हजार लोक स्वातंत्र्यास मुकले. या एका वर्षांत ७४८ रशियन लोक फांशी गेले, ३४४ ना जन्मठेपीच्या शिक्षा झाल्या, ६०० ना फाशीच्या शिक्षा सुनावल्या होत्या, पण त्यांचें पुढें काय झालें तें कळलें नाहीं, ९८१ लोकांना किल्ल्यांवर कोंडून ठेवलेलें आहे. साधारण लोकांत खळबळ उत्पन्न केल्याबद्दल २०७ फांशी गेले, ८०९ लोक तुरुंगांत गेले, १२३ हद्दपार झाले आणि १८६२ ना इतर कांहीं शिक्षा मिळाल्या. शेतकरी लोकांनाच चिथावल्याच्या आरोपावरून २ फाशी गेले, ३९ तुरुंगांत गेले आणि २८०९ ना निरनिराळ्या शिक्षा झाल्या. सोशियालिस्टांच्या संस्थांत सामिल झाल्याबद्दल ९९ फांशी गेले, ६८२ तुरुंगांत गेले, २९८ ना अज्ञातवास घडला, आणि ११९२ ना इतर रीतीनें शासन करण्यांत आलें. पोलिसास दंगा मोडण्याचे कामीं अडथळा केल्याबद्दल ९८६ फाशी गेले, ३८४ तुरुंगांत आहेत, १४ जणांना देशांतून घालवून दिलें. आणि १७३ ना इतर रीतीनें कारागृहवास घडत आहेत! चौदा कोटि वस्तीच्या देशांतील स्वराज्य प्राप्तीच्या यज्ञांतील अगदीं शेवटच्या आहुतीची ही यादी आहे! त्यांत आश्चर्य हें कीं रशियन लोक जात्या क्रांतिकारक विचारांचे नसून आपल्या राष्ट्राची सर्वांगांनीं सारखी उन्नति व्हावी एतदर्थ त्यांची गेलीं तीस वर्षें अव्याहत खटपट चालू आहे. ते घरीं असोत दारीं असोत, स्वदेशांत असोत किंवा अरण्यांत असोत, स्वतंत्र असोत कीं बंदिवान असोत, युक्ति, बुद्धि आणि संपत्ती यांचा विनियोग फक्त आपल्या राष्ट्राच्या उन्नत्यर्थ करावयाचा असा त्यांचा कृतसंकल्प दिसून येतो. मि. जॉन पेज हॉप्स यांनीं राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमावर टीका करून पुढील मार्ग सुचविला आहे. ज्या खर्चासंबंधानें राष्ट्रीय सभेचें प्रतिकूल मत असेल तेवढ्या पुरतें सरकार देणें देण्याचें लोकांनीं नाकारावें आणि त्या द्रव्याचा शिक्षण संस्थांसाठीं फंड उभारण्याकडे उपयोग करावा असें त्यांनीं सुचविलें आहे.

ईश्वराच्या संबंधांतील त्रिमूर्ती विषयींची कल्पना प्रथम ख्रिस्ती धर्मांत उत्पन्न झालेली नसून ती आशियांतील सर्व धर्मांत पूर्वीच्या काळीं होती आणि तीचा उगम हिंदुस्थानांतीलच असावा असे प्रतिपादन कलकत्याचे माजी कलेक्टर बाबू महानंद गुप्त यांनीं एका लेखांत केलें आहे.

**हिंदुस्थानरिव्ह्यू.**—या मासिकांत हिंदुस्थानांतील सर्व जाणत्या लोकांच्या विचारांत जी जबरदस्त उत्क्रांति होत आहे तिचें वर्णन डॉ. आनंद कुमारस्वामी यांनीं केलेलें आहे. "हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितांच आहे' या तत्वाचें परिक्षण त्यांनीं केलें असून, असा मथितार्थ काढला आहे, कीं हा विचार केवळ राजकीय, सांपत्तिक किंवा औद्योगिक स्वरूपाचा नसून आमच्या देशाचें स्वत्व कायम रहावयाचें आहे किंवा कसें हा अत्यंत व्यापक अर्थाचा प्रश्न या विचाराच्या मुळाशीं आहे. राष्ट्रीयत्वाला आवश्यक अशीं एक देश व समान सामाजिक उत्क्रांति हीं दोन्हीं अंगें हिंदुस्थानच्या बाबतींत दिसून येत असल्यामुळें पूर्वीपासून हिंदुस्थान हें एक राष्ट्र होतें व यापुढेंहि तें तसेंच रहाणें शक्य आहे असें त्यांनीं सिद्ध केलें आहे.

विद्यार्थ्यांनीं राजकीय प्रकरणांत पडावें किंवा नाहीं या वादाला सेंट्रल हिंदू कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपल मि. अरंडेल यांनीं पुनः सुरुवात करून दिली आहे. आपल्या राष्ट्राच्या हिताच्या अगर अनहिताच्या प्रत्येक बाबीचें सूक्ष्म निरीक्षण किंवा अध्ययन विद्यार्थ्यांना करणें अवश्य आहे याविषयीं मि. अरंडेल यांचा कोणाशीं वाद नाहीं. पण विद्यार्थ्यांनीं प्रचलित राजकीय चळवळींत किंवा वादांत पडावें हें त्यांना योग्य दिसत नाहीं. असल्या दुतर्फी प्रकरणांत आपण कोणत्या बाजूला जावें हें त्यांना त्यांच्या कोत्या ज्ञानामुळें बरोबर ठरवितां येणें अशक्य असल्यामुळें त्यांनीं तसें करणें इष्ट नाहीं असा मि. अरंडेल यांचा अभिप्राय आहे.

मि. जॉन पेज हॉप्स यांनीं एका लहानशा निबंधांत Civilization 'सुधारणा' या शब्दाची Brotherhood 'बंधुत्व' असा अर्थ सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. जेथें लोक एकमेकांशीं लढा-ओढ करतात, पण कोणी कोणाविषयीं मत्सर बाळगीत नाहीं, अशा समाजाला सुधारलेला समाज ह्मणावें असा मि. हॉप्स यांच्या प्रतिपादनाचा मुख्य हेतु आहे. मि. फिरोजउद्दिन मुराद यांनीं भौतिक शास्त्रांच्या इतिहासाचें थोडक्यांत पर्यालोचन करून त्यावरून काय अर्थ घ्यावयाचा तें दाखविलें आहे. जगाची उत्तरोत्तर उत्क्रांति होत आहे, जों जों सृष्टीचे व्यापक दृष्टीनें ज्ञान करून घ्यावें तों तों हीच गोष्ट अनुभवास येते. अत्यंत सूक्ष्म अशा पारिमाणूचें मापन करूं जाणारा मनुष्य प्राणि त्याच्या आजच्या स्वरूपांत आजच जन्मास आला असें नाहीं, तर इतक्या अगणित काळानें बनविलेली अशी ती त्याची मूर्ति आहे. मनुष्यप्राण्याची उत्पत्ति हीच सृष्टी रचनेंतील ईश्वरी संकेताची फलश्रुति होय. असाच बोध भौतिक शास्त्रांच्या अध्ययनापासून निघतो हें मि. मुराद यांनीं स्पष्ट केलें आहे.

**विविधज्ञानविस्तार**— या मासिकाचा जून व जुलैचा जोड अंक आगष्टांत आला आहे. आरंभीं एका मोठ्या वादसंबंधानें द्वारका पीठाचे श्रीशंकराचार्य यांचा निर्णय रा. ब. वैद्य यांनीं सादर केला आहे. 'नंदान्तं क्षत्रियकुलम्' या वचनाचें असत्यत्व या निर्णयांत साधार सिद्ध केलेलें आहे. लेखकांच्या संमेलना संबंधानें विस्ताराचा अभिप्राय बराच उशीरा प्रकट झाला आहे खरा, पण तो पोक्तपणाचा दिसतो. 'विस्ताराचे प्रेषित' लिहितात, 'संमेलनाचें काम एकंदरीनें चांगलें पार पडलें. परंतु आधुनिक ग्रंथकारांचें दैवत स्वदेशप्रीति हें अधिकारीनें सांगितल्यानें ग्रंथकारांच्या संमेलनाचें वातावरण राजकीय विषयावरील भाषणें ऐकण्याकरतां जमलेल्या समाजाच्या वातावरणाप्रमाणें थोडेबहुत प्रक्षुब्ध होत असे, वस्तुतः सामान्य जनांची उन्नति करण्याकरितां आपण उन्नत स्थळींच राहून त्यांना आपल्या अर्वाचीन वृत्तींची ओळख करून देऊन उत्तम वृत्तींचें पारिपोषण करण्याचा दीर्घ व कडू यत्न करावा लागतो व तसें करून लोकक्षोभहि पत्करावा लागतो, हें तत्व साफ विसरून सामान्य जनांच्या अधम वृत्तींना जोर देऊन त्यांचें समाधान करूं बघत व टाळ्यांची अपेक्षा करीत हें पाहून जुन्या पथांतल्या लोकांस वाईट वाटलें. पण नवीन पंथातले ह्मणतील कीं पूर्वीच्या वातावरणांत संचितोदकाचें सरोवर प्रक्षुब्ध होत नसे, यांत नवल काय? हल्लींचा हा जिवंत पाण्याचा खळखळाट आहे. शकेल त्यानें उतरून जावें." रा. सुरतकर यांनीं पुण्यक्षेत्र गयेजवळील नलिंदा येथील बौद्ध विद्यालयाचें वाचनीय वर्णन केलें आहे. 'मानवी सुधारणा' या मथळ्याखालीं रा. चौकर यांनीं एका इंग्रजी लेखाचें भाषांतर दिलें. वर हिंदुस्थान रिव्ह्यूमधील एका लेखांतील विषय थोडक्यांत दिला आहे. त्याशी या लेखाचें बरेंच साम्य दिसून येतें. विस्तारांतील निबंधाचें सार असे आहे; 'प्रत्येकाच्या हृदयांत भूतदयेची ज्योत जोरानें पेटली पाहिजे ह्मणजे जगांतील सर्व जुलूम, क्रूरपणा, जितजेते हा भाव नाहींसा होईल. लोकांना सत्य शोधण्याची व खरें सुख कशांत आहे हें जाणण्याची इच्छा होणें हाच सर्व सुधारणेचा पाया आहे!' 'फल ज्योतिषाची शास्त्र या नात्यानें योग्यता स्थापित करण्यास प्रो. कठाले यांचे सारखे अधिकारी पुरुष पुढें आले आहेत. त्यांचा लेख या शास्त्राविषयीं साशंक असणाऱ्यांनीं तर लक्षपूर्वक वाचण्यासारखा आहे. 'विवाहमीमांसा' या सदराखालीं रा. रा. रंगेराव तेलंग यांच्या सहीवर हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ह्मटलें आहे, 'सुग्रास स्वयंपाक व सुबक शिवणकाम करणारी नीटनीटका पेहेराव करून घरांत शिस्त ठेवणारी घरधनीण पुरुषास हवी असते. त्याचप्रमाणें आपल्यासाठीं खपणारा, नाचरंगांस जाऊं देणारा व आपल्या स्नेही सोबत्यांचा पाहुणचार करूं देणारा असा यजमान स्त्रीस हवा असतो.' यांतील दुसरें वाक्य आर्य स्त्रीला अनुलक्षून लिहिलेलें असल्यास ते मुळींच शोभत नाहीं. आमची शंका खरी असल्यास हा सर्वच लेख विलायती असून तो आमच्यावर लादण्यांत निव्वळ जुलूम झाला आहे. सदर लेख नुसता विलायती समाजाला उद्देशून लिहिलेला दिसतो इतकेंच नव्हे तर त्यांतील आत्यंतिक भागांची किळस आलेल्या मि. नार्डो यांचेसारख्या लेखकानें लिहिलेला असावा. रा. लड्ड यांनीं लिहिलेला शिवछत्रपतींचें दरबारचे राजकवी भूषणजी यांचे चरित्रावरील लेख वाचनीय आहे.

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः— या सप्तकांत पावसानें चांगलीच उघाडी दिली. शेतींचीं कामें जोरानें चालूं आहेत. रोगराई कोणतीच नाहीं. उमरावती व खामगांव येथें प्लेगाला सुरुवात झाली असून लोक आपापलीं घरें सोडण्याकडे गुंतले आहेत.

शिक्षाः— यवतमाळ येथील हरीकिशोर पत्राचे संपादक रा. रा. नरहर विठ्ठल भावे यांस पूर्व वऱ्हाडचे सेशनजज्ज राजश्री प्रीडो साहेब यांनीं १२४ अ पिनलकोडा खालीं ३ वर्षें व १५३ अ खालीं २ वर्षें मिळून पांच वर्षांची शिक्षा सांगितली. छापखानाही जप्त केला आहे. सर्वत्रच शिक्षेचा प्रकार फार कडक आहे. राजद्रोहाचा डोंगर कोसळला आहे तेव्हां त्याच्या खालीं किती इंडियनांचा चराडा होणार आहे तें न कळे!

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००।. |
| सोनें | | २४।= |
| चांदी | | ७० |
| नवस | | १३९ |
| जवारी | | ८८ |
| गहूं काठे | | १३१॥ |
| बनशी | ७॥। | १९० |
| तेल | | ७।= |
| सरकी | | ११॥।= |
| तूप | | १९ |
| कापूस | | ४७ |

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन नामाजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमची औषधें चरक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या काहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमची औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आम्हास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शेंकडा शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना प्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातु शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टीमैथुनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचू लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्डी सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दरः–एकदम ३१ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६१ गो. ४ रु. २७१ गो० ६ रु. ५१० गो० रु.

२ अपूर्व नेत्रांजनः–यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरे रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः–कोणताही नवा जुना परमा व उष्णता दाह तिडीक मुत्राची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेत जाते असे रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

३ दंतबलवर्धक चूर्ण:–दंतास दृढता सर्व विकार उत्तम बरे .

९ विंचुचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ७ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाही प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय भिन्नभिन्न रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायनें भस्म पाक, गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असुन प्रत्येक आपआपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरू झाला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत उत आला असून आमच्या आजिलें वगैरे गावांतून तो औषधविक्रेते येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक यांची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपापली थोरवी गाण्याचा ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९|२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास मोठमोठाले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें केव्हांवधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकळ आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरव, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर येनुक मागवावी म्हणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.



## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—BOMBAY

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

### FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount to a givensum, but it is essential to know how such Funds are invested—if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matures

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* to tmploying a portion of their annual income or profits in effecting life pol at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di searly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes hupqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT

१


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

## नोटीस

या नोटिशीनें सर्व लोकांस जाहिर करण्यांत येत आहे कीं कारंजा म्युनिसिपल कमेटीची स्पेशल सभा तारीख १५-७-१९०८ रोजीं भरून वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ४१ (१) (अ) (इ) अन्वयें कारंजा म्युनिसिपल हद्दींत बाहेरून येणाऱ्या गाड्या आणि बसावयाच्या किंवा ओझीं वाहण्याच्या गाड्या ओढण्याकरितां किंवा ओझीं वाहून नेण्याकरितां ज्या जनावरांचा उपयोग करितात त्या जनावरावर खालील नियमा बरहुकुम कर बसविण्याचें योजिलें आहे.

## नियम

म्युनिसिपल कमेटीचे हद्दींत येणाऱ्या गाड्या व जनावरें यांच्यावर यासोबत दिलेल्या दरबारींत दिल्याप्रमाणें व खुलासा दिल्याप्रमाणें कर बसविला जाईल मात्र खाली दिलेल्या माफी असतील.

२—सदर्हू कर वसूल करण्याकरितां कमेटीस जरूरी लागेल तेवढा महकमा कमेटी ठेवील अगर वसूल करण्याचें काम मे० कमिशनरसाहेब बहादूर यांचे मंजुरातीनें मक्त्यानें देईल.

३—खाली दिलेल्या दरबारींतील एक दराप्रमाणें कर देणाऱ्यास छापील पावती दिली जाईल. आणि ही पावती ज्या वाहनाकरितां अगर जनावराकरितां दिली आहे त्याबद्दल त्या दिवशीं पावती दिल्यापासून रात्रीचे बाराचाजेपर्यंत पुन्हा कर घेतले जाणार नाहींत.

४—दरबारींत दिलेले मुदतींचे दराप्रमाणें रक्कम देऊं इच्छिणाऱ्यानें अर्ज केल्यास त्याला खालीं जोडलेल्या नमून्यांत लायसंस दिलें जाईल व असें लायसन्स ता० ३१ मार्च, ता० ३० जून, ता० ३० सप्टेंबर आणि ता० ३१ डिसेंबर अशा मुदतीचे असतील. तुटक मुदतीचे (तिमाहीपेक्षां कमी मुदतीचे) लायसंस दिलें जाणार नाहींत. कर वसूल करण्याचे काम कमेटी मार्फत असतांनां कमेटीचे आफिसांतून लायसंस दिले जातील व वसूलाचें काम मक्त्यानें दिले असल्यास मक्तेदाराकडून लायसन्स मिळतिल सदर्हू लायसंस घेणाऱ्याच्याच उपयोगांत येतील दुसऱ्याला देतां येणार नाहींत. तथापि लायसंस घेणाऱ्याचे कुटुंबांतील माणसें, नौकर आणि पाहुणे यांना त्याचा उपयोग करतां येईल. प्रत्येक लायसंस वरून लायसंस घेणाऱ्याचें जनावर अगर गाडी दररोज एकवेळ सोडली जाईल.

५—मुदतीचे दराप्रमाणें घेतलेल्या लायसंसदारानें म्युनिसिपल हद्दींत येतांनां कमेटीनें या कामाकरितां ज्यास अधिकार दिला असेल अशा ऑफिसरास अगर मक्तेदारास किंवा त्यांच्या तर्फे असलेल्या गुमास्त्यास तों लायसंस पाहण्यास मागेल त्यावेळीं दाखविलें पाहिजे. याप्रमाणें न केल्यास लायसंसदार त्यावेळीं जी गाडी अगर जनावर म्युनिसिपल हद्दींत आणीत असेल त्याबद्दचा नियमाप्रमाणें कर द्यावा लागेल.

६—सदर्हू कर वसूल करण्याचे कामाकरितां योग्य रितीनें नेमेलल्या ईसमांस कर देईपर्यंत गाड्या, इतर चाकी वाहनें आणि जनावरें अटकाऊन ठेवण्याचा अधिकार आहे.

७—या नियमांची एक नक्कल म्युनिसिपल ऑफिसांत प्रसिद्ध ठिकाणीं व जसजसे जरूर दिसेल तसतसें इतर ठिकाणींही लाविली जाईल

## दरवारी

| | एक दर. | | | | | | ठरीव पाळीचे दर | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लादलेले | | | रिकामे | | | वर्षास | | | सहामाहीस | | | तीनमाहीस | | |
| माल किंवा अशाच प्रकारची दुसरी जिन्नस वाहण्याकरितां असलेली गाडी अगर दुसरें चाक असलेलें वाहन. | ० | ० | ९ | ० | ० | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| स्वारी करितां असलेली दमणी अगर दुसरी चाक असलेली गाडी. | ० | ० | ६ | ० | ० | ६ | ४ | ० | ० | २ | ८ | ० | १ | ८ | ० |
| घोडा, तट्टू, आणि खेंचर. | ० | ० | ३ | ० | ० | ० | १ | ८ | ० | ० | १४ | ० | ० | ८ | ० |
| म्हशी अगर हेले, हत्ती, बैल अगर उंटें. | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| गाढव. | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

## विशेष खुलासा

१ घोडे, तट्टे आणि खेंचरें यांच्यावर स्वारी असेल तेव्हां तीं लादलेलीं आहेत असें समजलें जाईल.

२ मालाच्या गाडींत जेव्हां फक्त हांकणाऱ्याचे स्वयंपाकाचीं भांडीं, कपडे आणि बिछानाच असेल व गाडीला जुपले ल्या जनावरांच्या एका दिवसांच्या खाण्या पुरता चारा असेल त्यावेळीं ती गाडी रिकामी आहे असें समजलें जाईल. या शिवाय दुसऱ्या सर्व तऱ्हेनें माल वाहत असेल ती भरलेली समजली जाईल.

## माफी

खालीं दिलेले जनावर व वाहनाला कर माफी आहे.

१ म्युनिसिपल कमेटीच्या गाड्या व जनावरें अगर कमेटीचें सामान आणीत असलेल्या गाड्या व जनावरें.

२ भिल्याचे बैल अगर रेडे.

३ हिंदुस्थान सरकारचे होम डिपार्टमेंटचा हुकूम नंबर १६३ तारीख १८ नव्हेंबर सन १८८१ अन्वयें ज्यांना माफी दिली आहे तें.

४ शेतकीचा माल, आडते अगर शेतकीच्या कामाचे इतर जिन्नस आणीत असतील अशा गाड्या अगर जनावरें.

### चवथ्या नियमांत सांगितलेला नमुना.

अर्ज

कारंजा येथील रस्त्यांचे कर.

मीं —————— राहणार नंबर —————— सर्कल अर्ज करतो कीं —————— करितां —————— अखेर मुदतीचे लायसंस मिळावे

भरणा केलेली रक्कम ——————

—————— १९०

—————— सही

### स्थळप्रत

कारंजा येथील रस्त्यांवरील कर.

या लायसंस वरून ——————

राहणार नंबर —————— सर्कल

यांस —————— अखेर

मुदतीपर्यंत म्युनिसिपाल कमेटीच्या

हद्दींत ——————

—————— वाहत अगर बसत

आणण्यास परवानगी दिली आहे.

भरून पावलो रकम रु. आ. पै.

ता. —————— १९०

——— सही

सदर्हू लायसंस लायसंस घेणाऱ्याच्याच उपयोगांत येईल. दुसऱ्याला देतां येणार नाहीं तथापि लायसंस घेणाऱ्याचे कुटुंबांतील माणसें, नौकर आणि पाहुणे यानीं याचा उपयोग करतां येईल लायसंस घेणाऱ्याचे जनावर अगर गाडी दररोज एकवेळ सोडली जाईल.

### लायसंस

कारंजा येथील रस्त्यांवरील कर

या लायसंस वरून ——————

राहणार नंबर —————— सर्कल

यांस —————— अखेर

मुदतपर्यंत म्युनिसिपाल कमेटीच्या

हद्दींत ——————

—————— वाहत अगर बसत

आणण्यास परवानगी दिली आहे.

भरून पावलो रकम आ. रु. पै.

ता. —————— १९०

—————— सही

सदर्हू लायसंस लायसंस घेण्याऱ्याच्याच उपयोगांत येईल दुसऱ्याला देतां येणार नाहीं तथापि लानसंस घेणाराचे कुटुंबांतील माणसें, नौकर आणि पाहुणे यानां याचा उपयोग करतां येईल. लानसंस घेणाऱ्याचें जनावर अगर गाडी दररोज एक वेळ सोडली जाईल.

तरी सर्वास विनंती करण्यांत येते कीं ज्यास वरील सूचनेस कांहीं हरकती अगर सुचना करणें असतील त्यांनीं ही नोटीस छापल्या तारखेपासून ३० दिवसांत कमेटीचे सेक्रेटरी कडेस लेखी कराव्या.

कारंजा
ता० २२-७-१९०८

रा. म. डोणगांवकर
सेक्रेटरी
म्यु० कमेटी कारंजा.

नं. घ. ४

## नोटिसीचे उत्तर

रेऊ मर्द सखाराम राजगोंड रहाणार अकोला नागोजी राजगोंड यांच्या घरीं ईसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तूं मला नोटीस दिली ती सर्व खोटी आहे. तूं दुसऱ्याच्या फंदानें ही गोष्ट केली आहेस. मी संसार करण्यास तयार आहे. ही नोटीस पावतांच तूं माझ्या घरीं येऊन नांदावेंस असें करण्यास चुकशिल तर तुजवर दावा करून तुला ताब्यांत घेतली जाईल. कळावें. ता० २७-७-०८ इ०

सही
सखाराम वल्लद लिंबाजी
राजगोंड निशाणी चाबूक.

नं. घ. २

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख १७ माहे आगष्ट सन १९०८ इसवी [अंक ३१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः-- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक
ह्या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकी मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल्दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं ७१ — G. A Phillips एजंट

### * इकडे लक्ष द्या ! *

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, रंगीत पिठोरी १। रु० पांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी शंभर घेतल्यास शेंकडा ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—
बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

### नोटीस

नोटीस वेशमी रावजी वल्द आकाजी पाटील राहणार मौजे सावळ ता. जळगांव जि. बुलडाणा पोष्ट तामगांव यांसः—

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येतें कीं ता. १०-४-०८ ईसवी रोजीं आपण दुकान ताब्यांत घेतल्या बद्दल ता. २९-४-०८ ईसवीची नोटीस आपणास झालीच आहे. आपल्या ताब्यांत दुकान येताच सर्व दुकाचें काम पाहण्या करितां भिकु वल्दद उदेभान व कीटकुल वल्दद पुंजाजी माळी या दोघा उभयतांस नेमून किल्या वगैरे सर्व दुकान त्याचे स्वाधीन करून तुह्मी दिली, कांहीं दिवस विक्री करून आमची नोटीस पावल्या पासून दुकान बंद केली. हल्लीं आतां उधारी मागून मागून तुमचे जवळ भय्यन देत असतों. आमची नोटीस खोटी आहे असें आपण ह्मणतां. जर आमची नोटीस खोटीच असती तर दिड पावणेदोन साहिने उगीच मुकाट्यानीं राहिले नसते. ता. १५-७-०८ ईसवीची तुह्मी दिलेली नोटीस ती सर्व कुभांडाची असून आपलें बचावासाठीं कोणाच्या तरी सांगण्यावरून दिली आहे. ती आह्मांस कबूल नाहीं. तुह्मी माल व रोकडचा हिशेब मागतां तर तुमचे वहिवाटदार गुमास्ते भिकु व कीटकुल यांचे पासून सर्व हिशेब नक्की नक्की घ्यावा. त्या बद्दल आह्मी मुळींच जबाबदार नाहीं फक्त १३ वह्या आमचे जवळ आहेत. याशिवाय दुसरें कांहीं माहीत नाहीं कळावें. ता. ९-८-०८

सही

शिवराम वल्दद सखाराम मास्तर राहणार आकोली ता. जळगांव जामोद जि. बुलडाणा. द. खुद

नं. घ. ७

### नोटीस

खाविंद साहेब अबदुल राहिमान वल्दद अबदुल्लासोहेब चपराशी तहशिल खामगांव तालुके मजकूर यांसः—

नोटीस देणार न्यामतबी मर्द अबदुल राहिमान रा. खामगांव नोटिशीनें कळवितें कीं तुह्मी माझ्याशीं लग्न केलें त्यांस अकरा ११ वर्षे झालीं. तुह्मी मजला चांगलें रीतीनें वागवीत नाहीं व तुह्मी आपलेंपासून मजला आजपर्यंत कोणतेच प्रकारचें सुख दिलें नाहीं. त्यामुळें मी फार त्रस्त झालें. मजला जवळ वागविण्यास टाळाटाळी करितां ह्यामुळें मी लोकांचें कर्ज काढून माझे बापाचें घरीं राहून उदरनिर्वाह करीत असते. ह्यामुळें मजला एकंदर ४ वर्षे पर्यंत खाण्यापिण्याबद्दल व कपड्यालत्याबद्दल रुपये ३०० तीनशें कर्ज झालें. ते रुपये व मेहेरबद्दल रुपये ५०० पांच अशरफाची किंमत रुपये ७५ पांच दिनार मेहेर बद्दलची किंमत रुपये १०० असे एंकदर रुपये ९७५ अक्षरी नउशे पंचाहात्तर झाले ह्या पैकी रुपये ३०० खावटीचे व मेहेरबलाचे रकम रुपये ५०० असे रुपये ८०० चार पंचा समक्ष पंधरा दिवसांचे आंत मजला द्याल तर मजवर तुमचा लग्नाचा हक्क राहील जर पंधरा दिवसांचे आंत वरील रक्कम तुह्मी दिली नाहीं तर अगर ह्या गोष्टीचा उलगडा केला नाहीं तर मजवर तुमचा कोणतेही प्रकारचा लग्नाचा हक्क न राहतां ही नोटीस फारकती संबंधी समजून मी दुसरा घरठाव करीन. करितां मुद्दाम नोटीशीनें कळविलें आहे. ता. १२-८-०८

सही

न्यामतबी मर्द अबदुल रहिमान
रा. खामगांव नि. खुद बांगडी

नं. घ. ८

### नोटीस

वि० सुभेदार साहेब सबजज्ज कोर्ट आकोला यांचे कोर्टातून

स० स० मु० नंबर ८ सन १९०८ ई.

या नोटिशीचे द्वारें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार भगवंतीया बापाचे नांव पाल्हदास अ. पा. रामसरण वल्दद जोखु परदेशी कुणबी रा. अकोला ईनें मयत पाल्हदास वल्दद जरबंधन हा ता. २१-२-१९०७ चे सुमारास मरण पावल्यामुळें मयताचे महादेव वल्दद मातादीन रा. अकोला ता. व जिल्हा मजकूर यांजकडे ता. २१-९-६ चे कर्ज रोख्यावरून रक्कम रुपये ३९८१ व व्याज मिळण्याबद्दल सकसेशन सरटिफीकिट आक्ट सन १८८९ कलम ७ प्रमाणें आपण योग्य वारस असल्यामुळें सरटिफीकीट मिळण्याकरितां ता. ३०-७-८ रोजीं दिलेला अर्ज चौकशीकरितां ता. ९-९-१९०८ रोजीं नेमला आहे. तरी सदरहू बद्दल कोणास कांहीं तक्रार वगैरे करणें असल्यास त्यांनें आमचे कोर्टात वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर व्हावे. हजर न झाल्यास पुढें कोणतीहि सबब ऐकली जाणार नाहीं. आमच्या सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस दिली असें आज तारीख २८ माहे जुलई सन १९०८ ईसवी

N, G. Sabhedar
Sub--judge
Akola.

नं. घ. ९

### नोटीस

नोटीस गणेशप्रसाद व शिवप्रसाद वल्दद हिरालाल जात परदेशी कनुज्या ब्राह्मण राहणार गोरेगांव खुर्द तालुके आकोल यांसः—

नोटीस देणार भगु वल्दद मारुती जात कुणबी वाकोंडे राहणार गोरेगांव खुर्द तालुके आकोला नोटीस देतो कीं माझेकडे कर्ज होतें त्याजबद्दल आपण उभयतांनी तुह्मी आपले खातें नांवे लावून घेतल्याचा मजपासून तुह्मी उभयतांनीं शेत लोकांचें कर्ज मजकडे असलेले लावून घेतल्याचा मजपासून पांच वर्षांकरितां रोखा करून घेतला त्याप्रमाणें लोकांचे रुपये देण्याचे दोन महिन्याचे आंत निकाल करून मजला त्याची पावती मिळण्याची होती. परंतु तसें तुह्मी केलें नाहीं. आह्मास विनाकारण आज पावतो थापावर ठेवित आहा हें बरोबर नाहीं. माझा पूर्वींचें गहाणखत दस्ताऐवज वगैरे दिला नाहीं. व शेत आपण गुदस्त सालापासून वाहात आहात. तर आतां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत लोकांचें मजवर असलेले देणें त्याची पावती व माझा दस्ताएवज काढून देणें. नाहींपेक्षां रीतीप्रमाणें तजवीज करणें भाग पडेल. व या नोटिशीचा खर्च तुमचे कडून भरून घेतला जाईल कळावें ता. ८-८-१९०८ ई.

सही

भगु वल्दद मारुती कुणबी

नं. घ. १० द. खुद

### जाहिरात

त्रिचमान म्युनीसिपल कमेटी शहर अकोलें.
सर्वत्र शहरवासी लोक रा. अकोलें यांसः—

जाहीर करण्यांत येते कीं अकोलें म्यु. कमेटीचे हद्दींत वऱ्हाड म्यु. कायद्याचें कलम १२१ ते १२४ आणि १३५ अन्वयें लोकाकडून सफाई बाबत जे गुन्हे होतील त्या लोकावर मुकदमे करण्या करितां जनरल कमेटीचा ठराव नं. ७ ता. १०-८-०८ ईसवीचे आधारें अकोलें म्यु. कमेटीचे दोन्ही व्हाइस चेअरमन साहेब यांना अधिकार देण्यात आला आहे कळावें. ता. १०- ८- ०८ ईसवी

सही

P. D. Sontake.

सेक्रेटरी म्यु. कमेटी

नं. घ. ११ आकोला.

### NOTICE

With reference to rule 10 (1) of the Hyderabad Assigned Districts Legal Practitioners Rules. 1899, it is hereby notified theat the next examination of Candidates for the office of Pleader in Berar will be held at Amraoti on Wednesday the 9th, December 1908 and following days commencing at 11 A. M.

Persons desirous of being examined should submit their applications to the Registrar, Judicial Commissionr's Court. Central Provinces, Nagpur, together with the certificates and the fee prescribed by Rule 11 of the Rules so as to reach him within two calendar months from the date of this Notification.

Notification No. 1161 dated the 8th, June 1908 is hereby caoncelled.

Sd/- F. S. A. Slocock.
Chief Secretary to the Chief Commissioner.
Central Provinces.

नं. घ. १२

## वर्तमानसार

लार्ड मोर्ले यांच्या मनांत इंडिया कौंसिल्लामध्यें तिसरा हिंदी सभासद नेमण्याचें असून त्या जागेवर येथील सुप्रसिद्ध लेखक व समाजसुधारक मि. बेरामजीशेट मलबारी यांची नेमणूक होईल अशी बातमी 'अखबारे सौदागर' पत्रास लंडन येथील त्याच्या बातमीदारानें कळविलेली आहे.

त्रिप्लीकेन येथें राजद्रोही भाषण केल्या-बद्दल एथिराज सुरेंद्रनाथ आर्य यांजवरील खटला सेशन कमिट केला होता. हिंदु थुकलें तर समुद्र होईल व त्यांत इंग्रज लोक बुडून जातील, असें व्याख्याते बोलल्याचें ह्मणतात.

एका धर्मस्थानाच्या मालकीसंबंधानें कर-ण्यांत आलेला दिवाणी दावा बरेच दिवस रुळत पडला होता, तो येत्या ता. ११ रोजीं सुनावणी निघणार आहे. गयाचे सबॉर्डिनेट जज्ज यांच्यासमोर या खटल्याची सुनावणी होणार आहे.

या खटल्यांत विरुद्ध पक्षाकडून ब्रह्मदे-शचे माजी थिबा राजे यांची कमिशन-मार्फत साक्ष घेण्यांत आली आहे. या साक्षीदार राजांची फिर्यादीतर्फे उलट तपा-सणी करण्यांत येणार आहे. यासाठीं मि. बी. एम् मुकर्जी हे रत्नागिरीस निघून गेले आहेत. ब्रह्मदेशच्या थीबा राजाची रत्नागिरीस जबानी! दैवविलास आगम्य खरा!

मुकाम. राजण. ता. चांदुर जि. उमरावती एथील एका कुणब्याची स्त्रि गेल्या आठव-ड्यांत बाळंत होऊन ४ चार मुलें जन्मलीं व त्याच दिवशीं १ मेला व ३ दिवसांनीं २ रा मेला व ७ दिवसांनीं २ मेलीं एकुण ४ मेलीं. त्या बाईस त्रास फार झाला एका कुशल मनुष्यानें सुटका केल्या बद्दल एक बातमीदार कळवितात.

बांब गोळ्यांची धमकी देणारीं निनावीं-पत्रें पाठविण्यांत येतात. परंतु अक्षर ओळखणारे 'एक्सपर्टस' हीं पत्रें पाठविणारांचीं अक्षरें ओळखीत असता त. व्हाइसराय साहेबांना धमकीचें पत्र पाठवि-ल्याबद्दल कालिचरण मुकरजी नांवाच्या मनुष्यावर खटला झाला असून तो सेशन कमिट करण्यांत आला आहे. अक्षर ओळ-खणाऱ्या एक्सपर्टच्या पुराव्यावरून कालि-चरण मुकरजी यांस पकडण्यांत आलें.

दशावतार' हे खरे झालेले नसून केवळ कवीच्या कल्पनाशक्तीनें अस्तित्वांत आलेले आहेत. दशावतार प्रत्येक वर्षांत होतात असें निबंधकारांचें मत आहे. दशावतार ह्मणजे पाणी व तेज ह्यांचीं निरनिराळीं रूपें आहेत. याहुन दुसरें कांहीं नाहीं. हे सर्व विष्णूचे अवतार आहेत असें जें मानण्यांत येतें तें सबझुट आहे. असें रा. रुद्रगौडा आरताळ बेळगांव यांचें मत दिसतें.

ठरल्याप्रमाणें ता. ११ रोजीं सकाळीं खुदाराम बोस यांस मुझफरपूर येथें फांशी देण्यांत आलें. फांशीच्या लांकडा-जवळ येऊन जेव्हां तो ताठ उभा राहिला तेव्हां त्याचा चेहरा आनंदी व हंसतमुख दिसत होता. त्याचा प्राण तात्काळ गेला. खुदीरामाचे प्रेतसंस्कार त्याच्या ज्ञा-तिबांधवांनीं गंडकी नदीच्या कांठीं यथाविधि केले. तुरुंगापासून दहन घांटा-पर्यंतच्या सर्व रस्त्यावर दुतर्फा पोलीस उभे होते. घाटावर व रस्त्यांत पुष्कळ लोक जमले होते. खुदीरामाचे वकील ता. १० रोजीं त्याच्या भेटीस गेले तेव्हां "रजपूत स्त्रिया जितक्या धैर्यानें स्वतःस पेटविलेल्या चितेंत जाळून घेततात तितक्याच धैर्यानें मी मरेन" असें उद्गार खुदीराम यानें आपल्या वकीलापाशीं काढले असें ह्मणतात.

मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्याची एक खाजगी सभा होऊन तींत कॉंग्रेसची पुढील बैठक मद्रास येथें भरविण्यासंबंधानें चर्चा झाली. लवकरच रीतीप्रमाणें जाहिर सभा भरविण्यांत येऊन या प्रश्नासंबंधानें ठराव करण्यांत येईल असा संभव आहे.

कलकत्यापासून कांहीं अंतरावर असलेल्या शामनगर गांवीं बॉम्ब फेकल्याची बातमी आली आहे. मात्र या बॉंबनें कोणास कांहीं इजा झाली नाहीं. नारळाच्या कर-टींत आणकुचीदार खिळे व ज्वालाग्राही पदार्थ भरून हा बॉंब तयार केला होता. पूर्वीं कांकिनारा येथें टाकण्यांत आलेला बॉंबही अशाच प्रकारचा होता. संध्याकाळीं ७ वाजून १३ मिनिटांनीं आगगाडी शामनगराहून पुढचें स्टेशन कांकिनारा येथें जाण्यास निघाली असतां गाडीच्या युरोपि-यन बसलेल्या सेंकड क्लासच्या डब्यावर बॉम्ब फेंकण्यांत आला. पण सुदैवानें तो डब्यास न लागतां खालीं पडला. आवाज होतांच गाडी थांबविण्यांत आली परंतु गाडीला कोणत्याही प्रकारें अपाय झाला नाहीं असें आढळून आल्यावर ती फिरून मार्गास लागली. बॉंब कोणी फेंकला याचा पत्ता अद्याप पोलिसास लागला नाहीं. बॉम्बचा कांहीं भाग रस्त्यावर पडलेला सांपडला.

इंडिया कौन्सिलमध्यें दोन हिंदी सभासद पूर्वींच नेमण्यांत आले असून आणखी एका हिंदी गृहस्थाची सदर कौन्सिलमध्यें नेमणूक करण्याचा लॉर्ड मोर्ले यांचा विचार आहे या जागेवर बहुधा मि. बेहरामजी मल-बारी यांची नेमणूक होईल असें अखबारे सौदागर पत्राचा लंडन येथील बातमीदार कळवीत आहे.

मुलतान येथें दर वर्षी पावसाळ्यांत कांहीं धार्मिक मिरवणुकी निघत असतात, त्यांस यंदां मनाई झाली आहे. कांहीं दिवसांपूर्वीं एक मिरवणूक मशिदीवरून जात असतां अशा मिरवणुकींनीं आमच्या धर्मकृत्यांस व्यत्यय येतो अशी मुल्लांनीं तक्रार केली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं मुल्लांची तक्रार ऐकून परवान्यावांचून मिर-वणुकी काढण्याची मनाई केली. मुलतान येथील हिंदु लोक या मनाई हुकमामुळें क्षुब्ध झाले असून कांहीं दिवसांनीं लग्न-संबंधीं मिरवणुकीस व प्रेतयात्रेसदेखील परवाने लागूं लागतील असें ह्मणत आहेत.

देशांत विलायती माल न घेण्याची प्र-वृत्ति दिसूं लागली आहे ही गोष्ट आह्मी नाकबूल करीत नाहीं. पण ह्या निवृत्तिनें देशांतील उद्योगधंद्याचाच फायदा करून दिला असें ह्मणतां येत नाहीं. आमची स्वदेशी चळवळ नेटानें सुरू होऊन आज तीन वर्षें झालीं. विलायती मालाच्या मा-नानें इतर परकी देशांचा मालही आह्मी कमी खपवावयाला पाहिजे होता. पण तसें झाल्याचें दिसून येत नाहीं. विलायतेचा माल आह्मीं कमी खपविला असेल, पण इतर देशांचा माल जास्त विकत घेऊन ती तूट आह्मी भरून काढीत आहों. आज आपण जर्मनीच्याच व्यापाराचा विचार करूं. गेल्या पांच वर्षांत जर्मनीचा जो माल मुंबई बंदरी उतरला, त्याचें आंकडे येणेंप्रमाणें आहेत:—

| | रुपये |
|---|---|
| १९०२-०३ | ८२४११९८ |
| १९०३-०४ | १११२९२६७ |
| १९०४-०५ | १२७७९४३२ |
| १९९५-०६ | ११३७०७४६ |
| १९०६-०७ | २११०७१८४ |

हे आंकडे एकट्या मुंबई इलाख्याचे आहेत. सगळ्या हिंदुस्थानचे नाहींत.

स्वदेशीचें कापड आणि साखर हे बहि-ष्काराचे आद्यविषय होत. ते न घेणाच्या शाया घेऊन आलेल्या शद्बांत किती तेज आहे ह्याची मनोमय साक्ष पुष्कळांना पटली असेल. हिंदुस्थानांत जर्मनीमधून बीटची साखर येते हें प्रसिद्धच आहे. गेल्या पांच वर्षांत जर्मनीनें एकट्या मुंबई बंदरी किती साखर उतरली, तें वाचकांस आंक-ड्यांवरून दिसून येईल, ही साखर मोठा दाणा, पिठी, खडी, सर्व जातीची आहे.

| | रुपये. |
|---|---|
| १९०२-०३ | २०२९८१ |
| १९०३-०४ | ४९८७० |
| १९०४-०५ | ६२२४३७ |
| १९०५-०६ | १८११५४० |
| १९०६=०७ | ४६३१४०१ |

सन १९०२ साली सव्वादोन लक्षांची साखर आली.

सन १९०६-७ साली सव्वाशेचा-ळीस लक्षांहून जास्त रुपयाची साखर मुं-बईनें घेतली.

राजद्रोही येथें पुष्कर महोत्सवाला ता. ९ रोजीं आरंभ झाला. उत्सव समाप्त होण्यापूर्वीं राजमहेंद्री येथें गोदा स्नानाला निदान पांच लाख लोक येतील असा अनमास आहे. अर्धोदय योगाच्या वेळीं बंगाल्यांत जसे स्वयंसेवक तयार झाले होते त्याच नमुन्या-वर राजमहेंद्री येथेंही स्वयंसेवकांनीं यात्रे-करूंस पहिल्या दिवशीं मदत केली परंतु दुसऱ्या दिवशीं पोलिसांनीं हें काम पुढें चालविण्यास स्वयंसेवकांस मनाई केली असें राजमहेंद्रीच्या तारेवरून समजतें.

बिपिनचंद्रपाळ हे इंग्लंडला जावयास निघण्यापूर्वीं त्यांस पकडून राजकीय कैदी या नात्यानें ठेवण्यांत येणार आहे व त्यांस पकडण्यासाठीं वारंटही निघालें आहे अशी कलकत्त्यास बोलवा आहे. वरील बातमींत कितपत तथ्यांश आहे हें निश्चित सांगतां येत नाहीं. सां. व.

# वऱ्हाडसमाचार

श्रावण वद्य ६ शके १८३०

## धुत्कार ! आनिष्ट खास होणार.

हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति बदलली पाहिजे असा ध्वनि गेल्या कांहीं दिवसां-पासून वारंवार निघूं लागला आहे. हाऊस ऑफ लॉर्डसमधील सुप्रसिद्ध वादविवादापासून या ध्वनीला स्पष्ट स्वरूप आलें असें ह्मण-तां येईल. लॉर्ड कर्झन यांनीं योजलेल्या तीन डझन फेरफारांत शिक्षणपद्धतीचा समावेश झालेला होता आणि सर्व राष्ट्र विरुद्ध असतां परवडेल त्यानें उच्चप्रतीचें वाङ्मयात्मक शिक्षण संपादावें आणि गरीबांनीं औद्योगिक शिक्षणाची सोय नाहीं ह्मणून चपराशांच्या नोकऱ्या किंवा मोलमजुरी करावी असें ठरविण्यांत आलें. कर्झनी सुधारणेचें हें स्वरूप आतां चांगलेंच अनुभवास येऊं लागलें असून, तींत कांहीं उणेपणा राहि-लासा वाटल्यावरून कीं काय शिक्षणपद्धतींत फरक झाला पाहिजे अशी आरोळी लार्ड कर्झन यांनीं प्रथम ठोकली. ईजिप्तचा कारभार सोडून अलिकडे निजधामास आलेले लार्ड क्रोमर यांनीं लार्ड कर्झन यांना पुष्टी दिली हें साहाजिकच झालें. लार्ड कर्झन व लाड क्रोमर यांच्यांत कांहीं कालापूर्वीं फरक होता हें सुप्रसिद्ध आहे, पण इजिप्शियन लोकांच्या घरांतला कारभार बळेंच कर-ण्याची ब्रिटनची भिक्षुकीवृत्ति गुमास्तेगिरीनें इतके दिवस चालविल्यानंतर आतां या दोन लार्डांत श्रेष्ठ कोण या विषयीं कोणालाहि संशयच पडेल. अशा जोड गोळीनें ज्या सूचनेला दुजोरा आणला ती लार्ड यांना मान्य झाली नसती तर नवल होतें. असें कांहीं करावयास पाहिजे खरें हें त्यांनीं प्रांजलपणें कबूल केलें. मात्र आपला मनांतील हेतु अगर भाव त्यांनीं स्पष्ट न करतां संदिग्धच ठेवला. तिघांपैकीं एकालाही या सूचनेचें स्वरूप खुलासेवार रीतीनें बोलून दाखविण्याचें धैर्य झालें नाहीं, किंवा अद्याप तसें करण्याची वेळ आली नाहीं, ही गुल्दस्त सूचना पुनः हाऊस ऑफ कॉमन्समध्यें अवतीर्ण झाली. मि. बुकॅनन यांच्या आळणी भाषणांत या मुद्याच्या गोष्टीचा उल्लेख झाला आणि कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाचे माजी अंडर सेक्रेटरी अर्ल ऑफ पर्सी यांनीही रीतीप्रमाणें या विचाराला आपलें व आपल्या पक्षाचें अनुमोदन दिलें. शिक्षणपद्धतींत कांहीं तरी फरक होणार आहे या पेक्षां जास्त कांहीं माहिती या दोन्ही प्रसंगीं बाहेर आली नाहीं. मध्यंतरी एक दोघे अँग्लो इंडियन पत्रकारांनीं विलायतेच्या आपल्या बातमीदाराकडून कांहीं खारटतुरट गप्पा आणवून त्या प्रसिद्ध केल्या होत्या. दारूच्या गुत्त्यांप्रमाणें किंवा बिलियर्डसच्या अड्ड्याप्रमाणें शिक्षण विषयक संस्था परवान्यावांचून को-

णाला न काढू देण्याचा विचार चालूं आहे, असें एका गप्पीदासानें कळविलें होतें. आमच्या हिंदु समाजाच्या मनाच्या किंवा समजुतीच्या संबंधाच्या अशा कांहीं गोष्टी आहेत कीं त्यांची उपपत्ति शास्त्रानें सिद्ध करून दाखवितां आली नाहीं, तरी नाना-प्रसंगांच्या अनुभवांति प्रत्येक व्यक्तीला त्याविषयीं विश्वास धरावासा वाटतो. कांहीं अनिष्ट व्हावयाचें असलें ह्मणजे घुबडाचा घूत्कार दिवसां ढवळ्या ऐकूं येतो. इकडे शिक्षण विषयक संस्थांच्या रचनेंत फेरफार होण्याचें घाटत आहे तों, वर सांगितलेली बातमी किंवा गप्प घुबडाच्या अनिष्ट सूचक घुत्काराप्रमाणें ऐकूं येत आहे. मनुष्यवस्तीनें गजबजलेल्या नगरांत दिवाभीत घुबडानें दिवसा स्वैर संचार करावा तद्वतच दारूच्या गुत्यांच्या दर्जाला शिक्षणविषयक संस्था आणण्याची कल्पना निघावी हा प्रकार अमंगळ सूचक आहे. दारूचे गुत्ते आणि शिक्षण हे शद्ब एका वाक्यांत योजण्याचा हा प्रसंग बहुतकरून पहिलाच आहे. पण प्रत्येक मनुष्य अगदीं अनपेक्षित अशा गोष्टी आपल्या आयुष्यांत फारच थोड्या वेळीं पहातो किंवा अनुभवतो. प्रस्तुत प्रसंगीं इतकी काळजी वाटण्याला तशींच कारणें आहेत. सध्यांच्या राज्यपद्धतींतील एक असा अनुभव आहे कीं अपेक्षित असें हित व्हावयाचें असलें तर त्याचा पूर्वीपासून फार मोठा गाजावाजा होतो आणि शेवटीं इसापनीतींतील डोंगर आणि उंदर ही गोष्ट पुनः पुनः घडते. याच्या उलट कांहीं अनपेक्षित असें अहित व्हावयाचें असलें तर तें प्रत्यक्ष घडून येईपर्यंत त्याचा स्पष्ट असा सुगावा कोणालाच लागत नाहीं. केसरी सारख्या पत्रावर राजद्रोहाच्या आरोपावरून मुंबई सरकार खटला करील ही कल्पनाहि अलिकडे कित्येक वर्षे होत नव्हती. पण तें अनिष्ट अचानक घडून आलें आणि पूर्वींची ती कल्पना सर्व लोकांच्या मनांतून पूर्णपणें नाहींशी होण्याच्या पूर्वींच साबरमती जेलमध्यें लो. राजश्री टिळक यांना साबरमती जेलमधील वार्डरांनीं दुःखाश्रु ढाळीत कैद्याचा पोषाख चढविला! सत्ता विभागणी कमिशनची ज्या भाषणानें स्थापना झाली त्यांतील एका महत्वाच्या भागासंबंधानें साक्षींत इतका उहापोह होऊनहि आतां जें कांहीं व्हावयाचें ह्मणून ठरलें आहे तें येवढेंच कीं रिपोर्ट आणि मंजुऱ्या वगैरेमध्यें जो कालक्षेप होत होता तो यापुढें होणार नाहीं. जिल्ह्याच्या कारभारांत स्थानिक सभावित गृहस्थांची सल्ला घेण्यांत यावी या सूचनेचें रूप मावळत जाऊन म्युनिसिपालिट्यांतील मेंबरांची संख्या जास्त करण्यापर्यंत तें येऊन थांबलें आहे. स्थानिक स्वराज्यांत लोकल बोर्डाचा समावेश होतो याची जणूं विस्मृति पडली! अशा प्रकारचा अनुभव अनेक वेळां आलेला असल्यामुळें शिक्षणपद्धतीच्या फेरफारानें कांहीं तरी अतिशय विपरीत घडून येणार कीं काय अशी चिंता प्रत्येकाचे मनांत उद्भवत आहे. या संशय पिशाचिकेनें एकदां पूर्णपणें घेरल्यानंतर प्रत्यक्ष मूर्तिमंत हित समोर दिसूं लागलें तरी त्यावर विश्वास ठेवण्यास जनता तयार व्हावयाची नाहीं. ह्मणून संदिग्ध प्रकारचा पूर्ण खुलासा वेळींच होणें अवश्यक आहे.

---

## मुद्रणस्वातंत्र्य? खरेंच!

गेलीं दोन वर्षें वर्तमानपत्रांवर राजद्रोहासंबंधी किंवा जातीजातींत द्वेष माजविल्याच्या संबंधाचे खटले होण्याचा प्रकार सरसहा चालूं असून, त्यांतून निर्दोषी ठरून सुटलेल्या पत्रकारांचीं नावें मोजूं लागल्यास हाताचीं दोन तीन सुद्धां बोटें मिटावीं लागत नाहींत असें असतां हिंदुस्थानांत मुद्रण स्वातंत्र्य आहे असें आमच्यापैकीं कांहीं सुज्ञ ह्मणविणाऱ्यांना कसें ह्मणवतें याचें आह्मांला अत्यंत आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांतील न्यायाधीश अगदीं बिनचुक न्यायदृष्टि झाले असें ह्मणावें किंवा कायद्याचीं कलमें अतिशय व्यापक असून पुरावा विशेषसा लागत नाहीं, असें स्पष्ट ह्मणावें यापेक्षां येथें अन्य मार्ग नाहीं. ब्रिटिशराज्यव्यवस्था कितीहि सुधारली तरी मनुष्य स्वभाव जसा ईश्वरनिर्मित आहे त्यांत जमीनअस्मानाचा फरक पडल्याखेरीज पाहिलें ह्मणणें कबूल करणें दुरापास्त आहे. वर्तमानपत्रांसंबंधानें जो नवीन कायदा अमलांत आला आहे त्यावर अभिप्राय देतांना 'विविधज्ञानविस्तार' कर्त्यांनीं विनाकारण आपला पाय पेंचांत अडकवून घेतला आहे. नव्या कायद्यानें दंगाधोपा करण्यास उत्तेजन देणाऱ्या पत्रकर्त्यांच्या शिरावरची जबाबदारी वाढेल हें कोणीही कबूल करील. त्याचप्रमाणें इतर कायद्यासारखेंच या कायद्याचे संबंधानें अंमलबजावणी करणारांकडून चुका होणें संभवनीय आहे हें विस्तार कर्त्यांसहि कबूल आहे. पण नव्या कायद्यानें मुद्रणस्वातंत्र्याला पहिल्यानें आडकाठी झाली असा पूर्वपक्ष धरून विस्तारकर्त्यांनीं जो विस्तार केला आहे तो अगदींच चुकीचा आहे. हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांचीं मुसक्कीं १९०८ च्या पूर्वींच आवळलीं गेलेलीं आहेत. लेखकांच्या हेतूचा, लेखाच्या दृश्य परिणामाचा अगर दुसरा कसलाही प्रत्यंतर पुरावा फिर्यादिपक्षानें दिल्यावांचून राजद्रोह शाबीत होऊं शकतो आणि पत्रकर्ता तुरुंगांत जातो. अशा प्रकारचा पुरावा आरोपीनें दिल्यास तो ग्राह्य मानण्याची वहिवाट इग्लंडांत आहे आणि हिंदुस्थानांत अशा वहिवाटीचा उगम होण्याला अवकाशच नाहीं. इंग्लंडमधील लेखनस्वातंत्र्यांत व इकडील लेखनस्वातंत्र्यांत येवढा फरक आहे. राजद्रोहाखेरीज इतर आरोपांना अगदीं अपरिहार्य अशा रीतीनें जीं तत्वें लागूं करण्यांत येतात त्यांना हिंदुस्थानच्या मुद्रण स्वातंत्र्याच्या मॉग्नाचार्टीत थाराच मिळूं शकत नाहीं. पत्रकर्ता सरकारचे कितीही व केव्हांही 'अभिनंदन' करो किंवा एखादा प्रकार दुरुस्त करण्याविषयीं तो कितीही 'नम्रपणाची विनंति' करो, त्याच्या लेखांत राज्यव्यवस्थेंतील एखाद्या प्रकाराबद्दल जर नापसंति प्रकट केली असेल तर तो पिनल कोडांतील सध्यांच्या कलमाअन्वयें गुन्हा ठरलाच पाहिजे. त्या पत्रकर्त्यांवर सरकार फिर्याद न करील तर ती अधिकाऱ्यांची कसूर किंवा मेहेरबानी होय. सध्यांचें कायद्याचें स्वरूप असें असतां, हिंदुस्थानांत मुद्रणस्वातंत्र्य आहे ह्मणून ज्याला नाचावयाचें असेल त्याला तसें करण्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे असें उपरोधिक लिहिणें सुद्धां राजद्रोही होणार नाहीं असें कोणी ह्मणावें?

---

## बहिष्काराचा उत्सव

गेल्या ७ व्या तारखेच कलकत्ता येथें 'बहिष्काराचा' वार्षिक उत्सव सर्व जातीच्या लोकांनीं मिळून साजरा केला. बहिष्काराची उत्पति आणि त्याच्या प्रसाराचा इतिहास अवगत नसलेला असा एक तरी मनुष्य हिंदुस्थानांत आज शिल्लक आहे किंवा नाहीं याची शंकाच आहे. स. १९०५ मध्यें प्रथम या विचाराचा बंगाल्यांत उगम झाला तेव्हांपासून आजपर्यंत तीनच वर्षांत हिंदुस्थानांत केवढी उत्क्रांति झाली आहे हें आंकड्यांनीं सिद्ध करण्याचें आतां कारणच उरलेलें नाहीं असें आह्मांस वाटतें. तीन वर्षांपूर्वीं बंगालनें बहिष्कारास प्रारंभ केल्यापासून एकंदर राष्ट्राच्या स्थितींत समूळ बदल झाला आहे असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. बंगालची विभागणी करण्याचा निश्चय जो एकदां सरकारनें केला त्यापासून सरकार रतिभरहि ढळलें नाहीं, मग बहिष्काराचा जय झाला, असें कसें ह्मणावें? असा प्रश्न आमचे हितशत्रु करतात. पण तो प्रश्न करतांना त्यांच्या मनाच्या स्थितीचें जरासें सूक्ष्म अवलोकन केलें तर असें दिसून येतें कीं, तें त्यांचें अवसान उगाच दिखाऊ आहे. अंग्लोइंडियन पत्रकारांनीं कितीहि उसनी ऐट आणून जणूं काय कांहींच झालें नाहीं, असें भासविण्याचा आव आणला, तरी 'अंदरकी बात' निराळी आहे यांत संशय नाहीं. आह्मांला तर या प्रसंगीं शारदा नाटकांत भुजंगनाथाचे तोंडीं घातलेल्या दोन पद्यांची आठवण होते. शारदेचा बाप आपल्याला पहावयास येणार हें ऐकून त्यानें काढलेले 'मी नसे जरी भ्याड जातिचा' इ. उद्गार, किंवा कोदंडानें, तुझें सारें ढोंग बाहेर फोडतो अशी दरडावणी दाखविल्यावर झालेल्या स्थितीचें, 'भेरें कांपेरे' इ. वर्णन बहिष्काराच्या विरुद्ध पांडित्य करणाऱ्या अंग्लोइंडियन पत्रकारांना खास लागूं पडतें. भुजंगनाथाची लाज भद्रेश्वर दीक्षितानें राखली त्याप्रमाणें या भ्याड पत्रकारांची लाज राखण्याला हिंदुस्थानचें अवशेष नष्टचर्य सध्यां पुढें झालें तरी अखेर लाज राखणारांचीच गठडी वळली जाऊन सत्याचा विजय व्हावयाचा हें निश्चत आहे. सकृत पापाचा नाश पुण्यकर्मानें आणि पिशाच्चबाधेपासून सुटका जारणमारणादि पंचाक्षरांच्या उपायानें करावी लागते. जसा रोग तसें औषध हा सृष्टीचा न्याय आहे. ईश्वरदत्त बुद्धीच्या सहाय्यानें मनुष्य प्राण्यानें आपला व्यवहार याच तत्वावर आजपर्यंत चालविला आहे आणि पुढें देखील तो याच तत्वाच्या अनुरोधानें चालणार आहे. हिंदुस्थानांतील उद्योगधंदे कशा रीतीनें लयास गेले याजविषयीं मागें साधार माहिती दिलेली आमच्या वाचकांस आठवत असेलच. ती माहिती नवी नाहीं किंवा अश्रुतपूर्व अशीही नाहीं. त्या माहितीला एक नवी आधार मिळालेला आहे आणि तो सत्य आहे यांत शंका नाहीं. कांहीं अपरिहार्य कारणांनीं शक्तिपात झाला तर शक्तिव्यय बंद करून शक्तिवर्धन आणि शक्तिसंचय करणारीं औषधें घ्यावीं लागतात तद्वतच बहिष्काराचा प्रकार आहे. यांत विपरीत, सृष्टिनियमाविरुद्ध, न्यायनीतीविरुद्ध असें कांहीं नाहीं. बहिष्कार या शद्बांतील अक्षरांत कांहीं मुख्य अर्थ नाहीं. खरा अर्थ त्याप्रमाणें घडणाऱ्या कृतींत आहे. ज्याला केवळ तो शद्ब अवघड वाटत असेल त्यानें तो खुशाल सोडून द्यावा. पण त्यांतील हेतूला पोषक अशी यत्किंचित तरी क्रिया करण्यास जे तयार आहेत ते आपल्या राष्ट्राच्या उद्धाराचें कार्य अत्यंत अल्प अंशानें कां होईना, करण्यास उत्सुक आहेत असेंच सर्व जन समजतील आणि तत्संबंधीं पुण्य त्यांच्या पदरीं पडेल. तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें 'येथ शद्बाचा बडिवार' नाहीं. अर्थ हाच मुख्य हेतु आहे. शद्ब हवा त्यानें बदलून घ्यावा. अर्थ मात्र—मुख्य हेतु मात्र—कायम राहूं द्यावा ह्मणजे झालें. बंगाली राष्ट्रानें संतापाच्या अतिरेकानें कोणत्याहि उद्देशानें हें कार्य सुरू केलेलें असो, त्याला सर्व राष्ट्रानें पाठिंबा दिला याचें बीज यांत आहे, कीं बंगाळकरांच्या प्रेरणेनें सर्व राष्ट्र आपल्या औद्योगिक अवनतीबद्दल जागृत झालें आहे. आतां हें कार्य एकटें बंगाकरांचें नसून सर्व राष्ट्राचें झालें आहे. मृतवत् पडलेल्या आपल्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाला कारणीभूत होणारा हा जिवंत पाण्याचा झरा आहे यांत प्रत्येकानें श्रद्धापूर्वक स्नान केलें पाहिजे. हें अमृततुल्य उदक प्रत्येकानें प्राशन केलें पाहिजे. या तीर्थाच्या सेवनानें अंतर्बाह्य शुचि आणि सतेज झाल्यावर हिंदुस्थानाला पुनः कसल्याही शारीरीक व्याधीची, मानसीक आधीची किंवा छायारूप पिशाचांची बाधा होणार नाहीं.

---

## राजनिष्ठेची कढई.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांना 'आश्चर्याची भूमि' असें नांव देण्यांत येत असतें. हिंदुस्थानांत अशी एखादी भूमि शोधूं गेल्यास बंगालवरच बोट ठेवावें लागेल. त्या प्रांतांत इतक्या परस्पर विसंगत अशा गोष्टी एकामागून एक घडूं लागल्या आहेत कीं बंगाली राष्ट्राचें मन हेंच एक मोठें आश्चर्य आहे असें वाटूं लागतें. राजनिष्ठेची हंडी बळेंच पकविण्याचे दरभंगाच्या महाराजांचे प्रयत्न संपल्या नंतर आतां आणखी तसेच दीडदशे महाराच व बडे लोक या बड्या कार्यां करितां पुढें सरसावले आहेत. कायदेशीर मार्गांनीं निर्भेळ स्वराज्य मिळवूं पहाणाऱ्यांचें आगर बंगालच आहे, तसेंच एकंदर समाजाच्या राजनिष्ठेविषयीं खुद्द ले० गव्हर्नर साहेब साशंक नसतांना भिंतीला तुंबड्या लावणारांचें माहेरघर बंगाल्यांतच आहे. भिक्षांदेहीच्या मार्गानें राजकीय हक्क किंवा स्वराज्य मिळणें शक्य नाहीं ह्मणून नव्या विचारानें उभारलेल्या राष्ट्रीय शिक्षणाला द्रव्यद्वारा सहाय करण्यास

आणि बहिष्काराला पुष्टी देण्यास बंगाली महाराजांनीं मागें घेतलें नाहीं; त्याचप्रमाणें राजनिष्ठेविषयीं कोणी शंका घेण्यापूर्वींच तिचें प्रदर्शन बळेंच करण्याच्या कामीं हेंच वडे लोक पुढें आहेत. ब्रिटिश राज्यांतील न्यायाविषयीं राष्ट्रीय पक्षाच्यां पुढाऱ्यांचा देखील विश्वास अद्याप उडालेला नाहीं. मग आपल्या राजानिष्ठेविषयीं कोणी कुकल्पना काढण्याच्या पूर्वींच त्या कल्पनेला उत्तर देण्याची खबरदारी घेण्याचें सरकाराच्या दरबारीं मानमरातब मिळविणाऱ्या बड्या लोकांना काय कारण असेल तें कळत नाहीं. राजानिष्ठ असणें हा कांहीं सृष्टिनियमांतर्गत असा बोजा नाहीं. त्याचप्रमाणें राजनिष्ठेचें प्रदर्शन न केल्यानेंही तिचा अभाव सिद्ध होतो असेंही नाहीं. बरें नुसत्या प्रदर्शनामुळें राजनिष्ठा अंतर्यामीं वसत असल्याचा खात्रीलायक पुरावा होत नाहीं. हा ज्याच्या त्याच्या विचाराचा प्रश्न आहे. लोकांनीं राजानिष्ठ असावें ही अपेक्षा कांहीं वावगी नाहीं. पण तिजबरोबर कर्तव्याची जोड असते, तिनकडे दुर्लक्ष केल्यानें ती अपेक्षा फलद्रुप होणें शक्य नाहीं. हें देवाणघेवाण आहे. येथें बळेंच कांहीं व्हावें ह्मटल्यानें व्हावयाचें नाहीं, अगर कांहीं होणार असलें तर थांबावयाचें नाहीं. लोकांची राजानिष्ठा अस्थिर झाल्याचा ज्यांना सुगावा लागला असेल त्यांनीं ती स्थिर करण्याचा प्रयत्न करूं नये असें कोणाचें ह्मणणें नाहीं. पण गेल्या पंचवीसतीस वर्षांच्या हकीगती पाहिल्यानंतर आपल्या नुसत्या कोरड्या आश्वासनानें किंवा उपदेशानें वळण्याचें चिन्ह खुद्द सरकारासही दिसून आलेलें नाहीं. तेथें शे नाहीं पांचशे महाराजांनीं अट्टाहास केला ह्मणून काय व्हावयाचें आहे? यापुढें हिंदुस्थानच्या राजकीय व्यवहारांत उधारी चालणें अशक्य आहे. आतां रोख दाम मोजावा आणि भरपूर माप पदरांत घ्यावें. हें पटेल त्यानेंच या फंदांत पडावें. नाहीं पेक्षां गप्प बसावें हें बरें.

## धर्म करितां कर्म उभें राहिलें!

संयुक्त प्रांतांत यंदा दुष्काळाचा कडाका अति तीव्र असल्यामुळें तेथील गरीब आणि अब्रूदार लोकांना व निराश्रीत बायकामुलांना गोळाभर अन्न मिळावें ह्मणून पंजाबचे प्रसिद्ध देशभक्त लाला लजपतराय यांनीं एक फंड उभारून स्वयंसेवकांच्या मदतीनें दुष्काळनिवारणाचें काम चालूं ठेवलें होतें. पण आजच्या स्थितींत हिंदुस्थानांत कोणी पुण्यकर्मही आचरूं नये अशी वेळ आलीशी दिसते. आपल्या देखरेखीखालीं जे स्वयंसेवक गोरगरीबांना मदत करीत गांवोगांव फिरत होते, त्यांच्याविषयीं कांहीं स्थानिक अधिकाऱ्यांना संशय येऊन, त्यांना कोणत्याना कोणत्या तरी उपायांनीं अडचणींत आणण्याचे प्रयत्न चालूं असल्यामुळें आपण हातीं घेतलेलें कार्य यापुढें सुरळीतपणें शक्य नाहीं, असें लालाजींनीं जाहिर पत्राचे द्वारें कळाविलें आहे. दुष्काळकामांतील चोखपणाबद्दल ज्यांची सर्वत्र प्रसिद्धि व स्तुति होत आहे त्याचे सर जॉन ह्युएट साहेबांच्या अमलाखालील संयुक्त प्रांतांत लाला लजपतराय यांचे सारख्यांस असा विलक्षण अनुभव येईल अशी कोणालाही कल्पना नव्हती. पण हिंदुस्थानांत सर्वच कांहीं विचित्र प्रकार चालूं आहेत. अशा वेळीं संयुक्त प्रांताच्या अधिकाऱ्यांनी तरी वहात्या गंगेंत कां सामिल होऊं नये हा प्रश्नच आहे! लालाजींनीं स्पष्टपणें केलेल्या आरोपाची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे त्यांचेकडून उत्तर येणार नाहीं हें ठरलेलेंच आहे. सवत साहत नाहीं आणि पोर होत नाहीं, अशा प्रकारच्या वर्तनाला सर जॉन ह्युएट यांच्या हाताखालचे अधिकारी पात्र व्हावे हें त्यांचें मोठें दुर्दैव आहे. लालाजींनीं जो इतक्या प्रयासानें व स्वार्थ त्यागानें कार्यभाग शिरीं घेतला होता, त्यांत त्यांनीं सरकारी अंमलदाराच्या कसुरीकडे कांहीं दोष देण्यासारखें कांहीं केलेलें नाहीं. सरकारी प्रयत्नांना पुस्ती ह्मणून आपण हें काम करीत आहोंत हें त्यांनीं प्रारंभींच जाहिर केलें होतें. पण अशा अगदीं सोवळ्या हेतूनें व निर्मळ व्यवहारानें सुद्धां लोकोपयोगी असें कोणतेंही काम हिंदुस्थानांत कोणी आरंभूं नये, असा जर कोणी प्रस्तुत प्रकाराचा अर्थ घेतला, तर त्याला काय उत्तर आहे?

## न्यायाचें शिखर.

गृहाला जसे ताल असतात तसेच न्यायाचेही उंच उंच ताल आहेत. सर्वांत श्रेष्ठ व अत्युच्च न्याय मंदीर ह्मणजे प्रिव्हि कौंसिल होय. इंडियांत मनुष्यानें दावयाचा न्याय प्रिव्हि कौन्सिलच्या शिखरावर अखेरीस पोचतो. या उंच शिखराचें दर्शन घ्यावें अशी न्यायाच्या याचकास इच्छा होणें साहजिकच होय. अशी सदिच्छा सध्यां इंडियन राष्ट्रास प्रवर्तवीत आहे आणि राजश्री टिळकच व्यक्तिशः न्याय मागत आहेत असें नसून त्यांना पुढें करून सर्व इंडियन राष्ट्रच न्याय हक्कानें मागत आहे. राजद्रोहासंबंधानें श्रेष्ठतम न्याय देवतेचाच निर्णय मिळाला पाहिजे असा निर्वाणीचा प्रसंग आलेला आहे. इंडियांतील न्याय मंदिरांतून जे निर्णय बाहेर पडत आहेत त्यावरून सर्व देशभर राजद्रोहच आपलें साम्राज्य चालवित आहे असें ह्मणावें लागतें. अशा राष्ट्रीय संकटाच्या वेळीं राजद्रोहाचा कायदा विलायतच्या प्रासाद शिखरापासून सर्व इंडियास विदित व्हावा अशी मोठी जरूरी आहे. या जरूरीचा निर्णय कसा होइल हें एक परमेश्वरालाच ठाऊक पण आमच्या राज्यकर्त्यांच्या सत्वशील वृत्तिवर त्यांच्या न्यायमय दृष्टीवर आणि त्यांच्या आजपर्यंतच्या इभ्रतीवर इंडियन राष्ट्राचा पूर्ण भरंवसा असल्यामुळें प्रिव्हि कौन्सिलाकडे धांव घेण्याची प्रेरणा आशेनें लोकांस पुढें पुढें करित आहे. हे न्याय मंदिराचें आरोहण अत्यंत संकटमय व विपत्तीकारक आहे. संपत्तीचा नाश करूनही आशा ही कितपत कामधेनु ठरते हें तरी त्या हिमालयाच्या उच्च शिखरावर गेल्या वांचून प्रचितीस कसें येणार! अखेरीस अनुभव व्यवहारीक दृष्टीनें सुखद झाला नाहीं तरी देखील या अनुभवाच्या शिखरावर गेल्यानें दृष्टीचें क्षितीज पुष्कळ विस्तृत होतें आणि दूरवरचें क्षितीज परमेश्वराच्या योजनेंत राष्ट्राच्या कल्याणाला कारण होणार असेल तर तसाही सुयोग यावा या दृष्टीनें रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे रा० टिळक यांच्या खटल्या संबधानें प्रिव्हि कौन्सिल पुढें भवतीनभवती करण्यासाठीं विलायतची सफर करण्यास प्रवृत्त झाले आहेत. आणि पूर्व योजनेप्रमाणें परवांच्या आगबोटीनें ते मुंबई बंदराहून आपल्या स्वीकृत उद्योगा निमित्त निघाले असलेच पाहिजेत. मनोरथ पुरे करण्यास श्री समर्थ आहे.

## वास्तु समारंभ

आकोल्याच्या वायव्य कोपऱ्यास रेल्वेच्या रस्त्याला लागून ज्या नव्या पुतळी घराच्या इमारती प्रेक्षकांचें मन आकर्षण करितात त्यांचा वास्तुसमारंभ गेल्या शुक्रवारीं सायंकाळीं पांच वाजतां मोठा टोलेजंग करण्यांत आला. ही नवी गिरणी आकोल्याला मोठी शोभा असून या शहराच्या भावी सुसंपन्नतेचें माहेरघरच होईल, असा पूर्ण भरंवसा आहे. या गिरणीचें नांव दी आकोला आणि मिड इंडिया स्पिनिंग विन्हींग आणि म्यॅन्युफॅक्चरींग कंपनी असून इचें भांडवल ७॥ लक्षाचें आहे. या समारंभानिमित्त मुंबईहून १०।६० पाहुणे मुद्दाम स्पेशल गाडीनें आले होते. या पाहुण्यांपैकीं तिकडील सुप्रसिद्ध गृहस्थ नामदार पारख यांनीं प्रस्ताविक संभाषण केलें. प्रारंभीं त्यांनीं जमलेल्या मंडळींचें स्वागत करून या गिरणीच्या प्रस्थापनेची गोष्ट सांगण्याला आरंभ केला. हिंदुस्थानामध्यें जे भाग कापसाविषयीं प्रसिद्ध आहेत त्या श्रेष्ठ भागांमध्यें वऱ्हाडची गणना आहे. आणि अशा प्रांतांत सुताच्या व कापडाच्या गिरण्या पुष्कळशा उदयास आल्या नाहींत हें एक नवलच होय. मुख्यतः अशी गिरणी स्थापण्याला हा जिल्हा सोईचा असून येथें व्यापाराच्या व दळणवळणाच्यी सोईही फार आहेत. आणि या दृष्टीनें पहातां आह्माला आकोला हें स्थळ गिरणीच्या कारखान्याला फार रमणीय वाटतें. सामान्यतः वऱ्हाडांत कापूस पुष्कळ पिकतो आणि इकडील भागांत अनावृष्टीचा प्रसंग क्वचित येतो. आरबी समुद्राचा पाऊस कमी पडला तर बंगालच्या उपसागराकडून पर्जन्याचा पुरवठा होतो. इकडे कापसाच्या सर्व जाती पिकतात आणि त्यामुळें सूतही निरनिराळ्या प्रतीचें काढतां येईल. भावाच्या बाजूनेंही कापूस स्वस्त पडतो. आणि आपल्याला हें माहितच आहे कीं जेथें कच्चा माल होतो तेथेंच गिरणी चालविणें अधिक फायदेशीर आहे असा अमेरिकेकडे अनुभव आला आहे व तसाच इकडे ही येईल असा भरंवसा आहे. रेल्वेचें भाडें वाचतें; कापूस वटणें, गाठी बांधणें इत्यादि बाबींचा फायदा अशा गिरण्यांना सहजींच मिळतो. या जिल्ह्यांतलि व्यापारी व सुखवस्तु लोक आमच्या मालाला आपला चांगला उदार आश्रय देतील अशा आशेवर आकोल्याचा मोठा व्यापार पाहून येथें गिरणी स्थापित केली आहे. या कारखान्यात २१४०८ चात्या चालून ४१८ माग चालविण्यांत येतील. यंत्रसामुग्री सर्व नवीन सुधारलेल्या पद्धतीची आहे. आणि या गिरणींत काम करणा लोकासाठीं मुद्दाम राहण्याच्या इमारती बांधल्या असून तेथें स्वच्छता व सफाई यांच्याकडे वीशेश लक्ष देण्यांत आलें आहे. मुंबईकडे देखील ही घरांची योजना नव्हती पण आतां इंग्लड व इंडिया मध्यें गिरणीवाल्या लोकांची राहण्याची सोय आरोग्याच्या दृष्टीनें चांगली ठेवण्याचा परिपाठ पडत चालला आहे. नागपूरच्या एंप्रेस मिलनें पहिल्यानें उदाहरण घालून दिलें. आणि त्याचें अनुकरण आह्मी करित आहों. या गिरणीचे मुख्य शिल्पकार रा. एन. जी. संजाना हे असून मुंबईचे रा. नवरोस व हंकलें यांनीं या गिरणीच्या उभारणीच्या कार्यांत उत्कृष्ट कौशल्य दाखविलें आहे.

या नंतर राजश्री क्राफर्ड डेप्युटी कमिशनर यांनीं आपल्या हातानें एंजिन चालवून कारखान्यास प्रारंभ केला. जमलेल्या मंडळीस उद्देशून मोठ्या आदरानें व प्रेमानें स्वतःस दिलेल्या या अपमाना बदल त्यांनीं आभार प्रदर्शित केले आणि ते ह्मणाले कीं अशी एखादी गिरणी खामगांवास निघावी असा माझा फार फार प्रयत्न होता पण ती गोष्ट आकोल्यास झालेली दृष्टीनें पाहुन विशेष आनंद वाटतो. अशा कार्यांचा मी फार चाहता आहे. आणि येथील गिरणींतील सुव्यवस्था व गिरणीच्या लोकांच्या राहण्याच्या उत्कृष्ट सोई पाहून कोणालाही आनंद झाल्यावाचून राहणार नाहीं. अशा गिरण्यामुळें लोकांस उद्योगधंदा पुष्कळ मिळतो आणि प्रांताची सधनाच आपोआपच वाढते. गिरणी सारख्या उद्योगांना सरकारचें पूर्ण प्रोत्साहन आहे असें आश्वासन देऊन त्यांनीं मंडळींचा निरोप घेतला. नंतर हारतुरे फळफळावळ इत्यादिकांचा आदर करीत करीत सर्व मंडळी घरोघर परतली.

या समारंभा निमित्त व्यापारी, अधिकारी व इतर धंदेवाले वगैरे पुष्कळसे युरोपियन व नेटिव्ह गृहस्थ जमले होते. प्रवेश समारंभ फार चांगला झाला पण त्या निमित्त होणारा पुष्कळसा खर्च कंपनीवर नाहीं असें समजून आह्मी या कंपनीच्या पुरस्कर्त्यांची या आनंदवर्धक गोष्टीबद्दल विशेष तारीफ करितों.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—अलिकडे दोन चार दिवसा पासून पावसाच्या भुरभुरीला पुन्हा सुरुवात झाला आहे. आणि तो चांगला ऐन वेळेवर सुरू झाला आहे. उघाडी व पाऊस यांच जर वरचेवर फेरपाला होत जाईल तर विशेष बरें. ऋतूमानानें पाहतां सार्वजानिक आरोग्य पुष्कळ बरें आहे. तथापि खामगांव उमरावती येथें प्लेग उचलखातो कीं काय? अशी भिती पडली आहे.

रा. रा. शहा महमद अबदूल रहिमान, नायब तहाशिल्दार, आकोला हे येत्या २० वे तारखे पासून तीन महिन्यांच्या रजेवर जात आहेत. हे सुशील स्वभावाचे, चांगले कार्यदक्ष व लोकप्रिय असे असून त्यांस चांगली बढती मिळावी अशी लोकांची इच्छा आहे.

## नोटीस

बेशमी— सफदरखा वल्लद मुसेखा मुसलमान रहाणार पिंपळगांव तालुका मलकापूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं मी माझा भाऊ नामे अहमदखा वल्लद युसरखां याच्याशीं भांडलो, व मला निशापाण्याची वाईट आदत आहे असें पाहून तुह्मी मला फसविण्याला सुरुवात केली. व तुह्मी माझ्याशीं वडिलपणाची सलगी दाखविली. भावाशीं भांडून व फिर्याद लावून माझा हिस्सा मिळवून देतों या बहाण्यानें तुह्मी माझ्या कडून पोकळ बिनमोबदल्याचें खरेदीखत लिहून नोंदून घेतलें. माझ्यावर माझ्या भावानें नोटीस दिली हें कळतांच तुह्मी मजा वऱ्हाडसमाचार छापखान्यांत उलट नोटीस आपली खरीदी खरी करण्याच्या इराद्यानें लिहून तयार करविली व त्यावर माझी सही टाकून तुह्मी घेतली. मी सही केली व तुमच्या तंत्रानें इतके माहित्रे वागलो तेव्हां आतां तुमचे कपट चार पंचासमक्ष उघडकीस आलें आहे. तुह्मी माझ्याबरोबर लबाडी व धोक्याची गोष्ट केली पण अशा फसवणुकीच्या खरेदीखतानें तुह्माला कोणतीच मालकी पोंचत नाहीं. माझ्याकडून लिहून घेतलेली पूर्वीची १२-४-०८ रोजींची नोटीस रद्द आहे. हें निराळें कळविण्याची गरज नाहीं. तुमचें कपट मला कळल्यामुळें मी आतां तुह्मांस कळवितों कीं तुह्मी ही नोटीस पोंचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत माझ्याकडून घेतलेलें खरेदीखत परत करावें. तसें या मुदतींत न कराल तर तुह्मावर मला फसविल्याच्या गुन्ह्याबद्दल फौजदारी करावी लागेल. फौजदारीची व दिवाणीची नुकसानी तुह्माकडून या नोटिशीच्या खर्चासुद्धां वसूल केली जाईल. कळावें. ता० २४ माहे जुलै सन १९०८ इ०

सही (उर्दूत)
हरुणखा वल्लद युसुफखा
रहाणार पिंपळगांव
दस्तुर खुद.

नं. घ. ४

## नोटीस

बेशमी- बखतराम वल्लद सूर्यभान [illegible] रहाणार कोलम्बा ऊर्फ रसूलपूर तालुका मलकापूर यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्माकडून ५०० रुपये घेऊन आपलीं चार शेतें पांच पिकासाठीं वाहितीस १०।६।०८ रोजीं दिलीं. आह्मी शेतें पेरण्यास गेलो तर आह्मांस तुमच्याच भाईबंदांनीं हाकलून दिलें आणि पेरण्यास मनाई केली इतकेंच नाहीं तर उलट सर्व प्रकार दंग्याधोप्याचा दिसला ह्मणून आह्मी घरीं येऊन तुह्मांस ही गोष्ट कळविली आणि शेतांचा ताबा करून द्यावा असें पुष्कळदां ह्मटलें तर तुह्मी याप्रमाणें ताबा दिला नाहीं. तुमच्या अशा करण्यानें आमची मोठी नुकसानी होत आहे. तुह्मी शेताचा ताबा आठ दिवसांत द्यावा किंवा आमच्या पांच वर्षांच्या लोगवट्याच्या नुकसानी बद्दल अगाऊ घेतलेल्या ५०० रुपयां सुद्धां १००० रुपये आठ दिवसांत आणून द्यावे. असें करण्यास चुकाल तर तुह्मावर दिवाणींत दावा करून १००० रुपये कोर्ट खर्चासुद्धां वसूल केले जातील. कळावें. तारीख ३१ माहे जुलै सन १९०८ इ०

सही

सयद कासम वल्लद सयद जमाल द. खु.
अबदूल अजीज वल्लद शेग कालू द. खु
उभयतां रहाणार नांदुरा ता०
नं. घ.५ मलकापूर.

## नोटीस

भाई रामसुकदासजी कनयालालजी राठी राहणार उंमर तालुके आकोट यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी कापूस खंडी १० चा सवदा दर खंडीस रुपये ५० प्रमाणें आमचे गुमास्ते छबीलदास नंदराम याच्याशीं भाद्रपद वद्य ८ संवत १९६२ रोजीं करून तुह्मांस अडव्हांस बद्दल अगाऊ रुपये ५० मीती कार्तीक शु० १ संवत १९६३ रोजीं द्यावे. व कापूस चांगला बीन पाण्याचा मीती माघ शु० ५ संवत १९६३ रोजीं दोन शेरी वजनाचें मापानें उमरे येथें मोजून द्यावा व बाकीचे रुपये ४५० त्याचवेळीं तुह्मास द्यावे व कापूस मोजून तुह्मी न दिल्यास बाजारभावाप्रमाणें नफा नुकसानीं भरून द्यावे व घ्यावें यांप्रमाणें ठेवलेलें असोन वरील ठरावाप्रमाणें तुह्मांस ५० रुपये वरील करारास आह्मी देत असतां तुह्मी रुपये घेतलेले नाहीं व सौद्याची चिठी लीहून दिली नाहीं. व करारास कापूस मागितला असतां कापूसहि मोजून दिला नाहीं. ह्यामुळें तुह्मास आमचे झालेल्या नुकसाना बद्दल काय तजवीज करावयाची ह्याबद्दल ह्मटलें असतां तुह्मी कांहींच उत्तर दिलें नाहीं. करितां तुह्मांस ही नोटीस देणें भाग पडून कळविण्यांत येतें कीं माघ शु० ५ संवत १९६३ रोजीं कापसाचा बाजारभाव ६१ प्रमाणें होता त्या मानानें १० खंडी कापसाबद्दल ११० रुपये आमचें नुकसान झालें हे नुकसान व करारापासून दरमहा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें आज मिती पावेतो व्याज असे त्याचे रुपये ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचें आंत आह्मांस देऊन पावती घ्यावी. तसें तें केल्यास तुमच्यावर रीतीप्रमाणें दिवाणींत दावा करून कोर्ट खर्च सुद्धां व या नोटिशीच्या खर्चासह तुमच्यापासून रक्कम भरून घेतली जाईल मग तुमचा कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें. तारीख १९ ७-०८ इ.

सही

शामलाल विसनदास तर्फे मुखत्यार
गोपालदास नथुराम द० खु०

नो. नं. घ ६

आमचें पेटंट यंत्र [illegible]कांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस—

सा. न. वि. वि. तुह्मी कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें त्यानें कडबा फार चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०।१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप रायी ( ग्वालेर ) } श्रीमंत नानासाहेब फाळके दप्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.
स्थापना सन १९०७
भांडवल एक लक्ष रुपयें.
प्रत्येक भाग २५ रुपयाचा
याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीच्या आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरून
**पी. सी. जोगळेकर**
**आणि कंपनी**
**म्या. एजंटस्**

नं. १३

नहि सत्यात् परोधर्म


## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व बक्कशिर पाठवीला जाईल. आह्मांस शेंकडों पत्र आलीं आहेत.

पत्ता:—
श्रीनिवास बाळकृष्ण होळे नरल मर्चंट व कमिशन एजंट.
नं ७२ येवले.

दोन घड्याळें एकदम बोलविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिश्या बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस साखळी मुद्धां शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या कील्लीचे खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.
नं. ४७ मुंबइ पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून बक्कशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.
सायकल टीचर.

पत्ता:----
अहमद अली कासमजी बोहरा
नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवाखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आह्मी आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळजीपूर्वक होत असते हें सर्व श्रुत आहे गरजूं लोकांनी अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी बाळंतरोग, पडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता:—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलीचे शाळेंजवळ
चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला
नं. ख. १

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन रा.जी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमचीं औषधें बारकाईनें पाहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टीफिकेट आम्हास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें. हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शारीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नाना कारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरिर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरिर निरोगी मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:-एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु. ११५ गो ३ रु १५५ गो. ४ रु. २७५ गो० ६ रु. ५५० गो० रु.

२ अपूर्व नेत्राजन:-यानें पडळ, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, च इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:---कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडीक मुताची लाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १॥ भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूड:-दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे .

५ विंचूचें विष:-औषध लावतांच उतरतें मुर्डी ३ तो. ८ आणे

६ गजकर्ण:-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:-औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुन: उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषध:-आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, पात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टीफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म धाक. गुटिका, आसव, तेलें, सुगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक ठिकाणी समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरू केला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या अजिर्डें वगैरे गावांतुन तो पर्यंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आम्हास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यात ज्याचा तो स्वतंत्र आहे आम्हास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्या कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास ले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोगमुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणे अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजानिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंत आणण्याची खटपट करूं. आज-पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरवा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पडसे वद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.


## ORIENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amount a givensum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others,* to mploying a portion of their annual income or profits in effecting life pol oics create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he dies early, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupqismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

2


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

# वऱ्हाडसमाचार.

**BERAR SAMACHAR**

वर्ष ४२] आकोलाः—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख २४ माहे सन आगष्ट १९०८ इसवी [अंक ३२


श्रीराम

ता. २८-७-०८

## टिळक—वियोग दर्शक कविता

( शार्दूल विक्रीडित वृत्त )

( आमच्या प्रीय श्री. सौ. देश भगिनीकडून )

॥ देवा हिंदुसुतांसि दोहिकडुनी केंसा बरें नाडिसी ॥
॥ श्रीकांता तव हिंदबालक दया तूंतें येई कशी ॥
॥ नेतां राष्ट्रपथाग्रणींस धरुनी तूं लोपलासी कुठें ॥
॥ अन्यायास बघोनिया तव न कां काळीज ईशा फुटे ॥१॥

॥ सन्मान्या टिळकांस नेतांनि जना चिंतार्णवीं लोटिलें ॥
॥ आर्यांचा हरुनी अमोलिक हिरा हीनत्व त्या आणिलें ॥
॥ जातां एक कुटुंबपोषक गती ये तत्सुतांतें जशी ॥
॥ नेतां भू-तिलकास हिंदतनया होई अवस्था तशी ॥२॥

॥ झाले विव्हल आर्य-बंधु सगळे कोणा न कांहीं सुचे ॥
॥ नैराश्यें गमताति दुःखद जना उद्योग नेहेमिंचे ॥
॥ नारी अन्न मुलेंहि आज दिसतीं शोकानलीं पोळलीं ॥
॥ साक्षात् मृत्युकळाच पुत्रविरहें भूपाउली पावली ॥३॥

॥ व्यापारी उदिमास बंद करुनी शोकें किती बैसले ॥
॥ दुःखें व्याकुल होउनी शिशुगणी शालागृहा वर्जिलें ॥
॥ कोणी सेवि न वारिबिंदु, न कुणी अन्नासही चाखिती ॥
॥ कोणी संकट वारणार्थ पुजितो भावें भवानीपती ॥४॥

॥ यत्नें लावुनि राष्ट्रपक्षतरु जो अत्यल्प विस्तारला ॥
॥ तों त्या मारुनिया कुऱ्हाड समुळीं तोडोनिया टाकिला ॥
॥ आशा-मंदिर बाधिलें रुचिरसें ज्याच्या प्रयत्नावरी ॥
॥ लोकां लोटियले निराश-गुहरीं नेवोनि त्यांतें दुरी ॥५॥

॥ झाला धन्य तुझी जगांत टिळका सन्मार्ग सेवोनिया ॥
॥ हर्षें लावियलें तुझी निजयशा शत्रूंसही गावया ॥
॥ कीर्ती,-सिंधुसुता,-गणेशदपिता, तुझा सदा सेविती ॥
॥ केली सार्थकता तुझींच तनुची सेवोनि देशाप्रती ॥६॥

॥ झाले यक्षाचि घोर न्यायसदनीं संभाषणा ऐकुनी ॥
॥ केली सिद्ध धरोनि धैर्य अपुली निर्दोषता कीं जनीं ॥
॥ देहा गांजिती रोग जर्जर जरा तुझां जरी पातली ॥
॥ शिक्षा ऐकुनि घोर अल्पहि तरी शांती नसे सोडिली ॥७॥

॥ होई दुर्लभ आपुलें बुधवरा आम्हा आतां दर्शन ॥
॥ लोभे बोधक नीतियुक्त कुठुनी ऐकावया भाषणा ॥
॥ आम्हा कोण तुझाविणें निशिदिनी सत्पंथ दावी तुझा ॥
॥ षड्वर्षें विरहा कळे न कशि हे सोशील हिंदप्रजा ॥८॥

॥ देशा साठींच चित्त-वित्त-तनुला ज्यानें सदा वाहिलें ॥
॥ देशार्थी जनरोष-हाल-अपमानातें जयें साहिलें ॥
॥ कष्टा सोशित चारदा पडूनि जो देशार्थ कारागृहीं ॥
॥ ईशा त्या बळवंतराव टिळका ठेवी सुखी प्रत्यहीं ॥९॥

वंदे मातरम्

---

आकोला श्री सोमवार

ओव्या. चाल

झोपाळयावरची

हिंदुस्तान दःख करी,
देव नाही पाठमोरा
पार्वती पोटी हीरा ॥
बळवंतराव ॥ १० ॥

स्वदेश हिता साठीं
देशाची होते दैना ॥
सुखी ठेवी दयाघना ॥
बळवंताला ॥ ३ ॥

काळेपाणी शीक्षा केली,
केली हो क्षणा मध्यें ॥
चिंता करी पुण्या मध्यें ॥
तापीबाई ॥ ८ ॥

स्वदेश हिता साटी,
जिवाचे होती हाल ॥
सुखी ठेवी घननीळ ॥
टिळकाला ॥ २ ॥

टिळकाला शिक्षा केली,
काळजी मुळीं नाहीं ॥
धन्य ती तापी बाई ॥
पतीव्रता ॥ ९ ॥

टिळकाला शिक्षा केली,
निष्ठुर साहेबांनीं ॥
देशाची झाली हानी ॥
बुधवारीं ॥ ४ ॥

हुकूम सोडीला रात्रीं
च्या दहाला ॥ दुःख सर्व
जगताला ॥ टिळकासाठी ॥ ९ ॥

शिक्षा करुनीया,
काय त्याला सुख झालें ॥
पापिष्ट निवाले ॥
मनामध्यें ॥ ६ ॥

केसरीचा कर्ता,
हिंदुस्तानी श्रेष्ठ त्राता ॥
पुढारी गेला आतां ॥
सहा वर्षें ॥ ७ ॥

आकोल्यास आले,
टीळके पाहिल्यानी ॥
धन्य त्यांच्या दर्शनानीं ॥
लोक झाले ॥ १ ॥

---


## NOTICE

Fixed Deposits for 6 months for sums of Rupees 5000/— and upwards are at present received by the Bank of Bombay, Akola Branch at 4 o/o per annum.

Bank of Bombay
Akola, 21st Augst
fca 1908.

G. A. Phillips
Agent

## नोटीस

मुंबई ब्यँक अकोला मध्यें सध्या रुपये ५००० व त्यावरील रकमेच्या सहा महिने कराराच्या ठेवी दरसाल दर शेंकडा ४ रु. व्याजानें ठेवितां येतात.

मुंबई ब्यँक, अकोला. } G. A. phillips
ता. २२-८-०८ } एजंट.

नं. घ.

विकावयाची आहे-

## तेलाची गिरणी

हिंगणघाट जिल्हा वर्धा येथील शेट बालचंदजी बनसीलालजी यांची तेलाची गिरणी विकावयाची आहे. ज्या कोणाची खरेदी घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणाऱ्यास समक्ष भेटून सौदा ठरवावा. जास्त माहिती लागल्यास पत्रद्वारें कळविण्यांत येईल.

सही
पांडुरंग गोविंद वकील उमरावती
तारीख १८- ८- १९०८


## वर्तमानसार

बॉम्बप्रकरणासंबंधानें अलीपूर कोर्टांत ३१ आरोपींवर चालूं असलेल्या खटल्याची चौकशी पुरी होऊन त्यांस सेशन्स कमिट करण्यांत आलें आहे. आरोपींमधील दुसऱ्या तुकडीच्या चौकशीस ता० २० पासून सुरुवात व्हावयाची आहे.

डाका येथील दरवड्याच्यासंबंधांत नारायणगंजच्या तीस आसामीस पकडण्यांत आलें होतें. डेपुटी म्याजि० यांनीं सर्व आरोपींना जामिनावर सोडून देऊन खटला आगष्ट २९ तारखेस नेमला आहे. काल ता० २० रोजीं डाक्याच्या डिस्ट्रिक्ट म्याजि० सदरहू जामीन रद्द ठरवून आरोपींस पकडण्यांसाठीं पुनः वारंट सोडलीं! डिस्ट्रिक्ट म्याजि०नी ही निष्कारण ढवळाढवळ कां करावी तें समजत नाहीं.

'इंडिया' नांवाच्या जालिम पत्राचे संपादक श्रीनिवास ऐयंगार यास पकडलें असून त्यांच्या छापखान्याची झडती घेण्यांत आली. 'इंडिया' हें साप्ताहिक पत्र असून त्याचा खप इतर सर्व पत्रांपेक्षां जास्ती आहे. 'इंडिया' पत्राचे संपादक श्रीनिवास अय्यंगार यांच्यावर १२४ अ व १५३ अ कलमान्वयें आरोप ठेवण्यांत आला. त्यांच्या घराचीही झडती घेण्यांत आली.

आज तिसरे प्रहरीं तीन वाजतां स्वदेशी मित्रम् ऑफिसची झडती सुरू झाली. झडती तार पाठविली तेव्हांही चालू होती. स्वदेशी मित्रम् हें तामील भाषेंत प्रसिद्ध होणारें दैनिक पत्र असून सुप्रसिद्ध जी. सुब्रह्मण्य अय्यर ( हिंदु पत्राचे माजी संपादक ) हे त्याचे संपादक आहेत. हें पत्र सदर्न इंडियांतच काय पण ब्रह्मदेश स्ट्रेट सेटलमेंट, नाताळ वगैरे जेथें जेथें तामील भाषा बोलतात तेथें तेथें या पत्राचा चांगला खप होत असता.

ता० २१ सकाळच्या मेलनें प्रो० विजापूरकर व जोशी हे येथें येऊन पोलिटिकल एजंटपुढें हजर झाले. त्यांच्याशीं हस्तान्दोलन करून पोलिटिकल एजंटनीं सांगितलें कीं, "आपण कैदी आहांत" त्यांना डिस्ट्रिक्ट म्याजि० कडे पाठविण्यांत आलें. बरोबर पोलीस वगैरे कांहीं देण्यांत आला नाहीं. "आपण सभ्य गृहस्थ आहां" असे उद्गार काढून पोलिटिकल एजंट यांनीं त्यांच्याबरोबर फक्त एक चिठ्ठी दिली.

सध्यां देशांत सर्वत्र अस्वस्थता पसरत चालली असून सरकारकडून कित्येक पत्रकर्त्यांवर खटले होत आहेत. करितां पत्रकारांचे हितसंबंध कोणत्या प्रकारें राखले जातील याचा विचार करण्याकरितां पत्रकारांची परिषद भरवावी अशी 'हिंदुस्थान' पत्रानें सूचना केली आहे.

स्प्रिंगफिल्ड ( इलिनाइस ) येथें निग्रो व युरोपियन यांच्यांत भयंकर मारामारी झाली. युरोपियन लोकांनीं निग्रोच्या घरास आग लावली. एका युरोपियन बाईवर हल्ला केल्याबद्दल हा सूड घेण्यांत आली म्हणतात. वरील मारामारींत दोन ठार मेले आणि ७५ जखमी झाले. लोक अगदीं खवळून गेले आहेत लष्करी मदत मागविण्यांत आली आहे. एका वृद्ध निरपराधी निग्रोस फांशी देण्यांत आलें. निग्रोची स्थिति अनुकंपनीय झाली आहे. ज्ञा० प्र०

पृथिराज सुरेंद्रनाथ आर्य हा मद्रासी वकत्यांवर झालेल्या राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल होऊन, हायकोर्टानें त्यांना राजद्रोह आरोप नं. १ बद्दल पांच वर्षे काळेपाण्याची शिक्षा व राजद्रोह आरोप नं. २ बद्दल तीन वर्षे काळेपाण्याची शिक्षा केली आहे. ह्या दोन शिक्षा एकसमयावच्छेदेंकरून चालणार आहेत, ही न्यायदेवतेची मेहेरबानीच ह्मणावयाची !

ट्रान्सवालसरकारच्या निंद्य वचनभंगाबद्दल निषेधप्रदर्शन करण्याकरितां जोहान्सबर्ग मशिदीसमोरच्या भव्य मैदानांत तीन हजार पौवात्य लोकांची जंगी जाहिरसभा भरली होती. हिंदी व चिनी लोकांनीं आपलीं नांवनोंदीचीं सर्टिफिकिटें जाळून टाकलीं. तीन–चार हजार सर्टिफिकिटें ह्या प्रसंगी जाळण्यांत आलीं.

ईस्टर्न बेंगाल स्टेट रेल्वेच्या होवार स्टेशनाजवळ ११७ अप ट्रेन उलथण्याचा नुकताच प्रयत्न करण्यांत आला. रेलवेच्या रस्त्यावर लोखंडाच्या जंगी पाहरा ठेवलेल्या होत्या. इंजिनचा पुढचा भाग मोडला. पोलिसची चौकशी चालू आहे.

थोड्या दिवसांपूर्वी सरहद्दीवरील ज्या मोहमंद लोकांना ज० विल्कॉक्सनीं धाक दाखवून शांत केलें होतें, त्यांनीं आपली मोहीम सुरू केली आहे. ता. १९ च्या रात्रीं त्यांनीं एका खेड्यांवर हल्ला केला. हल्ल्याचा काय परिणाम झाला तें अद्याप कळलें नाहीं. हे खेडें हिंदी सरहद्दीच्या आंतील बाजूस आहे.

अलाहाबादचे ऑनररी म्याजि० बाबू बद्रीप्रसाद यांच्या दोघा पुतण्यास व दोघां नोकरांस खून केल्याचा आरोपावरून अलाहाबादच्या सेशन्स कोर्टानें फांशीच्या शिक्षा फर्माविल्या होत्या. या शिक्षेविरुद्ध अलाहाबादच्या हायकोर्टांत अपील करण्यांत आलें होतें. हायकोर्टानें सर्व आरोपीस दोषमुक्त करून सोडून दिलें.

१९०७ सालीं एकंदर १ कोटी ५ लक्ष टन कोळसा खाणींतून काढण्यांत आला. यापूर्वीच्या सालापेक्षां ही संख्या १६ लक्ष टनानीं अधिक आहे. वर सांगितलेल्या वजनापैकीं शेंकडा ९५ कोळसा बंगाल्यांतील खाणींतून काढण्यांत आला. पुरवठ्यापेक्षां मागणी अधिक झाल्यानें गेल्या सालीं कोळशाच्याभावही चांगला आला.

गुदस्तां मँगनीजमध्येंही गेल्याच्या मागील सालापेक्षां शेंकडा ५० नीं वाढ झाली आहे. यांतील बहुतेक भाग मध्यप्रांतांतील खाणींतून निघाला. रसायनशास्त्रदृष्ट्या मध्यप्रांतांतील मँगेनीज उंची प्रकारचें असतें. खाणींतून निघणाऱ्या अशोधित धातूंत शेंकडा ५० पासून ५५ या प्रमाणांत मगेनीज निघतें.

हैद्राबाद येथील रेसिडेन्सीच्या हद्दींतील कित्येक गृहस्थांनीं टिळकफंड उभारण्याची व सभा वगैरे भरविण्याची खटपट केल्यावरून त्यांपैकीं एकास तेथून निघून जाण्याचा हुकूम झाला असून बाकीच्यांस ताकीद देण्यांत आली आहे.

वऱ्हाडसमाचार

श्रावण वद्य १३ शके १८३०

## ग्रंथ परिचय.

### मोगऱ्याचीं फुलें.

कमलिनींतील रसाची माधुरी मधुकरच पूर्णपणें अनुभवूं जाणें, हें जरी खरें असलें तरी, उत्तम काव्यानें ज्याला आनंद होत नाहीं, तो मुक्त तरी असला पाहिजे, किंवा पशु तरी असला पाहिजे, हेंहि तितकेंच खरें आहे. आह्मी मुक्त खास नाहीं, आणि रा. गंगाधरपंत मोगरे यांच्या काव्याच्या वाचनानें आह्मास आनंद होतो, यांतहि शंका नाहीं. ईश्वराच्या सृष्टिघटनाकौतुकाचें सर्वस्व एकवटलेलें पहावयाचें असलें तर तें जसें फुलांत सांपडतें, त्याचप्रमाणें आधुनिक महाराष्ट्र कवींच्या काव्यकारित्वाचें अत्यंत श्रेष्ठ प्रमाणहि 'मोगऱ्याच्या फुलांत' खात्रीनें सांपडतें, या परिमळपूरित पुष्पांचा द्वितीय गुच्छ विविधज्ञान कर्त्यांच्या हातून वाचकांपुढें नुकताच सादर करण्यांत आला आहे. या सुगंधी गुच्छाचा अवश्य संग्रह करावा, निदान त्याचें सेवन तरी प्रत्यकानें अवश्य करावें, अशी आह्मी आमच्या वाचकांस आग्रहपूर्वक शिफारस करतों. जुन्या व अलिकडील माहाराष्ट्रकवींच्या तुलनेसंबंधाचा वाद येथें कांहीं वर्षे मोठ्या कडाक्यानें मोजून राहिला आहे. आमच्या मतें मोगऱ्याच्या फुलांचे दोन्ही गुच्छ या वादांत एका पक्षाला प्रतिपक्षावर तुटून पडण्यापूर्वी खात्रीनें विचार करावयास लावतील. रा. गंगाधरपंतांची ती शांत, सौम्य आणि नेहमीं आनंदी वृत्ति; वरिष्ठकनिष्ठांविषयीं सारखाच आदर; निंदा, मत्सर इत्यादि अनिष्ट प्रकारचा व मनोविकारांचा त्यांचे आपणांत दिसून येणारा अभाव ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष अवलोकन करण्याची संधी ज्याला लाभली असेल, त्याला, त्यांची कविता इतकी चित्तवृत्ति शुद्ध करणारी, स्वदेश, स्वसमाज, स्वधर्मनीति याविषयीं आदरणीय अभिमान उत्तेजित करणारी कां असते याविषयीं आश्चर्य करण्याचें कारणच उरणार नाहीं. पण रा. मोगरे यांची कविता सहृदयपणें वाचणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें त्यांची मूर्ति आपल्या डोळ्यासमोर कल्पनेनें उभी करण्याचें मनांत आणलें तरी ती वर केलेल्या वर्णनाबरहुकूम असेल असा आह्माला भरंवसा आहे. रा. गंगाधरपंतांच्या काव्यांत कोणकोणते गुण आहेत हें काव्यशास्त्रवेत्ते आपल्या पोथ्यापुस्तकें धुंडाळून आणि त्यांतील व्याख्या घेऊन ठरवोत, साधारण सहृदय वाचकावर त्यांच्या काव्याचा परिणाम वर सांगितल्याप्रमाणें झाला पाहिजे. रा. गंगाधरपंत हे खरे आर्य आहेत. त्यांच्या काव्यव्यवहारांत मूळ आर्य संस्कृत भाषाजननि आणि तिच्या सद्या मुली यांजपासून घेतलेल्या धनाशिवाय अन्य वित्ताचा पत्ता सहसा लागत नाहीं. त्याचप्रमाणें आर्यसमाजघटना, आर्य संस्कृति, आर्य नीति आणि केवळ आर्यांच्याच ठायीं आढळून येणाऱ्या मनोवृत्ति यांखेरीज इतर कल्पनांचा किंवा विचारांचा गंधहि त्यांच्या व्यवहारांत सांपडत नाहीं असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. स्वतंत्र काव्यांत, त्याचप्रमाणें अन्य भाषांतील काव्यांच्या केलेल्या रुपांतरांत त्यांची कुशलता सारखीच प्रत्ययास येते. 'बुद्धजन्म' नामक प्रकरण त्यांनीं सर एडीवन् अर्नाल्ड यांच्या The light of Asia या सुप्रसिद्ध काव्यावरून लिहिलेलें आहे. बुद्धगौतमाची माता माया हिच्या उदरीं ईश्वरी तेजानें नक्षत्ररूपानें प्रवेश केला. या प्रसंगाचे वर्णन सर अर्नाल्ड यांनी येणेप्रमाणें केलें आहे.

......... a star from havren
Splendid. six rayed, in colur risy pearl,
Whereof the token was an Elephant.
Six tusked, and white as milk of
Kamdhuk.
Shot through the void; and shiu
ing into her.
Entered her womb upon
the right.

या भागाचें रुपांतर रा. मोगरे यांनीं असें केलें आहे.

कीं षट्प्रभा अरुण,मौक्तिक राग धीते
ऐसें जया किरण षट्क विभूषवीतें,
होती तडिज्जिभचि दंत सहाहि ज्याचे,
क्षीरापरी विमल होय यदंग साचें,
तारा असा वारणरूप धारी
मारोनियां व्योममधें भरारी,
शिरोनियां दक्षिण पार्श्व माग
स्वगर्भकोशीं स्थिर होय वेगें.

'माझें झाड' या प्रकरणांत, आपल्या वाडवडिलांनीं, आपण, आपल्या बांधवांनीं व मुलांलेकरांनीं ज्या आम्रवृक्षाच्या छायेखालीं अनुपम सुख भोगलें त्याला तोडण्यास कोणी एक मनुष्य सिद्ध झाला असतां, त्या वृक्षाच्या अभिमानी मनुष्याच्या मुखानें जे शब्द वदविले आहेत, ते जरा जास्त व्यापक दृष्टीनें पाहिले तर स्वदेशप्रीतीचें उद्दीपन करणार आहेत हें कोणालाहि दिसून येईल.

झाड न हें ओव्याचें—
ही माझी होय संपदा सारी।
इच्छा हिच असे—
हें राहो असेंच या दारीं॥
राहील नित्य राहिल,
जो या हातांत दंड हा आहे।
तों यरि कोण बघूं दे
ह्याजकडे वक्रदृष्टिनें पाहे!॥

किती प्रशंसनीय सदभिमान हा!

पण आर्यभूविषयींचा आपला कळकळ प्राय कवीनें, त्या पुण्यभूमीला दीर्घ काल अंतरलेल्या, पण तिच्या दर्शनाविषयीं अत्यंत उत्सुक असलेल्या एका पुरुषाचे मुखानें प्रकट केला आहे. स्थलसंकोचास्तव येथें त्यांतील एकच श्लोक देतों.

ऐश्वर्य विद्या बल या तिहींचें
होवोनियां स्थानचि, या महीचें
स्वामित्व जी भोगितसे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमी?

हा आणि याच्यापुढचे नऊ असे दहा श्लोक 'वंदेमातरम्' हें पद्य जसें बंगालचें राष्ट्रीय गीत झालें त्याप्रमाणें सर्व आर्यावर्ताचें राष्ट्रीयगीत होण्याच्या योग्यतेचे आहे. शिकंदर बादशाहानें दिग्विजयाची बलकठ हांव धरलेली पाहून एका आर्यपुत्राच्या मुखानें अशा प्रवृत्तीच्या सर्व राजांविषयीं खालीलप्रमाणें विचार रा. मोगरे यांनीं प्रकट केले आहेत.

हक्कांचे स्वप्रजेच्या सतत करुनियां
रक्षण स्वाधिकारें
सोड्याचीही करावी स्वपरजनपदीं
वृद्धि नानाप्रकारें
ऐशी ही राजनीति त्यजुनि नृपति हे
कां हराया पहाती
अन्यांचे हक्क गर्वे स्वपरसुखसद
—नांत घालोनि माती!॥

कवि सह्याद्रीच्या सर्व प्रमुख शिखरांचें दर्शन घेऊन शेवटी उद्गार काढतात,—

कोठें हे उच्च माना करुनि गड
यशस्तंभ राया शिवाचे
देती आह्मां मराठ्यां स्मरण घडीघडी
आमच्या वैभवाचें;
गेला! तो काळ गेला निघुनि! विभवहि
नष्ट तें सर्व झालें!
गेलें तें तेज गेलें! पुरुषवरहि ते
भाग्यशाली निमाले!॥

दैव फिरल्यानंतर आप्त, इष्ट, मित्र सर्व निरुपयोगी ठरले, सर्व कामना, वांच्छा, महत्वाकांक्षा जागच्याजागीं जिरल्या, विवंचना राशीस येऊन बसल्या, कांहीं सुचना अशा स्थितींत शेवटीं ईश्वराचें स्मरण झालें; त्याबरोबर काय चमत्कार झाला पहा! कवि ह्मणतात,—

गेलीं निरसुनि दुःखें,
विरल्या चिंताहि जागच्याजागीं;
पुरले सर्व मनोरथ,
मानी मी धन्य आपणालागीं.

'गृहस्थाश्रम' या प्रकरणांत गृहिणी आणि गृहस्थ या दोहोंच्या कर्तव्यांची कवीनें त्यांना ओळख करून दिलेली आहे, ती तर आर्य धर्म आणि नीति यांचें केवळ सारच आहे. गृहिणीला उद्देशून तिच्या पित्याच्या मुखानें कवि तिला बोध करतात,

असशी सुजाण, नलगे
सांगावें तुज पतिव्रताचरणें
साजे युवती, न तशीं
वसनें वा रत्नकांचनाभरणें.

यांतील पतिव्रता या पदाचा अर्थ एक आर्यच पूर्णपणें उमजूं जाणत.

गृहस्थाला उद्देशून कविबोध करतात, त्याचें तात्पर्य हें आहे.—

तोचि मनुष्य खरा.
जो बसवुनिया इंद्रियांवरी पगडा
सारी प्रपंच करुनि
धैर्यानें संकटांसवें झगडा;
हो वा न हो यशस्वी,
होय तयाचाच सुफळ संसार;
जननी धन्य तयाची,
तोचि कुलाचा खरा अलंकार.

आधुनिक आर्याला सर्वांगांनीं सुसंस्कृत करण्याची शक्ति पर्याप्त नसेल, तर मनुष्य प्राण्याची उन्नति करण्याचें काव्यांतील सामर्थ्य महाराष्ट्रांत लुप्तप्राय झालें आहे असें ह्मणावें लागेल.

## खाडीलकरांचीं नाटकें.

## (१)

### कांचनगडची मोहना.

गद्य नाटकें रंगभूमीवर उत्तम रीतीनें वठविण्यांत थोड्याच अवकाशांत प्रसिद्धीस आलेली महाराष्ट्र नाटक मंडळी आणि मराठींत प्रसिद्ध गद्य नाटक कर्ते रा. खाडीलकर, या परस्परांचे गुण उदयास आणण्याला कांचनगडची मोहना हें नाटक प्रथमतः कारण झालें असें [illegible] नाहीं. असें [illegible] दहावर्षें अज्ञात वासांत पडून [illegible] याचें आतां कोणास [illegible] वस्तुस्थिति ही अशी आहे [illegible] अर्थानें योग्यच झालें असें [illegible] येतें. रा. खाडीलकरांनीं [illegible] प्रथम तयार करून भागशः प्रसिद्ध करविलें तेव्हांचा काळ त्यांचा स्वतःचा नव्हता. तो मोडक शिरवळकरांचा काळ होता. भीमदेव व पानपतचा मुकाबला या जोडीच्या भपक्यापुढें मोहनेचें तेज दिपून गेलें असलें, तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. टसल्यांत आणि अस्सलांत इतका तफावत पडावयाचीच. तो भपका कमी झाला, त्याचे मागून साधुसंतांनीं रंगभूमीवर नाचविण्यांतही राम उरला नाहीं, अशा स्थिति येतांच, ह्मणजे ओढून ताणून आणलेल्या सोंगांचा अतिरेकामुळें समाजाला वीट येण्यापर्यंत मजल गेल्यानंतर, प्रतिभेला पुढें सरसावण्याची संधी प्राप्त झाली. नकली नाटकाच्या नकला पाठ करून, रंगभूमीवर त्या कशा बशा ह्मणून टाकून मोकळें होणाऱ्या मंडळ्यांचाहि काळ जाऊन, नाटकांतले मर्म समजून घेऊन, तदनुरूप आपआपली भूमिका करण्याविषयीं झटणाऱ्या पात्रांनीं खचलेल्या नाटक मंडळीला अनुकूल असे दिवस आले. पंतनीं आपली 'आर्या' रूपी कन्या 'रामजोशी तात्याला' दिली, तद्वत रा. खाडीलकरांनीं आपल्या अपत्यांचें संरक्षण व गुणप्रकाशन करण्याचें काम महाराष्ट्र मंडळीकडे दिलें. मंडळीलाहि हें 'जोखमीचें काम' जबाबदारी ओळखून पार पाडण्याची पात्रता आपल्या अंगीं सतत कायम राखण्याची जरूरी उमजली, आणि रा. खाडीलकरांनाहि आपल्या प्रतिभेच्या भव्यावर भव्या लावून पहाण्याला उत्साह आला. रा. खाडीलकर यांच्या नाटकलेखनव्यवसायासंबंधानें इतकी प्रस्तावना पुरे होईल असें वाटतें.

'कांचनगडची मोहना' हें नाटक जसें त्याच्या कर्त्याच्या ग्रंथांतलें पहिलें आहे तसेंच तें स्वातंत्र्य रीतीनें लिहिलेल्या मराठी नाटकांतलें पहिल्या वर्गांतलें आहे. सविधानकांतील साधेपणा आणि सरळपणा हे रा. खाडिलकरांच्या कृतींतील मुख्य गुण या नाटकांत विशेष करून दृष्टोत्पत्तीस येतात. दोन अंकांच्या मधील विश्रांतीच्या पांच मिनिटांत सहा वर्षें उलटून गेलीं असें निमूटपणें कबूल करण्याची बळजबरी रा. खाडीलकरांनीं केलेली नाहीं किंवा 'दहांचा सशस्त्र हात' पडला असतां त्यांतून जगून आपल्या प्रियकराशीं सलग्न झालेल्या नाटिकेलाहि त्यांनीं प्रेक्षकापुढें उभी केलेली नाहीं. अगदीं साधारण व्यवहारांत हमेषा घडणारे प्रसंग कांचनगडची मोहना पहातांना प्रेक्षकाच्या दृष्टीसमोर उभे रहातात, येवढीच साधी आणि सरळ गोष्ट इतर नाटककारांपेक्षां रा. खाडिलकरांना विशेष साधली आहे. कांचनगडची मोहना हेंच नाटक घेतलें तर असें दिसून येतें, कीं नाटककर्त्यांनें स्वतः कल्पनेबरोबर भराऱ्या मारून प्रेक्षकांच्या नशीबीं तसेंच करण्याचें लादलें नाहीं. स्वदेशाच्या मुक्ततेविषयीं अत्यंत उत्सुक असा प्रतापराव, आपला पति आणि सासऱ्या [illegible] मोहना, [illegible] कार्यांत [illegible] तन, मन [illegible] दौलतराव, [illegible] विचार न [illegible] र्यी धुळींत [illegible] तर महत्कार्य करण्यास समर्थ असा हंबीरराव, स्वाभिमानी, अचाट बुद्धीचा पण 'अधर्मस्त्राथानं' पिशाचवत् आचरण करणारा पिलाजीराव, अशा व्यक्ति शोधून काढण्यास मोठासा प्रयास करण्याचें कारण पडणार नाहीं. याचप्रमाणें स्वदेश, स्वसमाज यांना परकीयांच्या सत्तेमुळें अवनति झालेली पाहून या सर्व दुःखाचें, अरिष्टाचें, मूळ जें पारतंत्र्य तेंच खणून काढण्याला मनुष्यप्राणी उद्युक्त झाल्याचीं उदाहरणें हुडकून काढण्याहि फारसे श्रम करण्याचें कारण नाहीं. अशा प्रकारच्या व्यक्ति आणि असे प्रसंग या मराठी रंगभूमीवर या पूर्वी अनेक वेळां येऊन गेलेले आहेत, सध्यां दिसून येत आहेत आणि पुढेंहि येतील हें निःसंशय आहे. सर्वांत श्रेष्ठ सूत्रधार असे प्रयोग वारंवार सर्वत्र करवीत असतो आणि रा. खाडिलकरांनी 'नक्कल' केली असें ह्मणावयाचें असेल, तर ती या प्रयोगांचीच आहे.

तालिकोटच्या संग्रामानें महाराष्ट्रीय समाजाला पारतंत्र्य प्राप्त झाल्यानंतर त्या समाजाला सर्व ऐहिक पुरुषार्थांचें मूळ, जें स्वातंत्र्य त्याचा जोड करून देण्याच्या प्रयत्नाला त्यानंतर दीडशें वर्षांनीं श्रीशिवाजीमहाराजांनीं प्रथम हात घातला व त्यांत सिद्धि मिळविली, असें ह्मणणें सयुक्तिकहि होणार नाहीं. आणि इतिहासालाहि तें मान्य नाहीं. रामराजाच्या राज्याची होळी झाल्यानंतर आणि शिवाजी महाराजांनीं पुनः आपलें छत्रपतित्व स्थापितकरीपर्यंत, मध्यंतरीं तशा प्रकारचे प्रयत्न ठिकठिकाणीं कसे झाले असले पाहिजेत याचें कांचनगडच्या मोहनेच्या रूपानें एक उदाहरण दाखविण्यांत आलें आहे. तालिकोट तालकोट' ह्मणत प्राण सोडणाऱ्या स्वदेशाभिमानी मराठे सरदाराच्या पुत्राच्या हातीं हें काम प्रथम सोपविण्यांत आलेलें असणें साहजिक आहे. रामराजाच्या अभिमानाला सर्वथा पात्र असा पुरुष त्याच्या राज्यांतील पिढीजाद सरदारांच्या वंशजांतच सांपडावयाचा. आपल्या स्वामीची सत्ता नाश पावल्याचें शल्य, त्याच्याच कृपाछत्रामुळें प्राप्त झालेलें सांसारिक सुख उपभोगितांना, ज्याच्या मनांत रात्रंदिवस बोचत राहील अशाच्याच मनांत ही प्रेरणा प्रथम व्हावयाची, तेथेंच तिला मूर्त स्वरूप यावयाचें आणि तदनुरूप कार्यक्रम ठरविण्यांत प्रयत्न त्याच पुरुषाकडे रहावयाचें हा अगदीं सरळ असा क्रम आहे. यांत कृत्रिमपणा कांहीं नाहीं आणि कृत्रिमतेनें नैसर्गिक तेजाची बरोबरी व्हावयाची नाहीं. तरुण उत्साही पण हावळ्या अंतःकरणाच्या प्रतापरावाला दुसरे कांहीं सरदार येऊन मिळाले. त्यांतील एकजण इतर गुणांत प्रतापरावाला साथीदार शोभेसा होता, पण एका गुणांत हा बेटा आपल्या धोरल्याच्या अगदीं उलट होता. प्रतापरावाचें बाहु विजापूरची पाच्छाई धुळीस मिळवून रामराजाच्या वंशजाला हिंदुपद पाच्छाईचा अभिषेक करण्यास फुरफुरत होते. दौलतरावानें ही त्याची इच्छा पूर्ण होण्यास आवश्यक ते सर्व साहित्य जुळविण्याची खटपट सारखी चालू ठेवली होती. कांचनगडकरांचा हेतु बरा नाहीं. असा संशय विजापूरच्या दरबारास येऊन तत्संबंधीं बंदोबस्त करण्यासाठीं दरबारांतून सैन्य व वकील रवाना झाले. परकी सत्ता जरी झाली तरी, तींतील सर्व परिमाणू परकी थोडेच असणार? सैन्य विजापूरच्या बादशहाचें पण त्याचे अधिकारी 'एका नासक्या कुजक्या खानाखेरीज' सर्व पूर्वीच्या मराठेशाहींतील नामांकित सरदारांचे वंशज—आणि जातिवंत मराठे होते. प्रतापराव जाधवाचो मसलत सर्व मराठ्यांच्या हिताकरितांच चालू होती. त्यामुळें बादशाई लष्करांशीं संगनमत झाल्यास मसलतवाल्याची शक्ति आपोआप वाढ्याची व बादशहाची शक्ति तितकीच कमी होण्याची वेळ आली होती. मुसलमान हिंदुस्थानांत तेव्हां परकी असले तरी बोलून चालून पौर्वात्य अडाणीच! असें अरिष्ट टाळण्याचा सुधारलेला मार्ग त्यांना कसा कळणार! असो. या बादशाही सैन्यातले दोघे प्रमुख सरदार जर प्रतापरावास मिळते तर मराठी सत्ता स्थापण्याचें पायीं प्रतापरावास धारातीर्थी देह ठेवून, शेवटीं अतृप्त इच्छा राहिल्यानें पुनरपि जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडण्याचें कांहीं कारण पडतेना! पण तसें कारून होणार? हंबीरराव मोठा पराक्रमी खरा पण मोहनेविषयींच्या वेडामुळें तो माती मोल झाला. अष्टबुद्ध, पापपुण्याची ओळख नसणारा आणि तेजोहीन असा हंबीरराव त्या काळच्या मराठे समाजांतील एका भागाचा द्योतक होय. दुसरा पिलाजी माने, मोठा धूर्त, पण जबर दृष्ट आपमतलबी, महत्वाकांक्षी पण त्यामुळें सर्व सद्विचारावर निखारे पसरणारा असा होता. या शिवाय 'व्यसनी थेरडे' आणि उलट्या काळजाच्या कुत्रा यांचा शिरकाव या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांतील अगदीं महत्वाच्या कामापर्यंत झालेला होता. इकडे बादशहाकडे अवाढव्य सैन्य, राघोजीरावासारखे मातृगमनी लोक, आणि सही सर्वां सामग्री होती. अशी मोहरी पटावर मांडली आणि डाव खेळू लागले तर मात कोण करणार हें उघडच आहे. हंबीरराव व पिलाजीराव हीं मोहरीं नुसतीं निरुपयोगीं करून ठेवावयाचीं. असा घाट घातला तरी त्या दोघाच्या अंगांत अशा कांहीं कळा आहेत—निदान मान्याच्या अंगांत इतरपेक्षां एककळा जास्त खास आहे—कीं त्यांना विसंबून चालावयाचें नाहीं. घरांतले कैकी आणि मूर्ख दादासाहेब आणि त्यांच्या करवीं, नकळत कां होईना पण स्वामीकार्याचा नाश करविण्यालाहि तयार होणाऱ्या कुलटा, हीं दोन्ही कुळें जोंपर्यंत प्रमुखपणें वावरत आहेत तोंपर्यंत मान्याची पांसष्टावी कळा हां हां ह्मणतां सिद्धीस जाणार. पारतंत्र्यरूपी आवदानाचा होम करून स्वातंत्र्य देवतेस संतुष्ट करूं पहाणारा यजमान तरी त्या कामाला सर्वस्वी योग्य असावा लागतो. दुर्दैवानें इश्वरी योजनेनें तसा यजमान इतक्यांतच महाराष्ट्रांत अवतीर्ण होऊं दिला नाहीं. पण एका दृष्टीनें ही इश्वरी योजना कार्य सिद्धीला साधकच होती. अशा जबाबदारीचें कार्य शेवटास नेऊन पोहोंचविण्यास अडथळा करणाऱ्या दुर्गुणांचे क्षालन आणि अनुकूल होणाऱ्या गुणांचा विकास होणें आवश्यक होते. प्रतापराव या मुलाखास लागून गुणांत कमी नव्हे तरी दुर्गुणांत जास्त ठरला. हंबीरराव, पिलाजाराव या जोडीला नुसते डोळ्यांनीं पहातांच ते आपल्या कामीं खात्रीनें मदत करतील अशा उभारीनें त्यानें दौलतराव नको ह्मणत असतां एकदम निकरावर गोष्ट आणली. परकीयांच्या सेवेंत काळ घालविणाऱ्या मराठे सरदारांना पहातांच त्याचा राग अनिवार झाला, त्यांना आपल्यापक्षास वळवून घेण्याचा प्रयत्न करण्याचें बाजूलाच राहून त्यांच्यावर त्यानें त्यांच्या दुर्गुणाबद्दल भाडिमार सुरू केला. त्यानें सर्व कांहीं चांगल्या हेतुनें केलें पण त्याचा परिणाम इष्ट तो झाला नाहीं. त्यानें बादशाही सैन्यांतील सरदारांचीं मनें ओळखलीं नाहींत. 'एक त्यांच्यावर विश्वास तरी ठेवावा किंवा त्यांना हाकून लावावें' असा त्यानें अग्रह धरला आणि हाच उतावळेपणा शेवटीं त्याला नडला. प्रतापरावानें वडिलोपार्जित उपदेशाप्रमाणें स्वदेशाचें ऋण आपल्या व आदल्या पत्नीच्या प्राणाच्या आहूतीनें स्वशक्त्यनुरूप व स्वप्रकृत्यनुरूप फेडलें, या बद्दल तो आदरास पात्र आहे. पण स्वदेशोन्नतीच्या कार्यांतील पुढारी ह्मणून त्याला यश येणें शक्य नव्हतें. रा. खाडिलकरांच्या पहिल्या नाटकांतील हें मुख्य पात्रांचे अंगचे गुणावगुण येणेप्रमाणें आहेत. एवंगुणविशिष्ट पात्रांकरवीं ज्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणें व प्रवृत्तीप्रमाणें साहजिक असा व्यवहार आचरविण्यांत नाटककर्त्यांनीं आपलें पुष्कळसें कौशल्य खर्च केलें आहे. पिलाजीमान्याला नीट ओळखल्यानंतर आणि त्याचे दादासाहेब कोठावळ्यांच्या घरीं जाणें येणें आहे हें ठाऊक झाल्यानंतर, दौलतरावासारख्या धूर्त मुत्सद्याला मान्याच्या हालचालींवर नजर ठेवतां आली नाहीं हें कसें असा प्रश्न उत्पन्न होतो. पण जसा प्रतापराव शिवाजीमहाराजांपेक्षां कमी योग्यतेचा, तसाच दौलतरावहि आपल्या पुढाऱ्यालाच शोभेसा मुत्सद्दी होता, असें दाखविण्याचा नाटककर्त्याचा हेतु असल्यास, आमचें कांहीं ह्मणणें नाहीं.

---

## राष्ट्रीय सभा.

अलाहाबादेच्या कॉन्व्हेन्शन कमिटीनें ठरविलेले राष्ट्रीय सभेच्या रचने संबंधाचे व कामकाज चालविण्यासंबंधाचे नियम

प्रसिद्ध झाल्यानंतर आज सुमारें दोन महिने राष्ट्रीय सभेविषयीं जिकडे तिकडे साम सूम दिसत होती. दोन तीन प्रांतांच्या परिषदा त्या पूर्वींच होऊन गेलेल्या होत्या, पण ज्या प्रांतांत त्या अद्याप व्हावयाच्या होत्या तेथेंही कोठें कांहीं हालचाल दिसून येत नव्हती. मध्यप्रांत व पंजाब येथें तर प्रांतिक परिषदांचें किंवा राष्ट्रीयसभेचें नांवही कोणी घेत नव्हतें. पण मद्रास प्रांतानें त्यावर ताण करून यंदा प्रांतिक परिषद भरवावयाची नाहीं असा ठराव केला. तेव्हां मात्र अत्यंत आश्चर्य वाटलें. या सर्व सामसुमीचें कारण जो तो आपआपल्या मनांत उमजूनच आहे, पण या प्रसंगीं पुढाऱ्यांनीं देखील साधारण लोकांप्रमाणें मूग गिळून बसल्यास त्यांचा पुढारीपणा व्यर्थ होय, असें ह्मटल्यावांचून आह्मांस गत्यंतर दिसत नाहीं. मद्रासच्या महाजन सभेनें प्रांतिक परिषद् न भरविण्याचा विचार प्रसिद्ध केल्यामुळें फारच आश्चर्य वाटलें, तें येवढ्याचसाठीं कीं इतर प्रांताच्या सारखीं पुढाऱ्यांमध्यें फाटाफूट मद्रास इलाख्यांत विशेषशी नाहीं, असा सर्वांचा समज होता. हा समज बदलण्याची वेळ आली असें पहातांच, मद्रासकरांनीं यंदाची राष्ट्रीय सभेची बैठक मद्रासेसच भरविण्याचा विचार आपण करीत आहों असा प्रतिध्वनि उमटवूं देऊन तात्पुरती अब्रू रक्षण करून घेतली आहे. कोणत्याही कारणा करितां कां होईना, मद्रासकर यंदा राष्ट्रीय सभेची जबाबदारी घेण्यास पुढें आले, तर तें शेवटीं त्यांना भूषणावहच होईल.

## जुनी गिरणी

गेल्या आठवड्यांत ज्या नव्या गिरणीची आह्मी प्रस्तावना दिली आहे तिच्या वरून आह्मांस येथें असलेल्या दि नेटीव्ह जिनिंग प्रेसींग स्पिनिंग आणि विव्हींग कंपनीचें कारभाराचें स्मरण सहाजिकच होत आहे. हा जुना कारखाना राव बहादूर देवराव विनायक यांचा कारखाना असा विशेषतः समजतात ह्मणजे ते त्या मानानें त्याचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. हा जुना कारखाना त्याच्या अभिवृद्धि संबंधानें अगदीं लोकांच्या डोळ्या पुढें चमकत होता पण तो आतां डबघाईस येत चालला आहे असें कांहींजण ह्मणतात. आणि कांहींजण असेंही ह्मणतात कीं या कारखान्याला सुताचीं व मागाचीं यंत्रें जोडल्यामुळें आतां भांडवल मोठें करावें लागत आहे. कोणतीही गोष्ट खरी असली तरी आह्मी मनापासून असें इच्छितों कीं वर जेथें आह्मी नवीन पुतळी घर आकोल्यास निघाल्याबद्दल प्रौढी मानीत आहों तेथें त्याच्या तोडीला येथील पहिली गिरणी चांगली नेटानें चाळावी आणि परस्परांच्या स्पर्धेनें व तुलनेनें ती पुन्हा भरभराटीला यावी. नाहीं तर एक जन्मली व दुसरी मृत्यू पावली असा लोकापवाद न आणण्या संबंधानें या जुन्या कंपनीचे चालक विशेष खबरदारी घेतील व आपसांतील भांडणें मिटवून सांप्रतच्या मनूचें शिक्षण त्यांस चांगले मिळालेलें आहे असें प्रचितीस ह्मणून देतील अशी पूर्ण आशा आहे.

आणि आह्माला कळविण्याला आनंद वाटतो कीं रावबहादूर देवराव विनायक हे आपली गिरणी सुस्थितीला आणण्यासाठीं हरप्रयत्न करीत आहेत आणि त्या निमित्त त्यांनीं आपल्या पूजा, आर्चा इत्यादि नित्य कार्याला देखील बराचसा संक्षेप दिला आहे असें कळतें. ईश्वर त्यांच्या प्रयत्नास यश देवो.

## धराधरी

रा. रा. अच्युत बळवंत कोल्हटकर बी. ए. एल एल. बी. संपादक 'देशसेवक' नागपूर हे कलकत्यास बाबू अरविंदघोष व इतर बाबू मंडळी यांच्यावर चालूं असलेल्या खटल्यांत साक्षीसाठीं गेले होते. कलकत्याहून ते मेलगाडीनें शुक्रवारीं दोनप्रहरीं नागपूरास परत आले. स्टेशनावर दाखल होतात तोंच त्यास पोलिस अंमलदारांनीं कैद केलें. बंदोबस्तासाठीं पोलिसचा लवाजमा पुष्कळच मोठा होता. देशसेवक छापखान्याची झडती घेतली आणि सांयकाळीं त्यांस तुरुंगाकडे नेलें. व यांच्यावर राजद्रोहाच्या संबंधानें खटला चालावयाचा आहे. 'मागे हटू नका' हा लेख इतर त्या सारखे लेख हे गुन्हाचा विषय आहे असें कळतें.

त्याच दिवशीं हिंदी केसरीचे कर्ते माधवराव सप्रे बी. ए. यांसही पकडण्यांत आले. त्यांचेवरही राजद्रोहाचा आरोप आहे.

मुंबई, मद्रास, कलकत्ता, वायव्यप्रांत इत्यादि भागाप्रमाणें मध्ये प्रांतांतही राजद्रोहाच्या फौजदारीला प्रारंभ यवतमाळच्या 'हरिकिशोर' पासून सुरू झाला आहे. आणि आमच्या या प्रांतांत या राजद्रोहाच्या सत्रामध्यें आणखी किती आहुति पडावयाच्या आहेत हें कांहीं अद्याप निश्चित नाहीं. तथापि वऱ्हाडांतल्या पेक्षां नागपूरासच या सत्राला अग्रमान मिळावयाला पाहिजे होता कांकीं तें आमच्या स्थानिकसरकारचें राजधानीचें शहर होय. सरकारचा राजद्रोहाचा कायदा आपलें कार्य करीतच आहे तथापि राजश्री पृथ्वीगीर व भावे यांस व आतां त्यांच्या मागून राजश्री कोल्हटकर व सप्रे यांच्या सारख्या सूज्ञ विद्वान गृहस्थांस ही फौजदारी कोर्टींतील कवाईत नको होती. यांचे विचार चुकले असले तरी त्यांस ताळ्यावर आणण्याला खंबीर असें आमच्या प्रांतांत लोकमत जागृत आहे. फौजदारीखटल्यांनीं कदाचित् राजद्रोह बरबर नाहींसा होत असेल पण सरकारच्या शिक्षेमुळें लोकांचीं मनें मात्र अधिक प्रक्षुब्ध होत असतात. राजद्रोहाच्या विचाराच्या घडामोडी आमच्या इकडे बिलकूल नव्हत्या अशा स्थितींत हे फौजदारी खटले झाले नसते तर विशेष बरें होतें.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—या आठवड्यांत पाऊस बराच झाला. आजपर्यंत एकंदर २६ इंच पाणी झालें. उमरावती व खामगांव येथिल प्लेग हळूं हळूं वाढतच आहे. इतर बाबतींत सर्वजनिक आरोग्य बरेंच समाधानकारक आहे.

रा. रा. स्टॉडन डायरेक्टर ऑफ आग्रीकल्चर हे या अठवड्यांत येथें आले होते. शेतकीच्या संबंधानें बरीच चवकशी करून त्यांनीं आकोल्यास जी सेंट्रल बँक स्थापावयाची आहे तिच्या पूर्वारंभा संबंधानें बरीच भवति न भवति करून तिला कायमचें स्वरुप लवकर देण्याचा विचार प्रदर्शित केला.

रा. रा. ए. डी. सी. बार डिस्ट्रीक्ट आणि सेशन जज्ज पश्चिम वऱ्हाड हे प्रकृती थोडी नादुरुस्त असल्यामुळें हे पंधरा दिवसांच्या [illegible] रजेवर मुंबईकडे गेले आहेत.

तोतया:—तुकाराम देवाजी राह[illegible] वणवाडी या नांवाच्या उडाणटप्पु माणसाला एक वर्षपर्यंत चांगलें वर्तन ठेवण्यासाठीं दोन जामीन मागण्यांत आले. ते न मिळाल्यामुळें त्याला तुरुंगांत पाठविले आहे. पूर्वी त्यानें आपलें नांव मोहन्या वल्लद सोम्या असें दिलें होतें व त्या नांवाखालीं त्याला नागपूरकडे एक वर्षाची शिक्षाही झाली होती. मुंबईला राजश्री टिळक यांच्यावर खटला चालूं असतांना तो आकोटास रा. भारुती नाईक आसलकार यांच्या घरीं गेला पण ते यात्रेला गेले असल्यामुळें त्यांच्या मुनिमाजवळ तो ह्मणाला कीं टिळक आणि खापर्डे येथें येणार आहेत तर तत्काळ गाडीबैल इत्यादिकांची योजना करा. पुढें त्याचा जेवणखाण्याचा परमार्ष घेतल्यानंतर थोड्यांच वेळांत ही स्वारी रस्त्यावर दारू पिऊन पडलेली सांपडली. पुढें तो ह्मणाला कीं राजश्री खापर्डे यांच्या घरचा मी नोकर आहे. पण शोधान्तीं तीही गोष्ट खोटी ठरली. त्यानें आपली ओळख पटविण्यासाठीं ह्मणून कांहीं निरनिराळ्या गांवचीं माणसें साक्षीला बोलावलीं. पण रिपोर्ट आला कीं त्यांनीं दिलेल्या नांवाचीं माणसेंच त्या गांवीं नाहींत. असा हा विलक्षण उचल्या लफंगा मनुष्य एक वर्ष तुरुगांत गेला बरें झालें!

महाराष्ट्र नाटकमंडळींनें गेल्या शनिवारीं 'वायकांचें बंड' या नाटकाचा प्रयोग पहिल्यानेंच करून दाखविला. हें बंड पाहण्यासाठीं पुष्कळ पुरुष व स्त्रिया पावसाला न जुमानता गेल्या होत्या. या वरून हें नाटक इकडेही अत्यंत लोकप्रिय होईल.

## नोटीस

आह्मी खाली सही करणारे लोक मुक्काम खामगांव फाटकपुरा हे भोलेखां वल्लद लालखां ऑनररी माजिस्ट्रेट राहणार खामगांव पैकीं सराफा

नोटीस देतो कीं, आमचे पंच लोकांचे रुपये ३०० तीनशें आपणां जवळ न्यामतखां वल्लद बिलनखा यांच्या मार्फत रामचंद्र लालचंद इंगोलीकर यांचे दुकानावर ठेवलें होतें ते मागण्यास पुष्कळ वेळां आलो असतां आपण दिले नाहींत. तरी नोटीस पावल्या तारखेपासून आठ ८ दिवसांचे आंत रुपये देऊन आमची पावती घ्यावी. रुपये न द्याल तर कायद्याप्रमाणें फीर्याद करून कोर्ट खर्चा सुद्धां व नोटिशीच्या खर्चासुद्धां आपणा जवळून सर्व रक्कम भरून घ्यावी लागेल ही नोटीस दिली तारीख१४-८-०८ इ०

सह्या

१ अहमद अली मास्तर द. खु.
२ शेखफरीद वा नुरमहद जमादार द. खु
३ मासुमबेग वा दावलबेग जमादार द. खु
४ गुलाबखां खा साहब द. खु.
५ मासुमशा वा नुरशा फकीर द. खु.
सर्वजण राहणार खामगांव फाटकपुरा.



## वर्गणीचे दर

[illegible] लोकांस........१ रुपया
ट. हा. ........२ रुपये
[illegible] गाऊच घेण्याची वहिवाट ठेविले [illegible].

## नोटशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर सालदर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।२।०९ — G. A Phillips एजंट

नं ७३

## * इकडे लक्ष द्या ! *

त्वरा करा ! त्वरा करा !

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, रंगीत पिठोरी १। रु० यांचीं चित्रें, तुळशीचें लग्न व वटसावित्री वगैरे चित्राचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया, व पिठोरी शेंभर घेतल्यास शेंकडा ०१२ आणे पडतील, शिवाय टपाल खर्च निराळा पडेल.

पत्ताः—
बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२ ] आकोला:—वऱ्हाडसमाचार, सोमवार तारीख ३१ माहे आगष्ट सन १९०८ इसवी [ अंक ३३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन आळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर सालदर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०५ } G. A Phillips एजंठ

नं ७३

विकावयाची आहे-

### तेलाची गिरणी

हिंगणघाट जिल्हा वर्धा येथील शेट बालचंदजी बनसीलालजी यांची तेलाची गिरणी विकावयाची आहे. ज्या कोणाची खरेदी घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालीं सही करणाऱ्यास समक्ष भेटून सौदा ठरवावा. जास्त माहिती लागल्यास पत्रद्वारें कळविण्यांत येईल.

सही
पांडुरंग गोविंद वकील उमरावती
तारीख १८- ८- १९०८

### नोटीस

काशीराव सखाराम देशमुख राहणार वडाळी तालुके आकोट

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी या गावचा वतनदार जोशी आहे. तुह्मी मंडळी बरीच आदावत करिता. शेवटीं आपण त्रास देतां देतां थकले ह्मणून गणपतराव करजगांव व गणू वतोकार आकोट ह्यांना आणून अनेक वेळां त्रास दिला. नुकसान फार केलें तरी मी आजपर्यंत सहन केले. अजमास ८-९ महिनें होऊन गेले तुह्मी सभेस बोलाविलें व मी आलो नाहीं. तेव्हांपासून किती नुकसान केलें व ईजतीच्या गोष्टी या इसमाच्या हातानीं आणल्या. मी सरकार पायाजवळ शीपाई मागण्याबद्दल अर्ज केला शेवटीं मीं पर गावांस राहण्यास गेलों तरी आपणास दया न येतां वडणेरचा ब्राह्मण आणून आमचे गुमास्त्यास धमकी देऊन हक्क संबंधांतही नुकसान मांडलें शेवटीं माझे मुलास त्या गावांस येणें भाग पडलें. कांहीं जमीन मी लागवण लाविली व एक शेत चोपनाचे एकर ३० चे तसेंच पडीत पडलें. कारण त्यांत तीसरा हिस्सा शिवराम तुकाराम देशमुखाचा आहे. सबब गरीब लोक करणार नाहींत. त्यांत तुमची व तुमचे एजंट लोकांनी शेतें केल्याबद्दल धमकी. बरे घरीं वहेती करावी तर आमचे कामदार प्रथमच पळविले आहेत. वतोकार याजला सर्व गांव भीत आहे कारण त्याची चाल असी व तुमची साह्यता. कोणाला मारले तरी साक्ष मिळणें कठीण सबब त्यांनीं दहापांचास मारले आहे आपण हिस्सेदाराची सबब दाखवाल तर पैशाचा मार्ग दिवाणींतला आहे. आपण नांवलौकीकाचें आहा ह्मणून नोटिशीनें कळविलें. नोटीस पावल्यादिवसापासून पंधरा दिवसांत त्या शेताची सोय लाऊन द्यावी. नोटीस अमान्य केल्यास शेतांबद्दल रुपये ७०० व हक्काबद्दल आपण करविलेली नुकसान ते सर्व दावे कोर्टात आपणावर आणावे लागतील. माझे पक्षांतील लोक व स्वतःचे कामदार त्याजवर खोटा आरोप आणू असें ह्मणतां तर तेंहि बुद्धी सोडून द्यावी आणि मारतो मारतो वगैरे प्रतीबंद करतां ती बकासुरी चाल सोडण्यासच बरी आहे. आपणास ह्मणणें आहे कीं आज पासून आह्मास फीर्यादीस फैजदारी कोर्टात पाठऊं नये आणि मी भित्रा आहे कीं नाहीं याचा विचार आपणच करावा. नीचचाल इश्वरास सहन होत नाहीं. तुह्मी या दोन ईसमास आश्रय देऊन सर्व गांवांत बिघाड केला आहे कोण्याकाळी या दो इसमाचा अनुभव तुह्मास येईल. कळावें तारीख १९-८-०८ इसवी.

सही
कोडो विठ्ठल जोशी वडाळी
मुक्काम कारले तालुके दर्यापूर पोष्ट अंजनगांव
नं. घ. २० द. खु.

### नोटीस

नोटीस बेशमी शेख महबूबखा वल्द शेख इस्माइल मुसलमान वस्ती तेल्हारे ता. आकोट जिल्हा आकोला यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी ज्या कामाकरितां तुह्मास जनरल मुखत्यारपत्र दिलें होते व ज्या कामाकरितां तुह्मास मुखत्यार नेमले होते तें कोणतेंच प्रकारें काम मी चालविण्यास इच्छित नाहीं. करितां या नोटिशीनें आज तारखेपासून तुमचा कूलमुखत्यारनामा मी रद्द केला आहे. आजपासून तुह्मी त्या मुखत्यारपत्राच्या आधारे कांहीं काम वगैरे केल्यास तें व यापूर्वीं कांहीं केलें असल्यास तें रद्द असें कळावें. तारीख २८-८-०८ इ.

सही
बनोबी मर्द गुलाबखा मुसलमान राहणार मलकापूर आज मुक्काम आकोला निशाणी खु:द
नं. घ. २१

### जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं माझी लाल खारव्याची पिशवी त्यांत माझे अंत्री मलकापूर तालूकें बाळापूर या गांवीं माझें दुकान आहे त्या दुकाणाचीं गहाणखतें व खरेदीखतें व कांहीं साधे पुर्जे त्या पिशवींत घालून ती पिशवी घेऊन मी शेगांव येथून अंत्रीं दुकानावर गेलो व तेथून हातरुण तालूके बाळापूर येथें सोनाजी वल्द हरी नागळ याजकडे त्याचें वरील हुकूमन्याम्याचा व याशिवाय कांहीं असामीचा निकाल करण्याकरितां गेलो होतो तेथून तारीख ११- ८- १९०८ रोजीं परत येतांना रस्त्यांत सदर्हू दस्तऐवजा सहीत लाल पिशवी रस्त्यांत कोठे पडली याची मला मुळींच भान राहिली नाहीं. सदर्हु पिशवी त्यांतील माझे दस्तऐवजासह कोणास सांपडली असल्यास ती शेगांव तालुके खांमगांव येथें माझे दुकानीं मला आणून दिल्यास त्या बदल त्या मनुष्यास १०० रुपये इनाम देईन. कळावें. तारीख २८-८-०८

सही
श्रीराम बाल्मुकूंद दुकान अंत्री
मालक श्रीराम खतसी दास दस्तुर खू:द
नं. घ. २२

### जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं, आह्मीं आमचा सर्व प्रकारचें खासगी व सरकारी काम पाहणें करितां सितारम वल्द हरूलाल राहणार व्याळें तालुके बाळापूर जिल्हा आकोला यांस मुखत्यार नेमलेला होता. परंतु तो हल्लीं आपलें काम चांगल्या रीतीनें करित नसल्यामूळें आह्मी त्यास आज तारखे पासून कामावरून काढून टाकले आहे. करितां आज पासून त्याचे सहीचा सर्व व्यवहार रद्द असे. व तो कोणी खरा मानल्यास त्यास आह्मी जबावदार नाहीं. हें जाहिरातीनें कळविलें आहे. कळावें. तारीख २८- ८- ०८

सही
राजाराम शिवराम राहणार व्याळे
दस्तुर खु:द ता. बाळापूर जि. आकोला
नं. घ. २३

### NOTICE

Fixed Deposits for 6 months for sums of Rupees 5000/— and upwards are at present received by the Bank of Bombay, Akola Branch at 4 o/o per annum.

Bank of Bombay
Akola, 21st Augst
foa 1908. G. A. Phillips
N. 23 Agent

### नोटीस

मुंबई ब्यँक अकोला मध्यें सध्या रुपये ५००० व त्यावरील रकमेच्या सहा महिने कराराच्या ठेवी दरसाल दर शेंकडा ४ रु. व्याजानें ठेवितां येतात.

मुंबई ब्यँक, अकोला. ता. २२-८-०८ } G. A. Phillips एजंट.

नं. घ. २५

## वर्तमानसार

नागपूरचे कोल्हटकर यांनीं श्रीयुत बाबू अरविंद घोष यांचीं व्याख्यानें छापिलीं होतीं तीं राजद्रोहात्मक वाटल्यामुळें व रा. सप्रे यांच्यावर ता. १३ एप्रील ११ जून व १ आगष्टच्या अंकांत आलेले लेख राजद्रोहात्मक वाटल्यामुळें खटले करण्यांत आले आहेत.

म्हैसूर हेरल्ड पत्र बंद झालें. हें पत्र सूरू होऊन २३ वर्षें झालीं. आपलें पत्र बंद करण्यांत आल्याचें प्रसिद्ध करतांना पत्राचे संपादक ह्मणतात:—यापुढें न्यायकोर्टांतून आह्मांस न्याय देण्याचें काम अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं आपल्या हातांत घेतलें आहे. लोकांबद्दल असलेलें आमचें कर्तव्य योग्य रीतीनें बजावावयाचें ह्मणजे आह्मांस याच अधिकाऱ्यांच्या कृतीवर टीका करण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

# भुईमूग.

( रा. रा. शामसुंदर राव बहादूर बेहारी लाल खजांची जबलपूर यांचा लेख. )

ह्याला वनस्पती शास्त्रांत हिपोगिया ह्मणतात. स्वभावतः जाती डाळीच्या वर्गाची आहे. हिंदुस्थानांत मुंगफली—भुईमूग ह्मणतात.

भुईमूग वार्षिक उत्पन्नांपैकीं असून ह्याचें झाड फार पसरतें. झाडाच्या कांड्या केसाळ असतात. पानें लहान व नोकदार असून निरनिराळ्या रंगाचीं असतात. जमीनीच्या वरच्या फुलास शेंगा लागत नाहींत. शेंगा झाडाच्या कांड्यांस असतात व त्या नळी सारख्या २ इंच लंब्या असून वर पतलें जाळीसारखें कवच रहातें व त्यांत एक दोन किंवा तीन अंडाकृतीचे दाणे रहातात. फुलें कोमजल्यावर फुलांच्या कांड्या वाकून जातात तेव्हां कोंवळ्यां शेंगा जमीनींत घुसून तेथें त्या पक्क होतात. ह्या वरूनच ह्या झाडाचें नांव भुइमूग पडलें आहे ह्या झाडाची मूळ उत्पत्ति ब्रेझिलची आहे. ह्याची लागवड हिंदुस्थानांत पुष्कळ दिवसांपासून होंत आहे त्यांत विशेषेंकरून मद्रास व बांबेप्रेसिडेन्सींत जास्त होते. ह्याचे पुष्कळ प्रकार आहेत. परंतु जबलपुरांत फक्त दोनच प्रकार आढळतात. त्यांपैकीं एक जात मध्यप्रदेशांतील शेतकी खात्यानें दिलेली आमच्या जवळ आहे ती आणि दुसरी बाजारांत दिसते ती.

ह्याचें पीक रेताड भुसभुस्या जमीनींत उत्तम होतें अशा प्रकारच्या जमीनींत वहित केलें तर तीत बाजारांत विकण्या लायक दुसरी बगीचाचीं पिकेंही होऊं शकतात. दोन किंवा तीन फूट खोली पर्यंत मुरमाडी आणि कुजलेली जमीन असली तर त्यामुळें जमीनीचा निकास चांगला होतो. ह्या जिल्ह्यांत ह्या पिका लायक जमीन नदीनाल्याच्या किनाऱ्या वर किंवा भारी सहरा किंवा मुंड जमीनीवर जेथें पाणी संगळत नाहीं अशा ठिकाणीं आढळेत. भारी काळ्या जमीनींत हें पीक घेण्याकारितां खर्च कधीं कधीं उत्पन्नापेक्षां ज्यास्त लागतो. शिवाय अशा जमीनींत शेंगा राहून जातात व त्याचीं झाडें तणाप्रमाणें नंतर आपोआप उगवतात. हलक्या जमीनींत ह्याचें पीक जास्त येतें व लागवडीस खर्चही कमी लागतो. हें पीक ह्या जिल्ह्यांत बरसातीच्या प्रारंभी पेरलें जातें. जमीनीची मशागत वर्षांतून निदान १० दा तरी झाली पाहिजे. उन्हाळ्यांत वखरण दिलें पाहिजे. जमीन नांगरण्यालायक कोरडी असेल तेव्हां बरसातीच्या शिरव्यांत शेंगांतील बीं काढून पेरतात. बीं काढतांना शेंगाचें टरफल काळजीपूर्वक हातानें काढावें परंतु तें काम पेरण्याच्या पूर्वी थोडे दिवस करावें. बीं दर एकरीं ३५ ते ४५ पौंड ( १८ ते २३ शेर ) ह्याप्रमाणें लागतें. ओळी नांगरानें ९ इंचीच्या अंतरावर करून त्यांत बीं हातानें रोंवतात किंवा टाकून देतात. ह्या नांगरानें केलेल्या ओळी ३ इंच पेक्षां जास्त खोल नसाव्या. नांगरण काळजीपूर्वक केलें तर प्रत्येक ओळींत अंतर ९ इंचांचें असतें. एक ओळ झाल्यानंतर दुसऱ्या ओळी करितां नांगरतांना पहिल्या ओळींतील बीं मातीनें झाकले जातें आणि त्याचप्रमाणें प्रत्येक ओळींतील बीं झाकलें जातें. पेरणी झाल्यावर एक हलकी लाकडाची पाटी फिरवून जमीन बरोबर करूं द्यावी. पिकानें जमीन झांकून जाण्याचें पूर्वी त्यास दोन किंवा तीन निंदणें दिलीं पाहिजेत. नंतर पिकाकडे पहाण्याचें काम पडत नाहीं.

आळीपाळीनें पिकें पेरण्याचे कामांत भुईमुगाचें पीक फार महत्वाचें आहे. वलिताचा गहूं, जव, बटाटे, कांदे सरसो, हरबरा, मिरची, सुंट, हळद, राताळी इत्यादि पिकानंतर आळीपाळीनें हें पीक पेरलें जातें. ह्या पिकाचीं रोपें इतकीं झोपाळतात कीं त्यामुळें सर्व जमीन झांकून जाऊन सर्व तण मरून जातें ह्या पिकांत हवेंतून नायट्रोजन शोषण्याची शक्ति असल्यामुळें ह्या पिकानंतर पेरलेल्या दुसऱ्या कोणत्याही पिकास फार फायदा होतो. जमिनींतील. फासफेट व पोट्याश सारखे क्षारिक द्रव्य निघून जावें ह्मणून तिला नायट्रोजन व हिरवें खत देण्याकरितां हें पीक कधीं कधीं पेरलें पाहिजे.

मेंढ्या किंवा बकऱ्यांच्या लेंड्याचें खत ह्या पिकास विशेषें करून फायद्याचें आहे. मेंढ्या किंवा बकरे उन्हाळ्यांत शेतांत बसवाव्या किंवा इतर रितीनें त्यांच्या लेंड्या पैदा कराव्या. असें खत न देऊं शकलें तर शेणाचें चांगलें सडलेलें खत मे महिन्यांत द्यावें आणि बरसातीचें पहिलें पाणी पडण्याचें पूर्वी शेतांत एकसारखें पसरून द्यावें. एकरीं ३० गाडी खत दिलें असतां पुरें होईल. बरसातीचे पिकास सरासरी ६ महिने लागतात. पाऊस न आला तर जमीन ओलसर ठेवावी. अखेरच्या दोन महिन्यांत साधारणपणें ३ ते ५ दां पाणी द्यावें. हें पीक दिसेंबर महिन्याच्या मध्यांत तयार होतें. पिकाची कापणी ( खांदणी ) नागरानें करितात परंतु शेतें कुदळीनें ही खांदतां येतात. खांदण्याचें काम सहज व्हावें ह्मणून वेल कापून वेगळे ठेवतात. हे वेल वाळले किंवा जरड नसले तर गुरांच्या चाऱ्याचे उपयोगी पडतात परंतु हा चारा गुरांना पुष्कळसा देऊं नये. पिकलेल्या शेंगाचें वरचें टोंकर चामड्यासारखें वातड असून रंग काळसर भुरा असतो व वरून जाळी सारखें असतें. खांदून काढल्यावर बियाचा रंग तांबूस असतो. परंतु सांठवून ठेवण्यांत रंग काळसर होतो. चांगल्या जमीनींत पीक ( शेंगा ) साधारणपणें एकरीं ८०० ते १६०० पौंड ( ४०० ते ८०० शेर ) पर्यंत होतें. बहुत करून ह्या पिकाच्या शेंगाच विकल्या जातात. किंमत ४ ते ५ रुपये मण प्रमाणें येते. ह्मणजे एकरीं उत्पन्न ४० ते १०० रुपयेपर्यंत होतें ह्याशिवाय ह्या पिकापासून जमीनीस नायट्रोजन मिळत असल्यामुळें ती सुधरते आणि शिवाय गुरांकरितां चारा मिळतो हे फायदे निराळेच आहेत.

भुईमुगांत तेलाचा अंश जास्त असल्यामुळें हें पीक व्यापारी दृष्ट्या फायद्याचें आहे. बाजारांत मिळतात त्यापेक्षां आह्मी पेरतों त्या जातींत तेलाचा अंश जास्त असतो.

भुइमुगाच्या ढेपीनें गुरें फार लवकर पुष्ट होतात. ह्यांचें दाणे शिजवून खाल्ले असतां मनुष्याकरितां फार रुचकर व पौष्टिक खाद्य होतें. वाटाणा किंवा मसूरा पेक्षां ह्याच्या पोळ्या शरीरांत मांस उत्पन्न करण्याचे कामीं फार फायदेशीर असतात. शिवाय डाळीपेक्षां ह्यांत जास्त चरबी व प्रफोरिक ॲसिड असतो.

## खाडिलकरांची नाटकें.

## ( २ )

### कीचक—वध.

प्रस्तुत नाटक रा. खाडिलकरांच्या नाटकांतील तिसरें आहे. या नाटकाला महाभारतांतील कथेचा आधार घेतलेला असून यांत दाखविलेल्या प्रसंगाची रचना मूळच्या वर्णनाला धरून करण्याचा कर्त्याचा हेतु दिसून येतो. मूळांतील ऐतिहासिक कथाभाग नाटकरूपानें दाखवितांना नाटककर्त्याला आपलें कल्पनाचातूर्य बरेंचसें खर्च करावें लागलें आहे. आणि तसें करतांना त्यांनीं आपणाला पुष्कळसें अडचणींत आणलें आहे हें नाटकप्रयोग पहातांना सहज ध्यानांत येतें. पांडव अज्ञातवासांत विराटराजाचे घरीं निरनिराळ्या वेषांत राहिले असतां विराटाच्या राज्यांतील एक बलाढ्य अधिकाऱ्यानें द्रौपदीविषयीं पापबुद्धि धरून तिची पाठ पुरविली आणि त्यांत त्याचा भीमाकडून अंत झाला, हें सर्व विश्रुत आहे. या साध्या हकीकतीला नाटककर्त्यानें बरेंचसें नटवून तिला उत्तम नाटकाचें स्वरूप दिलें आहे. असें करण्यांत कर्त्याचा हेतु काय असावा याचा उहापोह करण्याची अवश्यकता नसली, तरी त्यानें जगापुढें मांडलेल्या कृतीचें स्वरूप विशदपणें दाखविण्यापासून वाचकांचा आणि प्रेक्षकांचा बराच फायदा होईल अशा समजुतीनें आह्मी तसें करण्याचें योजिलें आहे.

पांडवांतील वडील बंधु धर्मराज याला दुर्योधन व त्याचे साथीदार यांनीं दुष्टबुद्धीनें द्यूतास पाचारण केलें. द्यूताच्या आव्हानाला पाठ देणें हें क्षत्रियाचें कर्म नव्हे अशी तेव्हांच्या क्षत्रियांची प्रामाणिक समजूत असल्यामुळें धर्मराज द्यूतास तयार झाला आणि त्यात सर्वस्व गमावून त्याला अरण्यवास व अज्ञातवास पतकरावा लागला. सध्यांच्या सुधारलेल्या काळांत मुद्दां बेकायदा करारच्या व्याख्येंतून घोड्यांच्या शर्यतीच्या वेळेच्या पैजेची मुक्तता केलेली आहे तद्वत्च हा प्रकार असावा. अज्ञातवासाची मुदत गुजरण्यासाठीं पांडवांनीं विराटाची राजधानी पसंत केली. राजा विराट स्वतः दुर्बल असून त्याचा सेनापती कीचक व त्याचे अनुयायी यांच्या हातीं सर्व सत्ता होती. कीचकअनुकीचकांची पूर्वपरंपरा मोठीशी श्लाघ्य असल्याचें दिसून येत नसून येन केन प्रकारेण सत्ताधीश असल्यामुळें त्या सत्तेच्या तोऱ्यांत ते सर्व जग तुच्छ मानीत होते. 'अबला यत्र प्रबला' इ. प्रसिद्ध सुभाषिताच्या व्याख्येप्रमाणें तंतोतंत नव्हे तरी विराटाचें राज्य पडल्या काळांत अन्नें दिवस काढूं इच्छिणाऱ्यांना सोईचें नव्हतें हें सहज दिसतें. पांडवांसारख्या प्रसिद्ध व्यक्तींना आपल्या सत्यस्वरूपाचीं व अन्नूची जपणूक होण्याला हें राज्य योग्य आहेसें कसें वाटलें याचा आह्माला उलगडा होत नाहीं. रा. खाडिलकरांनींही प्रस्तावनेंत केलेलें स्पष्टीकरण पुरेसें नाहीं. स्वतः विराट राजा धर्मशील व वदान्य आहे येवढ्याच आधारावर त्याच्या राज्यांत निःशस्त्र पांडवांनीं आपल्या अन्नूचें रक्षण करण्याचें ठरविलें कसें, हा विचाराचा प्रश्न आहे. असो. पांडवांनीं खुद्द विराटाच्या पदरीं आपआपल्या अंगीं असलेल्या विशेष कलेच्या आधारावर वृत्ति संपादन केली. ह्मणजे तात्पुरते ते विराटाची प्रजा या रूपानें त्याच्या छत्राखालीं आपआपला उद्यम प्रामाणिकपणानें करीत राहिले. सत्ता आणि शक्ती यांच्या मदांत धुंद असणाऱ्या कीचकाला आपल्या श्रेष्ठत्वाविषयींच्या वेडाची लहर येण्याला कांहीं कारण झालें असतांना सैरंध्रीच्या राजवाड्यांतील वरिष्ठ प्रतीच्या दासीच्या वेषांत असलेली द्रौपदी त्याच्या दृष्टीस पडून त्याच्या मनांत तिजविषयीं पापबुद्धी उत्पन्न झाली. दासदासींना न्यायनीतीची, सदाचरणाची चाड कसली असावयाची, किंबहुना असली तरी आपल्या वैभवापुढें ती चाड कःपदार्थ असल्यामुळें त्यांनीं ती टाकून दिलीच पाहिजे; नव्हे, आपल्या इच्छेखातर त्यांनीं ईश्वरीसद्गुणांना झुगारून देऊन आपली इच्छा तृप्त करण्यांतच खरी पुरुषार्थ मानले पाहिजेत, अशी जी अत्यंत अधम कल्पना कीचकसारख्यांची असावयाची तिला येथें पूर्ण उत्तेजन मिळालें. मी इच्छितो ह्मणूनच सैरंध्रीनें माझी नाटकशाळा होऊन राहिलें पाहिजे असा हट्ट कीचकानें धरला. वास्तविक विराट व त्याची राणी नीतीची चांगली चाड राखणारी माणसें होतीं. कीचकाची इच्छा त्यांना कळली तरी उपकार कर्त्याविषयींच्या साहाजिक अंधश्रद्धेमुळें ती तो धरून बसेल ही कल्पनाहि प्रथम त्यांच्या डोक्यांत आली नाहीं. ह्मणून त्यांना, विशेषतः सुदेष्णा राणीनें कीचकाच्या ह्मणण्याकडे सैरंध्रीच्या सद्गुणांकडे लक्ष देऊन कानाडोळा केला. पण त्याचा परिणाम भलताच झाला. कीचकानें तो आपला अपमान मानून या क्षुल्लक प्रकरणाला राजकाजाचें स्वरूप देण्याचा घाट घातला आणि तो आपला बेत त्यानें भर दरबारांत सर्वांसमक्ष बोलून दाखविला. स्त्रियांच्या सद्गुणांविषयीं पूर्ण आदर धरणाऱ्या पतिव्रतांनीं त्याला पापापासून विङ्मुख करण्याचा आपआपल्या अधिकाराप्रमाणें प्रयत्न केला. त्यामुळें कांहीं थोडा तात्कालिक सुपरिणाम होऊन त्यांच्या अधिकाराची लज्जा राखली गेली. तरी पण कीचकावर कायमचा परिणाम करण्यास स्त्रियांचीं आर्जवें समर्थ झालीं नाहींत. त्यांच्या अंतःकरणांत केवळ पापेच्छेपेक्षांहि अहंकाराचा मद मूर्तिमंत भिनला असल्यामुळें तो नाहींसा होऊन जगांत नांदण्याला त्याचें मन व शरीर अयोग्य झालेलें होतें. सौम्य मात्र्यांच्या योजनेनें गुण येण्यापलिकडे त्याच्या प्रकृतीची मजल गेली होती.

कीचकाचा पशुवत् रानटीपणा किंवा त्याचें सत्तेच्या मदानें बहकेलेलें वर्तन सुधारण्यास कोणते उपाय योजावेत याचा विचार द्रौपदीचे पति पांडव आपल्या ठिकाणीं करीत होतेच. जिच्यावर प्रत्यक्ष प्रसंग गुजरलेला होता त्या द्रौपदीला शांतपणें विचार करणें अशक्य होतें. तिच्या मनांत स्वतःचें दुःख उचंबळत होतें ह्मणून तिची आपल्या भर्त्यांपुढील तक्रार स्वतःपुरतीच होती असें ह्मणतां येत नाहीं. कीचका-सारख्यांची छळणूक सोसण्याचा प्रसंग अमुकच एका व्यक्तीवर येतो असें नाहीं. ज्या परिस्थितींत द्रौपदी होती तशाच परिस्थितींतील सर्व व्यक्तीवर तसे प्रसंग येऊं शकतात. द्रौपदीवर आलेला प्रसंग विराटाच्या राज्यांतील कोणत्याहि पतिव्रतेवर येणें शक्य होतें. कीचकानें जो सत्ताधीश वर्ग निर्माण केला होता त्या बाहेरील विराटाची सर्व प्रजा त्याला तृणवत किंबहुना भोग्यपदार्थवस्तुवत् वाटत होती. आणि असा व्यापकदृष्टीचा विचार मनांत आणूनच पांडवांना त्या वेळीं उपाय योजना करावयाची होती. द्रौपदीला कीचक अनुकीचकांच्या सत्तेच्या कक्षेच्या बाहेर नेणें पांडवांना आपत्तीमुळें बहुतेक अशक्य होतें. धर्मराज या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करीत होता. दुःखानें संतप्त झालेल्या द्रौपदीचें वाग्बाण तो एकीकडे सहन करीत होता आणि दुसरीकडे विराटराजाच्या राज्यांतील सर्व आपदांचें मूळ अजीवात खणून काढण्याला उद्युक्त झालेल्या भीमाला तो आवरीत होता. कीचक बोलून चालून अर्ध्या हळकुंडानें पिवळा झालेला शिरजोर चाकर होता. पण विराटानें त्याच्या हातीं राजसत्तेचा फार मोठा भाग सोंपविला होता. तो विराटस्वरूपच होता. ह्मणून आपल्या दुःखाकरितां त्याला नाहींसा करणें राजसत्तेचा उपमर्द होईल हें प्रजेच्या नात्यानें जाणून तसें करण्यास धर्मराज भीमाला संमती देत नव्हता. एके वेळीं भीमाला संधी आली होती, पण धर्माच्या वर सांगितलेल्या विचारामुळें त्याची अनुज्ञा नसल्या कारणानें इष्ट कार्य करण्यापासून त्यानें आपलें मन आवरून धरलें. कारण, विवेक आणि कार्य यांचें योग्य रीतीनें चित्र रंगविण्यांत नाटक कर्त्यानें फारच कुशलता दाखविलेली आहे. राज्यांतील पापपुण्याविषयीं खरोखर जबाबदार खुद राजा विराटच होता. त्याचेपर्यंत गाऱ्हाणें जाऊन त्याचा निर्णय ऐकल्याखेरीज कोणतेंही साहस करणें प्रजाधर्माला अनुसरून होणार नाहीं हें धर्म जाणून होता. आणि ह्मणून त्यानें तेथपर्यंत मजल येऊं दिली. या शेवटच्या प्रसंगांत राजा विराट कर्तव्यपराङ्मुख झालेला पाहून धर्मानें शेवटीं भीमाला कीचकाला विराटाच्या राज्यांतूनच नुसतें नव्हे तर कायमचाच नाहींसा करण्याविषयीं अनुज्ञा दिली. राजसत्तेचा जेथें उगम होतो तें स्थानच ती सत्ता यथान्याय चालविण्यापासून पराङ्मुख झालें. शिरजोर अधिकाऱ्यांच्या मुर्वतीस्तव सदाचरणी प्रजेची विडंबना झाली तर खुशाल होवो, मात्र ती सिंहासनासमीप होऊं नये, दूर एखाद्या ठिकाणीं झाल्यास आह्मी बिलकूल फिकिर करीत नाहीं असा जबाब विराटानें दिला, तेव्हां धर्मानें प्रजा या नात्यानें आपलें कर्तव्य करण्याला प्रारंभ केला. विराट ही व्यक्ति राजपदावर असली आणि ती कर्तव्यपराङ्मुख झाली तरी प्रजेला जुलमांतून आपली सुटका करून घेऊन राष्ट्राचें—राजसत्ता व प्रजा या दोहींचें—रक्षण करण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं हें धर्मानें ध्यानीं घेऊन भीमाकरवीं सैरंध्रीची आणि विराटाच्या राज्यांतील सर्व निरुपद्रवी, सदाचरणी प्रजेची अपेष्टांतून कायमची मुक्तता करविली.

रा. खाडिलकरांच्या प्रस्तुतच्या कृतीचें सामान्यतः स्वरुप अशा रीतीचें आहे. नाटक या दृष्टीनें ह्मणजे शास्त्राच्या आधारानें त्याची परीक्षा करणें स्थलसंकोचास्तव शक्य नाहीं, या बद्दल आह्मी दिलगिर आहों. पण आमच्या या लेखानें वाचकांस कीचकवध नाटकाचें स्वरुप यथायोग्य कळून आलें तर आमच्या अल्प प्रयत्नाचें फळ आह्मांस भरपूर मिळालें असें आह्मी समजूं.

---

# वऱ्हाडसमाचार

भाद्रपद शुद्ध ५ शके १८३०

## परंपरेच्या अभ्यासाचें महत्व

दहापांच लोकांनीं बळेंच वेडा ह्मणून ठरविल्यामुळें शेवटीं त्या मनुष्याला वेड लागल्याचीं उदाहरणें घडलेलीं आहेत. ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून आशियाटिक तितके सर्व अडाणी, हिंदुस्थानांतील लोकांना सुधारणा कशाशीं खातात हें कळत नव्हतें, उच्च प्रतीच्या कल्पना त्यांच्या बुद्धीला ग्रहण होणें शक्य नाहीं, वगैरे अनेक बाष्कळ प्रलाप वारंवार ऐकूं येऊं लागले. पारतंत्र्यांत कित्येक शतकें गेलीं असल्यामुळें राजकीय बाबतींतील स्वकीय उच्चतम कल्पनांचा ज्यांना पुरता विसर पडला होता अशा लोकांना हे कावेबाज पणाचे टोमणे उलट पुष्पवृष्टीवत् वाटूं लागले. तुह्मी सुधारलेल्या राज्यपद्धतीस पात्र नाहीं, कारण ती तुह्मी पूर्वी कधीं अनुभवलेली नाहीं, त्या पद्धतीच्या स्थापनेला अनुकूल अशी स्थिति तुमच्या समाजाची नाहीं, असें आहे तथापि आह्मी तुमच्यावर राज्य चालवितों तें अत्यंत उच्च हेतूनें असल्यामुळें तुह्मांला घोर अज्ञानांधकारांतून ज्ञानाच्या शिखरावर नेऊन पोंचविलें ह्मणजे आह्मी कृतकृत्य होऊं, आणि येवढ्याचसाठीं तुह्मी अपात्र असतांनाही सुसंस्कृत समाजाला साजेशी राज्यपद्धति आह्मी चालू करीत आहों. असे आशीर्वाद ऐकूं येऊं लागले. मुसलमानी साम्राज्यांतील दोषांचें स्वरूप लोकांच्या भुरळ पडलेल्या डोळ्यांपुढें व्यवस्थेनें मांडण्यांत येऊन त्याच्याशीं नव्या सुधारलेल्या राज्यपद्धतीची तुलना करण्यांत येऊं लागली. या तुलनेचा परिणाम मुसलमानी अमलांतील राज्यपद्धतीला अनुकूल असा होणें शक्य नव्हतें. पण तीमुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या दृष्टीवरचें भ्रमपटल दूर व्हावयाचें बाजूस राहून उलट तें जास्तच वाढलें. त्याज्य ठरलेली पद्धति आमच्या देशांत चालूं होती येवढ्यावरून ती आमचीच होती, आह्मांला ती मान्य होती असा गैरसमज आह्मी करून घेतला आणि त्या गैरसमजाच्या आधारावर आह्मी आह्मांलाच दूषण देऊं लागलों. याप्रमाणें दुसऱ्यांनीं वेडे असें ह्मणतां ह्मणतां आह्मी खरोखरच वेडे आहों असा आमचा समज झाला आणि त्या वेडाच्या लहरींत आत्मपरिक्षण व्हावयाचें अशक्य होऊन आत्मनिंदा मात्र होऊं लागली. शेंदीडशे वर्षांनंतर आह्मांला पुनः विचार करावासा वाटूं लागला आहे, आमचा भ्रम किंचित् कमी होऊं लागला आहे, आह्मी वेडे होतो किंवा शहाणे होतो आणि यापुढें आह्मी कोणत्या स्थितींत राहणार आहों याविषयीं थोडासा विचार आमच्या मनांत उत्पन्न होऊं लागला आहे. ही वेळ आणीबाणीची, क्रांतीची, आहे. कोणता तरी एक नवीन मार्ग आह्मांला स्वीकारावयाचा आहे. पूर्वींच्या काळांतील 'बाबावाक्यंप्रमाणम्' या स्थितींतच सुख मानावयाचें किंवा 'उद्धरेदात्मनात्मानम्' हें वचन स्वीकारावयाचें अशा दोन वाटांच्या सांध्यावर आह्मी आलेले आहों. मध्यंतरी आमची जी कांहीं स्थिति होती तिला कारण काय याचा विचार मनांत आल्यावांचून रहात नाहीं, पण प्रश्न हा आहे कीं, त्या स्थितीच्या कारणावर भडिमार केल्यानें पुढचा मार्ग दिसणार किंवा आत्मनिरीक्षणानें तो सुगम होणार! मनुष्यप्राण्याचा असा एक स्वभावधर्म आहे कीं जाणूनबुजून कितीही नुकसान होवो, तो त्याविषयीं विषाद मानीत नाहीं. पण आपण सद्भावानें चालत असतां दुसरा कोणी आपल्याला भ्रमांत पाडून कांहीं स्वार्थ साधील तर तें त्याला बिलकूल खपत नाहीं. इतर प्राण्यांच्यापेक्षां आपल्याला बुद्धि हें एक जास्त धन ईश्वरापासून मिळालेलें आहे याचा त्याला अभिमान आहे आणि ह्मणूनच या विशेष धनाच्या बाबतींत कोणी त्याच्याशीं दगलबाजी करील तर तो अतिशय संतापतो. आणि एका दृष्टीनें त्याचें करणें रास्त असतें. पण नुसत्या संतापण्यानें त्याचा कार्यभाग होत नाहींत. राग, संताप हे मनोविकार व्यक्त करण्याच्या जागा आणि त्याच्या प्रदर्शनाचा योग्य परिणाम हीं ठरलेलीं आहे. 'प्रीतीविण रोष' काय कामाचा? हें निदान आह्मा महाराष्ट्रीयांस तरी कोणी नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. सारांश इतकाच कीं सध्यांच्या आणीबाणीच्या वेळीं आपल्या अवनतीला कारण झालेल्यांना दोष देण्यापासून कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. नुसते हातपाय हातपाय आपटीत स्वस्थ बसण्यांत अर्थ नाहीं पुढचा मार्ग शोधून काढावयाचा आहे आणि आपल्या उद्दिष्टाचें स्वरूप ठरवावयाचें आहे. उद्दिष्टाचें स्वरूप नक्की केल्याखेरीज प्रयत्नांत सुसंगतता रहावयाची नाहीं आणि प्रयत्नांत सुसंगतता असल्याखेरीज यश प्राप्ती नाहीं, हें निश्चित आहे.

जगांतील राष्ट्रांच्या स्मीतींत हिंदुस्थानानें अधोमुख होऊन बसावयाचें किंवा सर्व उन्नतराष्ट्रांच्या मांडीशीं मांडी भिडवून प्रतिष्ठा संपादन करावयाची हा आतांचा सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे. याच प्रश्नांतून दुसराहि एक प्रश्न निघतो. हिंदुस्थान—ह्मणजे भारतवर्ष कारण हिंदुस्थान हें आमच्या देशाचें खरें नांव नाहीं,—स्वतःच्याच उज्वल रूपांत नांदावयाचें आहे कीं कांहीं अन्य स्वरूपांत त्याचें यापुढेंच वास्तव्य व्हावयाचें आहे. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांप्रमाणें पूर्वपरंपराविरहित आणि स्वबांधवद्रोही ह्मणून भारतवर्षाची कीर्ती जगांत दुमदुमावयाची इच्छा आहे किंवा इंग्लंड जपान प्रमाणें स्वतःच्या अंगच्या उच्चतम गुणांच्या पूर्ण विकासाच्या दैदीप्यमान तेजानें चमकण्याची आकांक्षा आहे हें भरतीयांनीं प्रथम ठरवावयास पाहिजे. आमचे पूजनीय पूर्वज आणि त्यांनीं अगणित काळाच्या अनुभवानें घडवीत आणलेली आमची संस्कृति यांचा यथायोग्य अभिमान धरून याच संस्कृतीच्या जोरावर आह्मी पुनः उदयास येणार किंवा आमच्या हाडींमांशीं न खिळलेल्या परक्या कल्पनांच्या उसन्या अवसानानें आह्मी ऐट मिरवणार, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. ज्ञान आणि सुविचार यांचें स्थान कोणताही एक देश किंवा एक खंड नाहीं हें सर्वांनाच कबूल आहे पण आपली स्थिति, आपला पूर्वेतिहास, आपल्या नैसर्गिक प्रवृत्ति यांच्याशीं सुसंगत असेल तेवढेंच ज्ञान आह्माला पूर्णफलदायी होईल हें कधींही विसरतां कामा नये. भारतवर्षाची पूर्वपरंपरा सुटल्याला, निदान तिला भलतेंच वळण लागल्याला एक हजारांवर वर्षें झालीं आहेत तथापि येवढ्या दीर्घ कालांत एकंदर जगाची रहाटी जितकी बदलली त्यापेक्षां गेल्या शेदोनशें वर्षांत ती जास्त बदललेली आहे. या फरकाचा परिणाम निरनिराळ्या ठिकाणीं कमी जास्त मानानें इष्ट किंवा अनिष्ट झालेला आहे. युरोपांतील राष्ट्रांत गेल्या पांचचारशे वर्षांच्या उत्क्रांतीमुळें जसा हितकर परिणाम झाला तसा किंवा तितका परिणाम आशियाखंडांतील राष्ट्रांवर झालेला नाहीं. पण तो मुळींच झालेला नाहीं असें मात्र ह्मणतां येत नाहीं. आजच्या घटकेला जपानासारख्या चिमुकल्या राष्ट्राची कीर्ती सर्व जगांत दुमदुमावयास हीच लाट पुष्कळ अंशानें कारण झालेली आहे- इराण, तुर्कस्थान या राष्ट्रांवरहि त्याच लाटेचा सुपरिणाम झालेला दिसून येत आहे. चीनाहि त्यांच उसळीसरसें जागें झालेलें आहे आणि या प्रमाणेंच इतर आशियाटिक राष्ट्रांत थोड्याबहुत प्रमाणानें जागृतीचीं चिन्हें दिसून येत आहेत. सध्यांचें युग युरोपच्या अग्रेसरत्वाचें आहे. पूर्वी एका काळीं आशिया खंडाकडे तें पद होतें आणि त्या खंडानें आपली कर्तबगारी उत्तम रीतीनें स्थापित केली होती हेंहि निर्विवाद आहे. युरोपियन राष्ट्रांच्या संसर्गानें आज ज्या आशियाटिक राष्ट्रांत उन्नतीचें तेज चमकूं लागलें आहे त्यांच्या यादीकडे पाहिलें तर वर केलेल्या प्रतिपादनाला विशेष जोर येतो. ज्या मानानें पूर्वपरंपरेचा आधार बळकत्तर

त्या मानानें उन्नति लवकर झाल्याचें या अवलोकनावरून खात्रीनें आढळून येईल. दोन हजार वर्षांच्या अखंड परंपरेच्या जोरावरच जपाननें पहिली जागा पटकावली, त्याच्या मागून येण्याला इराण व तुर्कस्थान या राष्ट्रांत साहजिकच उशीर लागला आणि चीन व अफगाणिस्तान यांना अद्याप पुढें येण्याला नीटशी वाव मिळत नाहीं याचें कारणहि तेंच आहे. विरुद्ध प्रकृतीच्या जीवसृष्टीचें वर्धन प्रतिकूल परिस्थितींत कसें होत नाहीं आणि अनुकूल परिस्थितींत बाह्यतः परकी अशी सृष्टी कशी जोमानें उदयास येते, हें प्राणिशास्त्रावरून सहज प्रत्ययास येतें. प्राण्यांच्या संघानें बनलेल्या समाजांनाहि तोच नियम लागू आहे. ईजिप्त, कोरिया आणि बलूचिस्तान या देशांत अद्याप जी निर्जीवता दिसून येते त्याला कारण तेथील प्रतिकूल परिस्थिति आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीचा दुष्परिणाम अनहितकारक न व्हावा ह्मणून व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या अंगीं असलेल्या आनुवंशिक सद्गुणांचा विकास होणें इष्ट असतें. आणि पूर्वपरंपरागत सुविचारांचा व कल्पनांचा श्रद्धापूर्वक अभ्यास होणें आवश्यक असतें. प्रस्तुत लेखांतील हेतु हाच आहे. आमच्या राष्ट्राला पूर्वकाल आहे, आमचा समाज मागें उत्तम प्रतिष्ठा उपभोगीत होता, त्या वैभवापासून आमची च्युति झाली त्या पूर्वी आह्मी कशा रीतीनें वागत वर्तत होतों, आमच्या ह्मणून ठरलेल्या उच्चतम कल्पना कोणत्या आहेत, त्यांच्या त्या काळच्या स्थितीशीं कसा मेळ बसूं शकत होता आणि आतांच्या काळीं तो कसा बसवितां येईल याचा विचार झाला पाहिजे, कारण त्यावरच राष्ट्राची भावी सुस्थीती अवलंबून राहणार आहे. भावी सुस्थितीचें उद्दीष्ट याच अनुरोधानें ठरणें हितावह आहे आणि ह्मणूनच या अभ्यासाची महति विशेष आहे. या अभ्यासांत आह्माला निरनिराळ्या काळच्या आमच्या इतिहासाकडे नजर द्यावी लागेल मुसलमानी अंमलानंतरच्या एका काळच्या इतिहासाचें महत्व या बाबतींत कांहीं प्रमाणानें आहे पण त्या आणि तशाच दुसऱ्या भागांपेक्षां एकंदर राष्ट्र आर्यत्वाचें उच्चतम वैभव उपभोगीत होतें त्या रामायण भारताच्या काळाकडे दृष्टी वळविणें जास्त श्रेयस्कर आहे. आर्य संस्कृतिचा तो उगम आहे इतकेंच नव्हे तर तिचें सर्वोत्कृष्ट स्वरूप याच काळांत प्रत्ययास आलेलें आहे. या काळाच्या इतिहासाच्या अनुरोधानें आह्मी आपल्या कल्पना कशा सुशोभित करून घेतल्या पाहिजेत, हें या पूढें त्रोटकरीतीनें सांगण्याचा आमचा मानस आहे.

## राजद्रोहाचा यज्ञ.

वर्तमानपत्रकारांवरील राजद्रोहासंबंधाच्या खटल्यांचें सत्र मंदावण्याची कांहींच चिन्हे न दिसतां उलट हा उग्र यज्ञ मोठमोठ्यांच्या आहूतींनीं मोठ्या जोमांत चालू आहे. रशियांत गेल्या वर्षांत या प्रकारच्या सत्राचे पायीं किती लोकांना स्वातंत्र्यास मुकावें लागले या विषयींचे आंकडे आह्मी थोड्याच दिवसापूर्वी प्रसिद्ध केलेले होते. हिंदुस्थानांतील आहूतींची गणाति करण्याचें काम आमच्या एका व्यवसायबंधूनीं हातीं घेतलें असून ते लवकरच जगापुढें येईल असा अजमास आहे नक्की आंकडे काय असतील ते असोत पण साधारण अजमासानें पाहिलें तर रशियाची बरोबरी थोड्याच काळाचे आंत करण्याचें आमच्या दयाळू सरकारानें मनावर घेतलें आहे कीं काय, असें वाटल्यावाचून रहाणार नाहीं. गेल्या आठ पंधरा दिवसांचे आंत निरनिराळ्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांस कमी जास्त महत्वाच्या ठिकाणीं राजद्रोहाचा वास येतो आहे असा भ्रम झाला. मध्यप्रांतांतील दोन वजनदार पत्रांचे संपादक सरकारनें गिरफदार केल्याला चार सहा दिवस लोटतात न लोटतात तोंच कोल्हापुराकडून तितकीच उद्वेकेदनक बातमी आली. 'विश्ववृत्त' मासिकाचे संपादक प्रो. विजापूरकर व रा. जोशी यांजवर राजद्रोहाचा सीमेचा अपराध करण्यास चिथावण्याच्या आरोपावरून खटले झाले आहेत. हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांना तेथील वजनदार पुरुषांच्या आपत्तीची आंच दिल्यानंतर मद्रासला वळगणें शक्य नव्हतें. रा० चिदंबर पिले व सुब्रह्मण्य शिव यांना घोर शासन केल्यानें जो नैसर्गिक परिणाम झाला तो पुरेसा न वाटूनच कीं काय मद्रास सरकारानें प्रसिद्ध देशभक्त मि. जी. सुब्रह्मण्यम् अय्यर यांच्यावर खटला केला. मि. अय्यर यांची राष्ट्रसेवा इतकी महाशूर आहे कीं तिच्यासंबंधानें येथें विशेष वर्णन करण्याचें कारणच नाहीं. अशा योग्यतेच्या पुरुषानें ह्मातारपणीं स्वतंत्रपणें जगांत नांदू नये असा सरकारचा हेतु असल्यास तिला वाईट कोणी ह्मणावें ? सरकार सर्व कांहीं हिंदुस्थानांतील लोकांच्या हिताकारितांच करीत असलें पाहिजे, अशी आजच्या घटकेला सर्वांची पक्की समजूत आहे, आणि ती समजूत होण्याला तशीच जबरदस्त कारणेंहि आहेत. राजद्रोहाच्या खटल्यांनीं प्रजेचें हित साधण्यांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतिक सरकारांची चढाओढ चाललेली पाहून सर्व हिंदुस्थान आनंदातिशयानें भरून न गेलें तर तो त्या सरकारांचा दोष नाहीं. हिंदुस्थानांतले लोक खरोखरच अडाणी ! त्यांना प्रजाहितरक्षणीं तत्पर अशा सरकारच्या कर्तबगारीची कौतुकानें आणि कायदेशीर रीतीनें तारीफ करण्याची कला अद्यापि साध्य झालेली नाहीं.

## राष्ट्रीयसभेचें अधिवेशन.

अलाहाबादेस ठरलेल्या नियमानुसार मद्रास इलाख्याची कॉंग्रेस कमिटी स्थापन झाली असून तिच्या विचमानें यंदांची राष्ट्रीय सभेची बैठक व्हावी असा मद्रासकरांचा हेतु आहे. मुंबई इलाख्याच्या कमिटीची रचना करण्याची तजवीज चालू आहे असें कळतें. इतर प्रांतांतून मात्र या संबंधांत अद्याप शैथिल्य किंवा अनास्था दिसून येत आहे. सुरतेच्या प्रसंगानें एकंदर राष्ट्राच्या मनोवृत्तींत फार मोठी क्रांति घडून आलेली आहे ही गोष्ट कोणी नाकबूल करीत नाहीं. ही क्रांति अंतीं फायदेशीर कशी करून घेतां येईल हा प्रश्न मात्र आज घटकेला सर्वांच्या दृष्टीपुढें आहे; निदान तो असावयास पाहिजे. सुरतेचें भांडण किंवा त्या भांडणाचीं पूर्वकारणें हीं आतां उकरून काढून पुढचा मार्ग सोपा व्हावयाचा नाहीं, हें सर्वांनी लक्षांत घेण्यासारखें आहे. सुरतेच्या प्रकारानंतर राष्ट्रीय सभेची नियमबद्ध रचना झाली किंवा ती करण्याचा प्रयत्न झाला येवढ्यावरून या पूर्वींचें राष्ट्रीय सभेचें काम बेबंदशाईनें चालत असें हें मात्र कोणीही समंजस मनुष्य कबूल करणार नाहीं. राष्ट्रनायकांविषयींच्या अचल श्रद्धेच्या आधारावर हें काम आजपर्यंत चालत आलें होतें आणि यापुढें गृहित नियमांच्या ऐवजीं प्रत्यक्ष नियम आल्यानें त्यांत मोठीशी सुधारणा होणार आहे अशांतला भाग नाहीं. तथापि झालें हें वाईट झालें आहे, हा सर्व प्रकार त्याज्य आहे, असें कोणाही विचारी मनुष्याची मनोदेवता त्यास सांगणार नाहीं. सुरतेच्या प्रकारानें भिन्नभिन्न मतांच्या लोकांमध्यें आपणाला पूज्य अशा व्यक्तिविषयींचा आदर द्विगुणित झाला ही आनंदाची गोष्ट आहे. आणि जोंपर्यंत सर्व विचारी आणि नेत्या पुरुषांची अंतिमासंबधानें एकवाक्यता आहे असें दिसून येईल तोंपर्यंत एका वर्गाचा आपल्या पूज्य व्यक्तिविषयींचा आदर सर्वांविषयींच्या प्रेमांत आणि आपलेपणांत बाध आणू शकावयाचा नाहीं हें निश्चित आहे. सुरतेच्या कॉन्व्हेशननें नेमलेल्या कमिटीवर बहुजनसमाजाचा भरंवसा स्पष्ट दिसून आलेला आहे. या कमिटीनें आपली जबाबदारी सर्वांना सोइस्कर अशा रीतीनें पार पाडली आहे असें आह्मी मागें ह्मटलेलें होतें आणि आज राष्ट्रीय सभेच्या कामास मद्रासकरांनीं आरंभ केलेला पाहून आमच्या वाचकांस पूर्वींच्याहून निराळी सल्ला देण्याचें कारण आह्माला दिसत नाहीं. एकत्र विचारानें राष्ट्र कार्य साधण्यांतिल हित ज्याला ज्याला ह्मणून कळत असेल त्याला सध्यांची घटका फारच आणीबाणीची वाटेल यांत आह्मांला तरी संशय नाहीं. कॉन्व्हेन्शन कमिटीनें केलेल्या नियमांत कोणाला दुरुस्ती व्हावयास पाहिजे असेल तर सध्यांच्या नियमांमूळें असें होण्याला आडकाठी होणार आहे असें कोणालाही वाटावयाचें कारण नाहीं. राष्ट्रीय सभा ही सर्व राष्ट्राची आहे, त्याचप्रमाणें राष्ट्रांतील जे लोक राष्ट्रकार्याविषयीं दक्ष असतील त्या सर्वांच्या किंवा त्यांतील बहुजनांच्या मताप्रमाणें तिचा कार्यभाग उरकण्यांत आला पाहिजे असा आग्रह आवश्य धरला पाहिजे. यंदांची राष्ट्रीय सभा भरली ह्मणजे तींत सध्यां पुढें आलेल्या नियमांतील जे कांहीं भाग कोणाला अडचणींचे वाटतील ते दुरुस्त करून घेण्याचा प्रत्येकाला हक्क राहील. तो हक्क न बजावतां दुरूनच साप साप ह्मणून भुई बडविण्यांत कांहीं हांशील नाहीं, येवढेंच आह्मांस सुचवावयाचें आहे. मनुष्यनिर्मित कोणतीही संस्था सर्वतोपरी परिपूर्ण झाली असें कोणालाही ह्मणतां यावयाचें नाहीं. कन्व्हेन्शन कमिटीनें केलेले नियम यावच्चंद्रदिवाकरौ कायम राखावयाचे असा हट्ट कोणी धरील तर तो कधींही चालावयाचा नाहीं. देशकाल वर्तमानानुरूप त्यांत फरक होत गेलाच पाहिजे. सत्ताधीशांनीं मन मानेल तशा प्रकारानें संस्था चालविल्यानें संस्थेचें चिरस्थाईत्व धोक्यांत आल्यावांचून रहात नाहीं. त्याचप्रमाणें अधिकाऱ्यांच्या ताटाखालच्या मांजराप्रमाणें जेथें सर्व सभासद बावळटपणानें वागतील तेथेंहि संस्थेचा हेतु सिद्धीस जाणें शक्य नाहीं. नव्या नव्या परिस्थितींत जन्मास आलेल्या व वाढलेल्या विचारी सभासदांनीं आपआपल्या सदसद्विवेकबुद्धीला साक्षी ठेवून इच्छिलेल्या मार्गांचें अवलंबन होण्याला संस्थेच्या घटनेंत किंवा नियमांत कायमचा आडफाटा राखलेला असेल तेथें त्या संस्थेकडून इष्टकार्य होण्याची आशा धरणें व्यर्थ आहे अशी स्थिति कॉन्व्हेन्शन कमिटीच्या नियमांमुळें राष्ट्रीयसभेची झालेली नाहीं आणि ह्मणूनच तिच्यांत सामील होऊन राष्ट्रकार्याविषयींच्या उहापोहांत आपल्या विचारांची भर टाकण्याला आणि सर्वानुमतें पसंत झालेल्या मार्गानें जाण्याला आपली तयारी उत्तरीनें व कृतीनें दर्शविण्याला कोणाला हरकत येण्यासारखी नाहीं.

## वऱ्हाडवृत्त.

हवामान— पाऊस पुरेसा झाला आहे. उघाडी पाहिजे. पिकांचा जोर आतांच कमी कमी होत आहे. सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक नाहीं.

प्लेगाचा संसर्ग— उमरातीहून एक प्लेगाची बाई येथें येऊन गावांतील मध्यवस्तींत मरण पावली. पुढली भीती फार पडली आहे!

पेनशनावर हल्ला— रा. रा. शिवराजसिंग पेनशनर तहाशिल्दार रामपायली जिल्हा भंडारा यांचें पेनशन राजकीय बाबतींत अंग असल्याच्या संशयावरून स्थानिक सरकारनें बंद केलें आहे. ही नवी योजना ह्मणजे गुलामगिरीचा कुलपी गोळाच होय!

४ सप्तेंबर— या तारखेला देशसेवकाचे कर्ते राजश्री कोल्हटकर व हिंदीकसरीचे कर्ते राजश्री सप्रे या सद्गृहस्थांवरील राजद्रोहाच्या खटल्यास प्रारंभ होईल. जामीन अर्ज नामंजूर ! प्रस्तुत कालीं चांगल्या चांगल्या श्रेष्ठ गृहस्थांच्या आपत्तीमुळें सर्व राष्ट्राच्याच नेत्रांतून ऊष्ण अश्रु एकसारखे गळत आहेत! राजद्रोहाचा कायदा बदलण्याकडे राजश्री मोर्ले वळतील तरच हें राष्ट्र जीवंत राहील.

आह्मांस लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं मध्य प्रांतांतील सिव्हील व्हेटरनरी खात्याचे सुपरिनटेंडेंट रा० जेठाजी यांस गेल्या बुधवारीं देवाज्ञा झाली. नेटीव अधिकारी अगोदरच थोडे आणि तशांत ही हानी फार मोठीच होय!

सुपरिणाम— राजश्री टिळक यांनीं प्रस्थापित केलेला मद्यपानाचा निषेध इतका सार्वत्रिक होत चालला आहे कीं त्याचा परिणाम कलाली दुकानच्या खालील फेरलिलावांच्या रकमावरून चांगला दिसून पडतो:—

| गांव | बारामाही रु. | २९।८।०८ च्या हरासाची रक्कम |
|---|---|---|
| कुरुम | २९०० | ३९६ |
| कामरगांव बेंबळा | १३९० | २०६ |
| चामठी | ११०० | १८९ |
| आकोली | ९७१ | २६ |

दोन घडयाळें एकदम बोलविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजदर्णाच्या २४ शिइया बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घडयाळ बक्षीस साखळी सुद्धां शिशीस ।.



रासेकोप सिस्टम किं. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे घली रु. ४। आठ दिवसाच्या कीळीचे खिशा- तील घडयाळ रु. १४ सोलजर वाच, मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु १ पोस्टखर्च ।-

के. नुरा आणि कं.

बं. ३७ मुंबई पोस्ट न. ९

त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून बक्षशिर काम केलें जाईल आजवर ९०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व हेर गांवच्या लोकांकडून रेलेभाडे व जे घण खर्च घेतला जाईल. सायकली ही दरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ताः----

अहमद अली कासमजी बोहरा

नं ४८ इं. ७ आकोला ( शहर )

## देशी दवाखाना

( वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आही आमचा दवखाना पुन्हा चालूं केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेली असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे गरजूं लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रीस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुपणी बाळंतरोग, पडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ताः—वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोले येथें शहरांत मुलीचे शाळेंजवळ

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८३० आकोला न. ख. १

आमचें पेटंट यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— सा. न. वि. वि. तुही कृपाकरुन पाठ विलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोचलें त्यानें कडबा फार चांगला कापल जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पंसत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत ( रु. १०॥१० ) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती ता. ४- २- ०८

सही

जहागीरदार सीप सखी ( ग्वालेर ) | श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारांनें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रक्कम प्रत्येक महिन्याला रु. ५ प्रमाणें पुरी करुन दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरॅंडम् व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टस्च्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकुमावरुन

पी. सी. जोगळेकर

आणि कंपनी

म्या. एजंटस्.

नं. १३

नहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं माल रोखीनें अगर व्हि. पी. नें पाठविला जाईल माल स्वस्त सुबक व बक्षशिर पाठवीला जाईल. आह्मांस शेंकडों पत्रं आलीं आहेत.

पत्ताः—

श्रीनिवास बाळकृष्ण दोडे जनरल मर्चंट व कमिशन एजंट.

नं ७२ येवले.

## वर्तमानसार

उक्ति व कृति यांच्यांत मेळ ठेवणें ही विधात्यानें मानवकोटींतील साधारण प्राण्यांसच नियम घालून दिलेला असावा. ज्यांनीं देशसेवेसाठीं एकदां दीक्षा घेऊन कंबर बांधली व त्रिगुणातीत होऊन जे ‘को विधिः को निषेधः’ या स्थितीला जाऊन पोंचले, त्यांना वास्तविक हा नियम बाधूं नये. परंतु आह्मांसारख्या अज्ञ जनांच्या बुद्धीस असला विसंवाद दिसतांच मोह पडावा व ‘तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्’ अशी आमची स्थिति व्हावी यांत कांहीं आश्चर्य नाहीं. श्यामजी कृष्णवर्मा यांचा पॅरिसाकडे कूच व बिपिन बाबू यांचे हिंदुस्थानातून अशा अडचणीच्या वेळीं उड्डाण यांची कारणें बहुतकरुन समानशीलच असावीत. असो; भाविक थिऑसाफिस्ट मानतात त्याप्रमाणें याही कृतींत एखादें ‘इसोटेरिक’, रहस्य’ असण्याचा संभव आहे.

शनिवारीं ता. २२ रोजीं रात्रीं इंडिया क्लबनें नामदार राधाचरण पाल यांना मेजवानी दिली. मेजवानीचे वेळीं भाषण करतांना ना. राधाचरण ह्मणालेः—

हल्लींची अस्वस्थता हिंदी लोकांनींच उत्पन्न केली असें प्रतिपादन करण्याचा कांहीं माणसांचा परिपाठच पडून गेला आहे; परंतु वस्तुस्थितीचें निर्विकार बुद्धीनें निरीक्षण करण्याची अशी खात्री होईल कीं, सरकाराकडून पद्धतशीर रीतीनें लोकमताचा होत असलेला तिरस्कार, हिंदी लोकांना निकृष्ट लेखून कांहीं युरोपियन अधिकाऱ्यांची त्यांच्याशीं होत असलेली उद्दामपणाची वागणूक, लोकांची सर्वतोपरी झालेली निराशा, फाजील कळकळ बाळगणाऱ्या कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनीं चालविलेला खेळखंडोबा इत्यादि अनेक कारणांनीं सांप्रतची अस्वस्थता जन्मास आली आहे.

‘एका हातानें टाळी वाजत नाहीं’ हें तत्व सदैव लक्षांत ठेवलें पाहिजे. राज्यकर्त्यांची प्रजेबद्दल सहानुभूति हीच सुराज्याची गुरुकिल्ली आहे. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत सहानुभूतीचें किती महत्व आहे हें प्रिन्स ऑफ वेल्स यांनीं आपल्या गिल्ड हॉलमध्यें झालेल्या भाषणांत उत्कृष्ट रीतीनें व्यक्त केलें होतें. ही सहानुभूति नुसती शाब्दिक असून उपयोगी नाहीं. ती कृतींत उतरला पाहिजे. गतकाळचें जर आपण सिंहावलोकन करूं या जातिविषयक भेदबुद्धीस इल्बर्ट बिलापासूनच आरंभ झाला आहे, अशी कोणाचीही खात्री होईल. पुण्यशीलतेनें राष्ट्राची उन्नति होते असें त्या वेळेस लार्ड रीपनसाहेबांनीं कौन्सिलमध्यें उद्गार काढले होते. त्याबद्दल येथील व विलायतेतील बऱ्याच आंग्लो-इंडियनांनीं लार्ड रिपन साहेबांविरुद्ध व त्याहीपेक्षां हिंदी लोकांविरुद्ध एकच कल्होळ उडवून दिला होता. त्या वेळपर्यंत इंग्लिश लोकांबद्दल हिंदी लोकांत पराकोटीचा आदरभाव व पूज्यबुद्धि वसत होती; परंतु जातिविषयक वैमनस्याचें बीजारोपण त्या वेळेस झालें व तो विषवृक्ष आज पंचवीस वर्षांनीं आपल्याला जोमांत वाढलेला दिसत आहे.

हा प्रकार नाहींसा होणें अत्यन्त इष्ट आहे. दोन्हीं जातीना समान हक्कांचा उपभोग घेतां येऊन त्यांची प्रेमानें व सुखानें नांदणूक व्हावी, एतदर्थ अवश्य प्रयत्न झाले पाहिजेत. राज्यकर्त्यांची जात घोड्यावर आहे व आपण रस्त्यावर तुडविले जात आहोंत, ही हिंदी लोकांची भावना नाहींशी झाली पाहिजे.

बाबू बिपिन चन्द्र पाल हे गोवळकोंडा बोटीनें इंग्लंडास जात आहेत, ती बोट आज मद्रास बंदरांत येऊन पोंचली.

बोखार्स, रामगड येथील कोळशाच्या खाणी बंगाल-नागपुर व ईस्टइंडिया रेल्वे- कंपन्यांनीं आपल्या ताब्यांत घेणे ह्मणजे खाजगी व्यापारांत ढवळाढवळ करणें होय अशी इंडियन माइनिंग असोसिएशननें स्टेट सेक्रेटरीकडे तक्रार केली होती. खाजगी व्यापारांत ढवळाढवळ होते या मुद्यावर रेल्वेकंपन्यांना कोळशाच्या खाणी न खरेदी करूं देण्याचें तत्व आपणास कबूल नाहीं; तथापि तक्रारीचा योग्य विचार केला जाईल, असें स्टेट सेक्रेटरीनीं मायानिंग असोसिएशनला उत्तर दिलें आहे.

फ्रान्समधील हिंदी रहिवाशांनीं बाबू अरविंद घोस यांच्या डिफेन्सफंडास १० पौंड पाठविले आहेत.

लो. टिळक यांच्या शिक्षेबद्दल दुःखप्रदर्शन करण्यासाठीं चिपळूण येथें नुकत्याच भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान तेथील पोलीस पाटील भट न ना थत्ते यांनीं स्वीकारल्यावरुन कलेक्टरनी त्यास तार करुन कामावरुन सस्पेंड केलें.

नुकतीच कोल्हापूर येथील शाळांवर व प्रायव्हेट स्कूलच्या इमारतीवर बांब तयार करण्याची कृतीचीं चिठारी सांपडली. लायब्ररींत एक चिठोरें सांपडलें. व प्रायव्हेट स्कुलच्या लॅबोरेटरीमधील कांहीं रसायनिक द्रव्य चोरीस गेल्याचें आढळून आलें आहे.

या देशांतील विद्यार्थ्यांस शिकविण्यासार खे विषय ह्मटले पाहिजेः—

( १ ) जगाचा सामान्य भूगोल, आणि हिंदुस्थान आणि त्या लगतच्या समुद्राची विशेष तपशीलवार माहिती.

( २ ) नाणे आणि पेढ्यांचा व्यापार.

( ३ ) कारखाने उभारणें, आणि मजुरां संबंधी व्यवस्था.

( ४ ) कोणत्या बाजारांत कोणता माल खरेदी करावा याबद्दल माहिती.

( ५ ) रेल्वेचे दर व रेल्वेसंबंधी देव- घेवीची माहिती.

( ६ ) यांत्रिक शक्तीसंबंधी सामान्य माहिती.

( ७ ) व्यापारासंबंधी कायदे व वहिवाटीची माहिती.

आपल्या प्रजेला लष्करी शिक्षण देण्याचें काबुलच्या अमीरानें सुरु केलें आहे, व आफगाणिस्थानांत बनणाऱ्या बंदुका वरीलकामात उठविला आहे. प्रजे पैकीं दर आठ मनुष्यांत एकानें तरी लष्करी नोकरी केलीच पाहिजे असा जाहिर नामा अमीरानें प्रसिद्ध केला आहे. आफगाणी व्यापाऱ्यांनीं यावर्षी पुष्कळ बंदुका मागविल्यामुळें बंदुकांची किंमत बरीच उतरत चालली आहे. आपल्या पैकीं सर्वत्राच्या हातीं शस्त्रें मिळावीं असा अमिराचा रोख दिसतो.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोलें यांनी आमचीं औषधें व रक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिले आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्य स्तंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सूवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तोंच शरिर निरोगी राहुन सर्व सौख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रु उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच; धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय मुत्रमार्ग. व नेत्र याचा दाह, क्षय, पंडूरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश पित्तविकार. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्टीमैथूनाने आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी मजबुत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्धी वृद्धि वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न प लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत. करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाली आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष मुलें, यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ आहे ४ रुपयाचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपान खर्डा सोबत किंवा व्ही. पीनें खालील पत्यावर मिळतील.

दर:–एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु. ११९ गो ३ रु १६९ गो. ४ रु. २७९ गो० ६ रु. ९९० गो० रु.

२ अपुर्व नेत्रांजनः–यानें वडस, साहर, फुल, खुपऱ्या, बिंदु, व इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरें होउन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरं रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु.

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः–कोणताही नवा जुना परमा व उजन्य दहा तिडकि मुत्राची छाली, संकोच पुपस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठेंच दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु. २

४ दंतबलवर्धक पूडः–दंतसंबंधी सर्व विकार उत्तम बरे !

५ विंचूचें विषः–औषध लावतांच उतरतें मुळीं ३ तो. ८ आणे

६ गजकर्णः–खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः–औषध घेताच कशाहि प्रकारचें ज्वर असले तरी तें औषध घेताच जाऊन पुनः उलटत नाहीत. १२ पुड्या १ रु.

८ प्लेगावर रामबाण औषधः–आजपर्यंत आमचे औषधानें हजारों लोक बरें झाले आहेत करितां प्लेग सुरू होतांच सर्वांनीं संग्रह तापावर गोळ्या गाठीस मलम, घात चढू नये ह्मणून वातावर मात्रा याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं. २ आणे ख. सो.

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषधें ग्रंथोक्त रसायने भस्म पाक. गुटिका, आसव, तेलें, सूगंधी अत्तर, माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत आगत्यची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधाच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामळें एका जा सुरू ला त्याचेच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे जाहिरातीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो णीवस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांच्य कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास ल डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक रोग क्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगात आणणें अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं. आजपर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य बंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानचें खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषध मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुणकारक औषधें मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पडसे वद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---


## OR!ENTAL GOVERNMENT LIFE ASSURENCE COMPANY LIMITED

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—BOMBAY

Chief Agency for C. P, Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED THREE CRORES AND TEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

**IMMEDIATE SETTELEMENT OF CLAIMS**

IF there be one thing ot more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. *This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating heir clients with the utmost liberality*

UNQUESTIONABLE SECURITY

IT is not sufficient to read that a Company's funds amou givensum, but it is essential to know how such Funds are invested— if miscellaneous and risky investments or how secured

THE Funds of the "Oriental" are invested in Government Securities, and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising ahrough decease of assured lives, and endowment policies mature

*Government Officers, ofessional men, Tradesmen and others*,bo mploying a portion of their annual in come or profits in effecting life po once create a fnn l equivalents to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may sav money yet if he di seearly, before he has had time to save much, his wife and amily may be in distress. Life Assurance is a means by which this danger is notover. Life being so uncertain, the sooner a man makes bupuismind to assure his life the better. Once satisfied of the propriety of t he step, do not delay There are numerous instances in the records of the "Oriental" where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained n application to—

M. De SOUZA,
CHIEF AEGNT
Nagpur.

.2


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें